# (९५) परमात्मस्वरूपवर्णन - १२६ ते १३८



अथ ते संप्रवक्ष्यामि स्वरूपं परमात्मनः।
यद्विज्ञाय नरो बन्धान्मुक्तः कैवल्यमश्नुते ॥१२६॥

यानंतर तुला परमात्म्याचे रूप स्पष्ट करून सांगतो
जे जाणल्याने माणूस बंधमुक्त होऊन कैवल्य प्राप्त करतो.
बंध म्हणजे कर्मबंध! माणूस जी काही बरी-
वाईट कर्म करतो त्याची तशी फळं मिळत असतात.
खरे तर कर्मामागची इच्छा कर्मबंध निर्माण
करते. जड भरताचे उदाहरण
कर्म — त्यामागची इच्छा — आसक्ती — कर्मबंध
कर्म करण्याच्या मागे काहीतरी हेतू असतो.
इच्छा/हेतू केव्हा निर्माण होतो तर द्वैत असतं की!
द्वैत कशामुळे निर्माण होते तर मी-माझे या
भावनेमुळे! प्रवृत्तीमुळे!
जेव्हा हे माझे म्हणतो तेव्हा आपोआपच ते सोडून
इतर सर्व परके ठरतात.
मी च्या अपेक्षेतूनच तू निर्माण होतो.
या मी तू च्या द्वैतातूनच कर्म जन्माला येतात.
म्हणजे अहंकारच कर्माला कारणीभूत ठरतो.
आणि अहंकाराचा नाश म्हणजे कर्मनाश.
हा अहंकार नाहीसा करण्यासाठी परमात्मस्वरूप
जाणणे हाच उपाय आहे.
एक ब्रह्म जगदंतरी ओतप्रोत भरलेले।
ही जाणीव झाली की विश्व हा भास वाटू लागतो.
अलंकार मुशीत टाकले की निव्वळ सोने होते.
अहंकार " टाकला की निर्मळ परमात्मा उरतो
आपोआप कर्म/कर्मबंध नाहीसे होतात. केवळ
कैवल्याचा अनुभव येतो: अशा व्यक्तीला 'द्रष्टा' म्हणतात
त्याला काही पहावयाचे उरत नाही.

अस्ति कश्चित् स्वयं नित्यमहंप्रत्ययलम्बनः ।
अवस्थात्रयसाक्षी सन् पञ्चकोशविलक्षणः ॥१२

मी या प्रत्ययाचा आधार असा कुणी स्वतः नित्य पदार्थ आहे. तीन अवस्थांचा साक्षी असणारा तो पाच कोशांहून निराळा आहे.

अन्नमय, प्राणमय, मनोमय, विज्ञानमय व आनंदमय असे पाच कोश आहेत.

अन्नमय – अन्नामुळे निर्माण झालेला, अन्नावर वाढणारा व अन्नातच विलीन होणारा जडदेह।

प्राणमय, मनोमय व विज्ञानमय कोश म्हणजे पंचज्ञानेंद्रिये, प्राण, मन, बुद्धी व अहंकार यांनी युक्त असणारे सूक्ष्मशरीर होय.

आनंदमय - अज्ञान / माया — कारणशरीर

परंतु आत्मा या सर्वांहून वेगळा / विलक्षण आहे, तो सर्वथा भिन्न आहे.

तिन्ही शरीरे किंवा पाच कोश हे कशाचे तरी कार्य आहे. आत्मा मात्र निराकार, अनंत, अविनाशी आहे. जेव्हा मी म्हणत असतो, मी दुःखी, सुखी, त्रस्त आनंदी आहे तेव्हा माझ्या भावनांचे बाह्य जगात बदलत असते. तसेच शरीर-मन-बुद्धीची स्थिती बदललेली असते. या सर्व परिस्थितीमध्ये एक सामायिक, न बदलणारा घटक असतो. तेच जाणिवतत्त्व होय.

हा घटक रूपरहित व अपरिवर्तनशील आहे आणि त्यामुळेच आपल्या व्यक्तित्वाचा 'मी मी' चा अनुभव येत असतो.

खोपोली, गोवा, उज्जैन, सांगली या ठिकाणचे माझे अनुभव भिन्न होते. कधी प्रेम, कधी सन्मान कधी अपमान होत असतो. परंतु या सर्व ठिकाणी मी हा एकच होता. तीच गोष्ट तीन अवस्थांमध्ये

May 2016

| Mon | Tue | Wed | Thu | Fri | Sat | Sun | Mon | Tue | Wed | Thu | Fri | Sat | Sun | Mon | Tue | Wed | Thu | Fri | Sat | Sun |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | | 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 | 7 | 8 | 9 | 10 | 11 | 12 | 13 | 14 | 15 |
| 16 | 17 | 18 | 19 | 20 | 21 | 22 | 23 | 24 | 25 | 26 | 27 | 28 | 29 | 30 | 31 | | | | | |

The rule is, jam tomorrow and jam yesterday- but never jam today.

www.madhaveeraghuveer.com

असते. जागृती, स्वप्न, सुषुप्ति या सर्व अवस्थांमध्ये तो केवळ साक्षी म्हणून ~~...~~ असतो.

यो विजानाति सकलं जाग्रत् स्वप्न सुषुप्तिषु ।
बुद्धि तद्वृत्ति सद्भाव अभावमहमित्ययम् ॥१२५॥

जो जागृती, स्वप्न व सुषुप्ति या तिन्ही अवस्थांमध्ये बुद्धी, तिच्या वृत्ती, त्यांचे असणे आणि नसणे जाणतो व अहंभावाने स्थित असतो तोच हा (परमात्मा) आहे.

मागील श्लोकात अवस्थात्रय शब्दाने सूचित केलेल्या तीन अवस्था — जागृती, स्वप्न, सुषुप्ति यात स्पष्टपणे सांगितल्या आहेत.

वासनांपर्यंतचे संपूर्ण आंतरिक आणि बाह्य जग म्हणजेच आत्मतत्त्वाहून वेगळे असणारे प्रकृतीजन्य हे अनात्म होय. सत्यतत्त्वाच्या अज्ञानामुळे मायेची निर्मिती होते. जो असत्य नाही तो माया.

~~या मा सा माया~~

माझ्यातील ज्या शक्तीमुळे मी जागृती, स्वप्न व सुषुप्ती अवस्थेतील सर्व अनुभव जाणू शकतो, त्या शक्तीलाच आत्मतत्त्व किंवा आत्मा असे म्हणतात. या शक्तीमुळेच माझ्यातील ज्ञानोपकरणे आणि त्यांची प्रमुख कार्ये यांचीही तितकीच जाण असते.

June 2016

| Mon | Tue | Wed | Thu | Fri | Sat | Sun | Mon | Tue | Wed | Thu | Fri | Sat | Sun | Mon | Tue | Wed | Thu | Fri | Sat | Sun |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 | 7 | 8 | 9 | 10 | 11 | 12 | 13 | 14 | 15 | 16 | 17 | 18 | 19 |
| 20 | 21 | 22 | 23 | 24 | 25 | 26 | 27 | 28 | 29 | 30 | | | | | | | | | | |



www.madhaveeraghuveer.com

पाठभेद (आप्नोति)

सः पश्यति स्वयं सर्वं यं न पश्यति कश्चन।
यश्चेतयति बुद्ध्यादि न तद्यं चेतयत्ययम्॥
॥१२८॥

जो स्वतः सर्व पाहतो पण त्याला कुणी पाहू शकत नाही. जो बुद्धी वगैरेंना प्रेरणा देतो पण बुद्धी इ० त्याला प्रेरणा देऊ शकत नाहीत असा हा परमात्मा आहे.

इथे पाहतो या शब्दाचा शब्दशः अर्थ घ्यायचा नाही. कारण आत्मा निरवयव आहे. तो नेहमीच्या अर्थाने पाहू शकत नाही. परंतु तो साक्षी मात्र निश्चितच आहे. त्या चैतन्याच्या अस्तित्वामुळेच या विश्वातील प्रत्येक घटना घडते.

वृक्षाचे ने पर्ण हाले। त्याची सत्ता॥
विश्वातील सर्व घडामोडींचा तो साक्षी असतो. म्हणजेच आत्मा सर्व पाहतो पण तो इंद्रियांचा विषय होऊ शकत नाही. तो इंद्रियातीत आहे.

आत्मा सर्वव्यापक आहे. पणतीच्या ज्योतीने सूर्याला व्यापता येईल का? आकाश सर्व विश्वाला व्यापून आहे. परंतु विश्वातील कोणतीही गोष्ट आकाशाला व्यापू शकणार नाही.

आत्मा सर्वांना प्रेरणा देणारा आहे परंतु त्याला प्रेरणा देणारा कोणीही नाही. त्याला प्रेरणा देण्याचा प्रयत्न म्हणजे काजव्याने सूर्याला ओवाळण्यासारखे किंवा सागराला अर्घ्य देण्याइतके हास्यास्पद आहे.

थोडक्यात आत्मा सर्वसाक्षी, इंद्रियातीत, सर्वगत, प्रेरक असा आहे. तो सर्वव्यापक आहे.

ज्ञानेंद्रिये, मन इ० प्रकृतीची बनलेली आहेत. म्हणून ती अचेतन असतात. या उपकरणांना आपापल्या क्षेत्रात काम करण्यासाठी 'प्रकाश' पुरवते आणि स्वतः मात्र या उपकरणांनी प्रकाशित होत नाही. तेच हे 'आत्मतत्त्व'



www.madhaveeradhuveer.com

येन विश्वमिदं व्याप्तं यं न व्याप्नोति किंचन ।
आभारूपमिदं सर्वं यं भान्तमनुभात्ययम् ॥१३०॥

ज्याने हे सर्व विश्व व्यापले आहे पण ज्याला कुणी व्यापू शकत नाही तो हा आत्मा आहे. हे जे सर्व प्रकाशरूप दिसते ते ज्याच्या प्रकाशामुळे दिसते तो हा परमात्मा आहे.

कठोपनिषदातील विचारांचा या श्लोकावर प्रभाव आहे.

तमेव भान्तमनुभाति सर्वं
तस्य भासा सर्वमिदं विभाति॥

आभारूप म्हणजे प्रकाशरूप। तसेच छायारूप किंवा प्रतिबिंबरूप असाही अर्थ होऊ शकतो.

छाया/प्रतिबिंब हे मूळ रूपापेक्षा वेगळे नसते. तसेच हे विश्वदेखील चैतन्याहून वेगळे/स्वतंत्र नाही. मायारूपी आरसा आहे तोवर प्रतिबिंब आहे. आरसा दूर केला की प्रतिबिंब मूळ स्वरूपात/चैतन्यात विलीन होते.

शंकराचार्य विश्वाला ब्रह्मावरील आवर्त/आभास म्हणतात.

जे सूक्ष्मतम असते ते सर्वव्यापी असते आणि जे सर्वव्यापी असते त्याला दुसरा कोणी व्यापू शकत नाही.

मांस नेत्र व श्रोत्र यांना पाहण्याची, ऐकण्याची शक्ति मिळाली आहे ती चैतन्यतत्त्वामुळेच! त्यामधून प्रकाशणाऱ्या चैतन्यतत्त्वाच्या ह्या प्रकाशामुळेच ते कार्यप्रवण होतात.

एतद् वै तद्। ते हे आहे.
यातून जवळीक दाखवली आहे.

June 2016

| Mon | Tue | Wed | Thu | Fri | Sat | Sun | Mon | Tue | Wed | Thu | Fri | Sat | Sun | Mon | Tue | Wed | Thu | Fri | Sat | Sun |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 | 7 | 8 | 9 | 10 | 11 | 12 | 13 | 14 | 15 | 16 | 17 | 18 | 19 |
| 20 | 21 | 22 | 23 | 24 | 25 | 26 | 27 | 28 | 29 | 30 | | | | | | | | | | |

FRIDAY

MAY '16

27

148-218 WK-21

यस्य सान्निध्यमात्रेण देहेन्द्रियमनोधियः।
विषयेषु स्वकीयेषु वर्तन्ते प्रेरिता इव॥

ज्याच्या केवळ सान्निध्याने सुध्दा देह, इंद्रिये, मन व बुध्दि आपापल्या विषयांच्या ठायी प्रेरणा केल्यासारखी प्रवृत्त होतात.

आई जवळ असली की लहान मूल निर्भयपणे खेळत असते. परंतु ती जवळ नसल्याची पुसटशी जाणीव त्याचे लक्ष खेळातून उडवते.

आत्म्याच्या केवळ असण्यानेच इंद्रिये कार्यरत होतात. आत्माच त्यांचा प्रेरक असतो. त्याचे अस्तित्वच प्रेरणादायी असते.

लोखंडाचा चुरा लोहचुंबकाच्या असण्याने हलू लागतो. इंद्रिये त्यांच्या विषयात कार्यरत होतात.

विषय म्हणजे आस्वाद्य वस्तू.

शरीरवृत्ति, इंद्रियवृत्ती या गोपींप्रमाणे असतात श्रीकृष्णाच्या अस्तित्वाने गोपी उल्हसित होतात.

जाणीवतत्त्वाच्या उपस्थितीने ज्ञानेंद्रिय, पंचप्राण, मन बुध्दी वासना सुध्दा आपापल्या क्षेत्रात, दखलअंदाज न करता कार्य करतात. हे चैतन्यतत्त्व उपकरणांना प्रेरणा देते. सूर्य सर्वांना तेज, ऊब, चैतन्य देतो. त्याच्या अभावी सर्व कामे थांबतात. परंतु त्याला त्याचे काही देणे-घेणे नसते.

अहंकारादिदेहान्ता विषयाश्च सुखादयः।
वेद्यन्ते घटवत् येन नित्यबोधस्वरूपिणा॥१३२॥

अहंकारापासून देहापर्यंत सर्व विषय व सुखादि विकार ज्या नित्यज्ञानरूप आत्म्याकडून घटाप्रमाणे जाणले जातात. तो हा परमात्मा होय.

May 2016

| Mon | Tue | Wed | Thu | Fri | Sat | Sun | Mon | Tue | Wed | Thu | Fri | Sat | Sun | Mon | Tue | Wed | Thu | Fri | Sat | Sun |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | | 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 | 7 | 8 | 9 | 10 | 11 | 12 | 13 | 14 | 15 |
| 16 | 17 | 18 | 19 | 20 | 21 | 22 | 23 | 24 | 25 | 26 | 27 | 28 | 29 | 30 | 31 | | | | | |

घट ही काही नित्य टिकणारी वस्तु नव्हे. ती क्षणभंगुर गोष्ट आहे. सर्वगत आकाशाची व अथांग जलाची अनित्य उपाधि हे घटाचे स्वरूप आहे.

घटाकाश - मठाकाश - महदाकाश — चिदाकाश.

घट फुटतो तेव्हा कशाचा नाश होतो? घटातील आकाश मठाकाशामध्ये विलीन होते. किंवा एखाद्या ठिकाणी घट आणला म्हणजे त्यातून नवीन आकाश येत नाही. घटाच्या अनित्यत्वाचे, उपाधिस्वरूपाचे ज्ञान व्हावे तसेच आत्म्याला देहादी गोष्टींचे ज्ञान होते.

www.madhaveeraghuveer.com

एषोऽन्तरात्मा पुरुषः पुराणो
निरन्तराखण्डसुखानुभूतिः।
सदैकरूपः प्रतिबोधमात्रो
येनेषिता वागसवश्चरन्ति ॥१३३॥

ज्याच्या प्रेरणेने वाणी आदी सर्व इंद्रिये कार्यरत होतात, तो हा अंतरात्मा सदैव आनंदानुभूति-स्वरूप, केवळ ज्ञानघन आणि सदैव एकरूप असा पुराणपुरुष आहे.

अन्तरात्मा असा इथे उल्लेख आहे. पुराणपुरुष या शब्दातून त्याचे सनातनत्व सुचवले आहे. पुरुष हा शब्द उपनिषदात पुरि शयते स पुरुषः। असा आला आहे. तो कधी बदलत नाही. सदैकरूप म्हटले आहे. तो ज्ञानघन आहे हे ठसविण्यासाठी प्रतिबोधमात्र असे विशेषण वापरतात.

अखंड आनंदाचा निरंतर अनुभव म्हणजे तो पुरुष! जितके मनोविक्षेप कमी तितका आनंद जास्त! आनंद ही अतीतावस्थेतील निरुपम अनुभूती आहे.

अंतरात्मा म्हणजे सूक्ष्मतम, सर्वव्यापी आहे. तो एकमेवाद्वितीय आहे.

अत्रैव सत्वात्मनि धीगुहायाम्।
अव्याकृताकाश उरुप्रकाशः।
आकाश उच्चै रविवत्प्रकाशते
स्वतेजसा विश्वमिदं प्रकाशयन् ॥१३४॥

इथेच, या शरीरात, सत्वगुणप्रधान अंतःकरणात बुद्धीरूप गुहेतील अव्यक्ताकाशात अत्यंत प्रकाशमय असे एक आकाश या विश्वाला स्वतेजाने प्रकाशित करत सूर्याप्रमाणे प्रखर तेजाने तळपते.

May 2016

| Mon | Tue | Wed | Thu | Fri | Sat | Sun | Mon | Tue | Wed | Thu | Fri | Sat | Sun | Mon | Tue | Wed | Thu | Fri | Sat | Sun |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | | 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 | 7 | 8 | 9 | 10 | 11 | 12 | 13 | 14 | 15 |
| 16 | 17 | 18 | 19 | 20 | 21 | 22 | 23 | 24 | 25 | 26 | 27 | 28 | 29 | 30 | 31 | | | | | |



The secret of success is sincerity.

याच ठिकाणी, याच देहात परंतु स्वतःच्या सत्व गुण प्रधान म्हणजे शुद्ध आणि विमल शांत चित्तामध्ये, बुध्दीच्या गुहेत आणि अव्यक्ताच्या परिसरात हे आत्मतत्व तेजाळून उठते. त्यासाठी कुठे काशी-रामेश्वर। मक्का-मदिना किंवा जेरुसलेम कुठे ही जायला नको.

जेव्हा व्यक्तीचे मन शांत होते तेव्हाच जाणिवतत्वाची दिव्य प्रकाश म्हणून ओळख पटते.

आकाशातील सूर्य आपल्या उंच ठिकाणावरुन हे विविधतेचे विश्व प्रकाशित करत असतो. तसेच हे आत्मतत्व अंतरीच्या सर्व अनुभवांना प्रकाशित करत असते. आपले लक्ष जेव्हा केवळ सूर्यप्रकाशाकडे असते तेव्हा इतर कोणत्याच वस्तू दिसत नाहीत. आणि जेव्हा विषयवस्तूंकडे लक्ष वेधलेले असते तेव्हा सूर्यप्रकाश दिसत नाही. म्हणजे तो असतोच परंतु तरीही त्याकडे लक्ष जात नाही.

आपले लक्ष जर आत्म्यावर असेल तर दृश्य विश्वाचे भान नसते आणि विषयवस्तूंकडेच ध्यान खिळलेले असते तेव्हा ॐकार ब्रह्म सत्यतत्वाची अनुभूति येत नाही.

अनेकदा आकाश हा शब्द आत्म्यासाठी वापरला जातो. कारण ते सर्वगत आहे, सर्वव्यापक आहे आणि बुध्दीला गुहा म्हटले आहे या गुहेत ते परमात्मतत्व राहते.

June 2016

| Mon | Tue | Wed | Thu | Fri | Sat | Sun | Mon | Tue | Wed | Thu | Fri | Sat | Sun | Mon | Tue | Wed | Thu | Fri | Sat | Sun |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 | 7 | 8 | 9 | 10 | 11 | 12 | 13 | 14 | 15 | 16 | 17 | 18 | 19 |
| 20 | 21 | 22 | 23 | 24 | 25 | 26 | 27 | 28 | 29 | 30 | | | | | | | | | | |



www.madhaveeraghuveer.com

TUESDAY
MAY '16
# 31
152-214 WK-22

न जायते नो म्रियते न वर्धते
न क्षीयते नो विक्रीयते नित्यः।
विलीयमानेऽपि वपुष्यमुष्मिन्
न लीयते कुम्भ इवाम्बरं स्वयम्॥२३॥

हा जन्मत नाही, मरत नाही, वाढत नाही किंवा नष्ट होत नाही. त्यात परिवर्तन (बदल) होत नाही. घट नष्ट झाला तरी आकाश ज्याप्रमाणे नष्ट होत नाही तसाच हा नित्य आत्मा देह नष्ट झाला तरी नष्ट होत नाही.

सर्व जड वस्तूंना सहा विकार असतात - जायते अस्ति, विपरिणमते, वर्धते, अपक्षीयते, विनश्यति।

आत्म्याला या षड्विकारांची बाधा होत नाही मात्र ज्याला आरंभ आहे त्याला अंत अटळच आहे. आत्म्याला आरंभ नाही ∴ अंताचे भय नाही.

उपाधि नष्ट झाली (म्हणजेच उपाधिस्वरूप देह नष्ट झाला तरी) आत्मा नष्ट होत नाही.

कुम्भाम्बर म्हणजेच घटाकाश

आकाश हे सर्वगत, सर्वव्यापक ब्रह्मासारखेच आहे. परंतु तरीही त्याचे जडत्व आत्म्यात नाही म्हणून आत्मा त्याहून निराळा आहे.

बुडबुडा निर्माण होतो आणि नाश पावतो परंतु त्यातील हवा नवीन निर्माण होत नाही, नाश पावत नाही.

जाणिवतत्त्वाची कधी वृद्धी होत नाही आणि ~~नष्ट~~ क्षय होत नाही. जाणिवतत्त्व हे सर्वकाळी असणारे एकमेव असे सत्यतत्त्व आहे. जेव्हा वासनांची पुटे वाढतात तेव्हा त्याचे सौंदर्य मंद झाल्यासारखे वाटते.

May 2016

| Mon | Tue | Wed | Thu | Fri | Sat | Sun | Mon | Tue | Wed | Thu | Fri | Sat | Sun | Mon | Tue | Wed | Thu | Fri | Sat | Sun |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | | 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 | 7 | 8 | 9 | 10 | 11 | 12 | 13 | 14 | 15 |
| 16 | 17 | 18 | 19 | 20 | 21 | 22 | 23 | 24 | 25 | 26 | 27 | 28 | 29 | 30 | 31 | | | | | |


The past, the present and the future are really one: they are today.

www.madhaveeraghuveer.com

# ACTION PLAN

## JUNE '16

| WK | Mon | Tue | Wed | Thu | Fri | Sat | Sun |
|---|---|---|---|---|---|---|---|
| 22 | | | 1 | 2 | 3 | 4 | 5 |
| 23 | 6 | 7 | 8 | 9 | 10 | 11 | 12 |
| 24 | 13 | 14 | 15 | 16 | 17 | 18 | 19 |
| 25 | 20 | 21 | 22 | 23 | 24 | 25 | 26 |
| 26 | 27 | 28 | 29 | 30 | | | |

## OBJECTIVES THIS MONTH

| DATE | DESCRIPTION | REMARKS |
|---|---|---|
| | | |
| | | |
| | | |
| | | |
| | | |
| | | |

MAY '16

| M | T | W | T | F | S | S | M | T | W | T | F | S | S |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | | 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 | 7 | 8 |
| 9 | 10 | 11 | 12 | 13 | 14 | 15 | 16 | 17 | 18 | 19 | 20 | 21 | 22 |
| 23 | 24 | 25 | 26 | 27 | 28 | 29 | 30 | 31 | | | | | |

2016

JULY '16

| M | T | W | T | F | S | S | M | T | W | T | F | S | S |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 | 7 | 8 | 9 | 10 |
| 11 | 12 | 13 | 14 | 15 | 16 | 17 | 18 | 19 | 20 | 21 | 22 | 23 | 24 |
| 25 | 26 | 27 | 28 | 29 | 30 | 31 | | | | | | | |

JU

www.madhaveeraghuveer.com

19 December 2016



प्रकृतिविकृतिभिन्नः शुद्धबोधस्वभावः
सदसदिदमशेषं भासयन्निर्विशेषः।
विलसति परमात्मा जाग्रदादिष्ववस्था
स्वहमहमिति साक्षात्साक्षिरूपेण बुद्धेः॥

प्रकृति व तिचे विकार यांच्याहून वेगळा, शुद्धज्ञान स्वरूप, सत व असत यांना पूर्णपणे प्रकाशित करणारा, निर्विशेष असा परमात्मा जागृती, स्वप्न, सुषुप्ती इ० अवस्थांमध्ये बुद्धीच्या साक्षीरूपाने 'अहं' भावाने साक्षात शोभत असतो.

आत्मा हा प्रकृतिविकृतिभिन्न आहे असे सूत्ररूपाने आचार्य सांगतात. म्हणजेच प्रकृति व तिचे महत्, अहंकार, बुद्धी, मन, इंद्रिये, प्राण इ० विकार यांच्यापेक्षा तो वेगळा आहे. तो शुद्ध ज्ञानरूप व ज्ञानघन आहे. सर्व अवस्थांत तो साक्षीरूपाने असतो. तो चराचर विश्वाला पूर्णपणे प्रकाशित करतो. सत-असत म्हणजेच चेतन व जड.

प्रातः स्मरामि हृदि संस्फुरदात्मतत्त्वम्।
सच्चित्सुखं परमहंस गतिं तुरीयम्।
यत्स्वप्नजागरसुषुप्तमवैति नित्यं
तद्ब्रह्म निष्कलमहं न च भूतसंघः॥

नियमितमनसामुं त्वं स्वमात्मानमात्म
न्ययमहमिति साक्षात् विद्धि बुद्धिप्रसादात्।
जनिमरणतरङ्गापारसंसारसिन्धुं
प्रतर भव कृतार्थो ब्रह्मरूपेण संस्थः ॥१३८॥

संयतचित्ताने तू स्वतःच्या आत्म्याला 'हाच मी आहे' असे बुद्धीच्या प्रसन्नतेमुळे अंतःकरणपूर्वक जाण. जीवनमरणरूपी तरंगांनी युक्त असा अपार संसार सागर तरून जा व ब्रह्मरूपाने स्थित होऊन कृतार्थ हो.

June 2016

| Mon | Tue | Wed | Thu | Fri | Sat | Sun | Mon | Tue | Wed | Thu | Fri | Sat | Sun | Mon | Tue | Wed | Thu | Fri | Sat | Sun |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 | 7 | 8 | 9 | 10 | 11 | 12 | 13 | 14 | 15 | 16 | 17 | 18 | 19 |
| 20 | 21 | 22 | 23 | 24 | 25 | 26 | 27 | 28 | 29 | 30 | | | | | | | | | | |


A wise man knows how little he knows.

www.madhaveeraghuveer.com

# (१६) बंधाचे स्वरूप - १३९ ते १४७



जे परमात्मस्वरूप जाणण्यासाठी संयतचित्त, निर्मळ व प्रसन्न बुद्धी असणे आवश्यक आहे. हे स्वरूप जाणले की संसारसागर तरून जाऊन जीव कृतार्थ होतो. त्याची जन्म-मृत्यु चक्रातील येरझार थांबते. आणि एवढेच सांगून आचार्य थांबत नाहीत. तर अशी कृतार्थता मुमुक्षुने अनुभवावी असा आशीर्वादही देतात.

जे करावयाचे होते ते केल्यानंतर प्राप्त होणारी आनंदाची भावना म्हणजे कृतार्थता!

☆ अत्रानात्मन्यहमिति मतिर्बन्ध एषोऽस्य पुंसः
प्राप्तोऽज्ञानाज्जननमरणक्लेशसंपातहेतुः।
येनैवायं वपुरिदमसत्सत्यमित्यात्मबुद्ध्या
पुष्यत्युक्षत्यवति विषयैस्तन्तुभिः कोशकृद्वत् ॥१३

इथे ~~आत्मत्वाच्या~~ अनात्म्याच्या ठायी मी ही भावना निर्माण होणे हा जीवाला अज्ञानामुळे प्राप्त झालेला व जन्म मरणादि क्लेशांना कारणीभूत होणारा बंध आहे. या बंधामुळे जीव या अशाश्वत शरीराला सत्य मानून त्याच्या ठायी निर्माण झालेल्या आत्म-बुद्धीने त्या देहाचे, ज्याप्रमाणे रेशमी किडा तंतूंनी कोशाचे रक्षण करतो त्याप्रमाणे, विषयांच्या सहाय्याने पोषण, संवर्धन व रक्षण करतो.

अज्ञानाने देहालाच आपले खरे स्वरूप मानले तर देहादिकांच्या सुखदुःखांचा कंप आत्म्याला लागतो. अज्ञानता का होईना चोरीचा माल तुम्ही तुमचा समजून उचलतात आणि घेऊन निघालात तर तुरुंगवास, मारहाण, नाचक्की होणारच. नसेल

July 2016

| Mon | Tue | Wed | Thu | Fri | Sat | Sun | Mon | Tue | Wed | Thu | Fri | Sat | Sun | Mon | Tue | Wed | Thu | Fri | Sat | Sun |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 | 7 | 8 | 9 | 10 | 11 | 12 | 13 | 14 | 15 | 16 | 17 |
| 18 | 19 | 20 | 21 | 22 | 23 | 24 | 25 | 26 | 27 | 28 | 29 | 30 | 31 | | | | | | | |

The one who knows how to adjust is the one who knows how to survive.

अज्ञानामुळे देहाला आपले स्वरूप मानले की जन्म-मृत्यू व दुःख यांची परंपरा मागे लागणारच. देहावरील अहंभाव जीवाला जन्म-मृत्युचक्रात बद्ध करतो म्हणजे तो बंधच आहे.

रेशमी किडा जसा आपल्याच तंतुनी आपल्याला कोशबद्ध करून घेतो तसा जीवही अज्ञानाने स्वतःला जन्म मरणाच्या चक्रात बद्ध करून घेतो.

को नाम बन्धो या शिष्याच्या प्रश्नाला दिलेले हे उत्तर आहे.

मद्याच्या नशेत असताना जर स्वतःची छाया म्हणजेच तुम्ही असे समजत असाल तर भयानक क्लेश होतील. तुम्ही रस्त्यावर लोळत असून तुमच्या अंगावरून अविरत रहदारी सुरू आहे. तुमचे डोके कधी घाणीच्या गटारात असते. अशा रीतीने सावलीची दुःखे हीच तुमची दुःखे होतात.

थोडक्यात, तुमची सावली म्हणजेच तुम्ही ही साधी गैरसमजूतच भयंकर क्लेशाची साखळी बनून जाते.

त्याचप्रमाणे 'मी देह आहे' या अज्ञानजन्य समजुतीमुळेच आपण दुःखाच्या खाईत लोटले जातो.

स्वप्नातील दुःखे जागा होईपर्यंत टिकतात. जेव्हा मी माझे सत्यस्वरूप ओळखतो तेव्हा स्वप्नातील दुःखे संपतात. त्याचप्रमाणे मी ईश्वर आहे, परमात्मस्वरूप आहे हे न ओळखता आल्यामुळे मी विपरीत भावना करतो व स्वतःच निर्माण केलेली दुःखे भोगू लागतो.

चित्रपट पहात असताना नायक/नायिकेच्या सुखदुःखांशी एकरूप होतो. परंतु चित्रपट संपताच भानावर येतो.

गुरूंनी कितीही वेळा सांगितले की तू परमात्मा आहेस तरीही पटत नाही. आपण देहच आहोत असे वाटत राहते. याला कारण आध्यात्मिक स्वरूपाचे अज्ञान.

June 2016

| Mon | Tue | Wed | Thu | Fri | Sat | Sun | Mon | Tue | Wed | Thu | Fri | Sat | Sun | Mon | Tue | Wed | Thu | Fri | Sat | Sun |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 | 7 | 8 | 9 | 10 | 11 | 12 | 13 | 14 | 15 | 16 | 17 | 18 | 19 |
| 20 | 21 | 22 | 23 | 24 | 25 | 26 | 27 | 28 | 29 | 30 | | | | | | | | | | |



www.madhaveeraghuveer.com

रेशमाचा किडा आपल्या तोंडातून निघणाऱ्या सूक्ष्म धाग्यांनी कोश विणत असतो. तो कोश अधिकाधिक बळकट होत जातो, व त्यात तो अडकत जातो.

सर्वसामान्य मनुष्यदेखील स्वतः भोवती पाश तयार करत जातो. जाति, धर्म, पंथ, संप्रदाय, हुद्दा, नातेसंबंध, पदवी, शिक्षण, समाजातील स्थान अशा पाशांमुळे आपले खरे मूलभूत सामर्थ्य, शक्ती, जीवन आणि बुद्धी बहरु शकत नाही. आणि अशा साखळीत तो अडकत जातो.

'सोऽहम्' या विषयावर २ तास प्रवचन ऐकून बाहेर आल्यानंतर घडलेला प्रसंग! दुसरा एक मनुष्य चपलांच्या अदलाबदलीनंतर म्हणतो काय गाढव आहे! त्यावरून कळते होतो.

प्रश्नोत्तरी (मणिरत्नमाला) मध्ये शिष्याने विचारलेल्या 'को नाम बन्धः' या प्रश्नाला आचार्यांनी दिलेले उत्तर सहज समजणारे व पटणारे आहे. देहादिकांठायी 'मी, माझे' हा भाव निर्माण होणे हाच बंध आहे.

अतास्मिंस्तद्बुद्धिः प्रभवति विमूढस्य तमसा
विवेकाभावाद्वै स्फुरति भुजगे रज्जुधिषणा।
ततोऽनर्थव्रातो निपतति समादातुरधिक-
स्ततो योऽसद्ग्राहः स हि भवति बन्धः शृणु सखे॥

मूर्खाला अज्ञानामुळे जिथे जे नाही ते भासते. विवेकज्ञानाच्या अभावामुळे सर्पाच्या ठायी दोरी समजून जो त्याला हाती घेतो त्याच्यावर अनर्थपरंपरा कोसळते. थोडक्यात असत म्हणजे अशाश्वत या अयोग्य गोष्टीचा शाश्वत किंवा योग्य म्हणून केलेला स्वीकार हाच बंध आहे
हे न [illegible]

July 2016

| Mon | Tue | Wed | Thu | Fri | Sat | Sun | Mon | Tue | Wed | Thu | Fri | Sat | Sun | Mon | Tue | Wed | Thu | Fri | Sat | Sun |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 | 7 | 8 | 9 | 10 | 11 | 12 | 13 | 14 | 15 | 16 | 17 |
| 18 | 19 | 20 | 21 | 22 | 23 | 24 | 25 | 26 | 27 | 28 | 29 | 30 | 31 | | | | | | | |

अज्ञानाची आवृत्तिनामक शक्ती अव्यय,
ज्ञानरूप, अनंत, अव्यय आत्म्याला झाकून टाकते.
या आवृत्तिशक्तीला तमोमयी म्हटले आहे.
तम म्हणजे अज्ञान।

सूर्य हा विश्वप्रकाशक ज्ञानरूप आहे तसाच आत्मा आहे. सूर्याला व्यापणारा राहू हा तमोगुणी आहे तशीच आवृत्ती ही तमोमयी शक्ती आहे. राहूमुळे जसा सूर्य दिसेनासा होतो तसाच आवृत्तिशक्तीमुळे आत्मा दिसेनासा होतो.

अज्ञान ज्ञानाला झाकते हे सर्वसामान्य बुद्धीला समजत नाही त्यासाठी सर्वपरिचित असा सूर्यग्रहणाचा दृष्टांत दिला आहे. ग्रहणकाळात राहू नावाचा राक्षस सूर्याला गिळून टाकतो. अशी कल्पना आहे.

वास्तविक चंद्र हा सूर्य व पृथ्वीच्या मध्ये येतो आणि केवळ पाहणाऱ्याच्या दृष्टिकोनातून सूर्य दिसेनासा होतो हे सत्य आहे. तरीसुद्धा चंद्र सूर्यापेक्षा लहान असून तो कसा काय झाकतो हा प्रश्न उरतोच. त्याचे निराकरण शास्त्रात केले आहे.

आता दृष्टांत समजून घेऊ या. चंद्र ही मनाची
Imp देवता आहे आणि सूर्य हे ज्ञानपूर्ण आत्म्याचे प्रतीक मानले गेले आहे. जोपर्यंत मन हे मी आणि माझ्यातील आत्मतत्त्व यांच्या आड येते तोपर्यंत आत्मतत्त्वाचे वैभव मला दिसत नाही. तमोगुणनिर्मित अविद्येचे अज्ञानाचे मन हे रूप आहे. मनाच्या अतीत झालो की विविधता संपलीच म्हणून समजा.

म्हणजे मनाचे अमन झाले की आत्मतत्त्वाची प्राप्ती होतेच होते. सर्वत्र एकच तत्त्व दृष्टीला पडते. तू मी हा भेद विरून जातो. एकरसाचा अनुभव येतो. अद्वैताची प्रतीती येते.

www.madhaveeraghuveer.com

June 2016

| Mon | Tue | Wed | Thu | Fri | Sat | Sun | Mon | Tue | Wed | Thu | Fri | Sat | Sun | Mon | Tue | Wed | Thu | Fri | Sat | Sun |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 | 7 | 8 | 9 | 10 | 11 | 12 | 13 | 14 | 15 | 16 | 17 | 18 | 19 |
| 20 | 21 | 22 | 23 | 24 | 25 | 26 | 27 | 28 | 29 | 30 | | | | | | | | | | |


The execution of laws is more important than the making of them.

निरोभूते स्वात्मन्यमलतरतेजोवति पुमान्
अनात्मानं मोहादहमिति शरीरं कलयति ।
ततः कामक्रोधप्रभृतिभिरमुं बन्धकगुणैः
परं विक्षेपाख्या रजस उरुशक्तिर्व्यथयति ॥१४२॥

अत्यंत विमल प्रकाशरूप आत्मा दिसेनासा झाला की जीव अनात्म अशा देहलाच अज्ञानामुळे 'मी' मानू लागतो. तेव्हा कामक्रोधादि बंधनकारक गुणांच्या सहाय्याने रजोगुणाची विक्षेप नामक प्रबळ शक्ती अतिशय त्रास देते.

अनात्म्याच्या म्हणजे देहाच्या ठायी अज्ञानामुळे 'मी-माझे' हा भाव निर्माण होतो. आणि हा भाव जनन मरण क्लेश संपातहेतु असतो.

दुसऱ्याचे ओझे आपण आपले म्हणून खांद्यावर घेतले तर दुःखदायक होणार. चोरीचा माल तुम्ही अजाणता उचलला तरी शिक्षा अटळ आहे.

तसेच एकदा प्रमाद घडला की जन्म-मृत्यु व दुःख यांची परंपरा मागे लागणारच.

स्वतःला देह मानल्यामुळे काम-क्रोध-लोभ-मोह-मद-मत्सर या अपप्रवृत्तींची पलटण त्याच्या मागे लागते. त्यातून क्लेश सहन करावे लागतात. या सहाही प्रकारांमध्ये त्याचे व्यक्तिमत्व खालावत जाते.

हे गुण (दोर) माणसाला शृंखलाबद्ध करतात. भ्रांती दूर करण्यासाठी आध्यात्मिक जीवन हा एकच मार्ग आहे. मी कोण आहे? हे समजून घ्या. मी अनंत, दिव्य ब्रह्म आहे हे जाणून घेतले की जगणे ओझे न वाटता आनंददायी वाटू लागते. शरीर हे साध्य नसून साधन आहे, याची खात्री पटेल आणि जगायला मजा येते. आनंदाचा अनुभव येतो.

July 2016

| Mon | Tue | Wed | Thu | Fri | Sat | Sun | Mon | Tue | Wed | Thu | Fri | Sat | Sun | Mon | Tue | Wed | Thu | Fri | Sat | Sun |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 | 7 | 8 | 9 | 10 | 11 | 12 | 13 | 14 | 15 | 16 | 17 |
| 18 | 19 | 20 | 21 | 22 | 23 | 24 | 25 | 26 | 27 | 28 | 29 | 30 | 31 | | | | | | | |



www.madhaveeraghuveer.com

TUESDAY
JUN '16
7
159-207 WK-23

महामोहग्राहग्रसनगलितात्मावगमनो
धियो नानावस्थाः स्वयमभिनयंस्तद्गुणतया
अपारे संसारे विषयविषपूरे जलनिधौ
निमज्ज्योन्मज्ज्यायं भ्रमति कुमति
कुत्सितगतिः ॥१४७॥

June 2016

| Mon | Tue | Wed | Thu | Fri | Sat | Sun | Mon | Tue | Wed | Thu | Fri | Sat | Sun | Mon | Tue | Wed | Thu | Fri | Sat | Sun |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 | 7 | 8 | 9 | 10 | 11 | 12 | 13 | 14 | 15 | 16 | 17 | 18 | 19 |
| 20 | 21 | 22 | 23 | 24 | 25 | 26 | 27 | 28 | 29 | 30 | | | | | | | | | | |


Talent wins games, but teamwork and intelligence wins championships.
www.madhaveeraghuveer.com

भानुप्रभासंजनिताभ्रपङ्क्तिः
भानुं तिरोधाय यथा विजृम्भते।
आत्मोदिताहंकृतिरात्मतत्त्वं
तथा तिरोधाय विजृम्भते स्वयम्॥ १४४॥

ज्याप्रमाणे सूर्याच्या प्रकाशामुळे निर्माण होणारी मेघमाला सूर्यालाच झाकून टाकून स्वतःला पसरत जाते, त्याप्रमाणे आत्मतत्त्वापासून निर्माण झालेला अहंकार आत्मतत्त्वाला आच्छादून टाकून स्वतन्त्र व्यापक होऊन जातो.

आचार्यांनी अहंकाराचा प्रभाव दाखवण्यासाठी मेघमालेचा दृष्टांत दिला आहे. सूर्याच्या उष्णतेपासूनच मेघमाला निर्माण होते हे शास्त्रीय सत्य आहे. परंतु अनेकदा ती सूर्याला झाकून टाकते.

तसेच अहंकार हा आत्मतत्त्वापासूनच निर्माण होतो परंतु पुढे पुढे तो इतका वाढतो की त्यालाच झाकून टाकतो. जन्मदात्या पित्याला त्याच्याच पुत्राने (वाईट अर्थाने) मागे सारावे तसेच हे आहे.

जाणिवतत्त्व जेव्हा शरीर-मन-बुद्धी या उपकरणांच्या द्वारे कार्य करते तेव्हा कर्तृत्व-भोक्तृत्व या भावना निर्माण होतात. त्यापाठोपाठ हा अहंकार जागा होतो, आणि विचारत सुटतो — कुठे आहे ईश्वर? सत्य काय तो मीच! माझ्याशिवाय आहेच काय या जगात? अहंकार — पदार्थ, कलाकृती, मूर्ति, काव्य, लेखन, अभिनय, व्याख्यान, धाडस, संशोधन, राजकारण अशा अनेक गोष्टींचा असू शकतो.

या मानसिक जडणघडणीतूनच मानवाची सर्व दुःखे निर्माण होत असतात.

www.madhaveeragdeer.com

July 2016

| Mon | Tue | Wed | Thu | Fri | Sat | Sun | Mon | Tue | Wed | Thu | Fri | Sat | Sun | Mon | Tue | Wed | Thu | Fri | Sat | Sun |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 | 7 | 8 | 9 | 10 | 11 | 12 | 13 | 14 | 15 | 16 | 17 |
| 18 | 19 | 20 | 21 | 22 | 23 | 24 | 25 | 26 | 27 | 28 | 29 | 30 | 31 | | | | | | | |

कवलितदिननाथे दुर्दिने सान्द्रमेघैः
व्यथयति हिमझञ्झावायुरुग्रो यथैतान् ।
अविरततमसात्मन्यावृते मूढबुद्धिं
क्षपयति बहुदुःखैस्तीव्रविक्षेपशक्तिः ॥१४५॥

घनदाट मेघांनी सूर्याला झाकून टाकले आहे अशा उदासवाण्या दिवशी थंडगार सोसाट्याचे वारे जसे लोकांना व्याकुळ करून टाकतात तसे अज्ञानाने झाकून (आत्म्याला) टाकले की ही प्रबळ विक्षेपशक्ती अज्ञानी जीवाला अनेक क्लेश देऊन त्रस्त करते.

अज्ञानाच्या आवृति आणि विक्षेपशक्ती या दोन्ही मिळून जीवाला त्रस्त करून टाकतात.

पावसाळ्यात जेव्हा ढगांनी सूर्याला झाकून टाकले असते तेव्हा दिवस उदासवाणा होतो. अशा वेळी सूर्याचे दर्शन नीट घडत नाही आणि त्यातच थंडगार बोचरे वारे सुटले की जीव व्याकुळ होतो.

जे लोक अशा क्लेशकारक आभाळ आलेल्या दिवसाच्या छायेत सापडत नाहीत ते सुखी असतात. आणि जे ढगांच्या पलीकडे आहेत त्यांना तर त्रास नसतोच.

त्याचप्रमाणे ज्यांना आत्मप्राप्ती झाली आहे त्यांच्या बाबतीत अविद्या आणि अविद्याजन्य अहंकार यांना काहीच स्थान नसते.

एताभ्यामेव शक्तिभ्यां बन्धः पुंसः समागतः ।
याभ्यां विमोहितो देहं ~~[illegible]~~ मत्वात्मानं भ्रमत्ययम् ॥

या दोन शक्तींमुळेच जीवाला बंध प्राप्त होतो. यांच्यामुळेच संभ्रमात पडून देहाला आत्मा मानून तो संसारचक्रात फिरत राहतो.

बीजं संसृतिभूमिजस्य तु तमो देहात्मधीरङ्कुरो रागः पल्लवमम्बु कर्म तु वपुः स्कन्धोऽसवः शाखिका अग्राणीन्द्रियसंहतिश्च विषयाः पुष्पाणि दुःखं फलं नानाकर्मसमुद्भवं बहुविधं भोक्तात्र जीवः खगः ॥१४६

संसाररूपी वृक्षाचे बीज अज्ञान, देहात्मबुद्धी हा अंकुर, आसक्ती ही पालवी, कर्म हे पाणी, शरीर हे खोड, प्राण या फांद्या, इंद्रियसमूह ही फांद्यांची टोके आणि विषय ही फुले, विविध कर्मातून उद्भवणारे बहुविध दुःख हे फळ आणि इथे भोक्ता जीव हा पक्षी आहे.

हे एक समर्पक रूपक आहे. मुंडकोपनिषदातील कल्पनेशी साधर्म्य दाखवणारे हे पूर्णरूपक आहे.

बीज — अज्ञान
अंकुर — देहालाच सर्वस्व मानणारी बुद्धी!
पालवी — आसक्ती
पाणी — कर्म
बुंधा — शरीर
फांद्या — प्राण
शेंडे — इंद्रियसमूह
फुले — विषय
फळे — विविध कर्मांमुळे निर्माण होणारे दुःख
पक्षी — भोक्ता जीव

खरोखर अज्ञानामुळेच तर ब्रह्मावर या विश्वाचा भास होतो म्हणून या संसारवृक्षाचे बीज कोणते असेल तर ते अज्ञान हेच आहे. विविध कर्मे सुरू आहेत म्हणूनच जन्म मृत्युचक्र किंवा संसरण सुरू आहे. कर्मे वाढत जातील तसतसा हा वृक्ष दृढमूल होत जातो. म्हणजेच पाणी भरपूर घातले तर वृक्ष फळाफुलांनी बहरणारच

www.madhaveeraghuveer.com

त्यामुळे कर्मावर केलेले पाण्याचे संपर्क योग्यच आहे. आणि कर्मे केल्यामुळेच दुःखरूपी फळे मिळतात. वृक्ष, फुले, फळे यांचा उल्लेख आल्यावर तिथे पक्षी येणारच. दुःखरूपी फळांचा आस्वाद घेणारा भोक्ता जीव म्हणजे संसारवृक्षावरील पक्षी आहे. विषय हे आकर्षित करणारे, भुलवणारे, मोहात पाडणारे असतात. म्हणून रंगीबेरंगी फुलांची उपमा दिली आहे.

आचार्यांचे कविमन या रूपकातून स्पष्ट होते. अज्ञानाला <u>बीजाची</u> उपमा दिली आहे. बीज अग्निमध्ये भाजले म्हणजेच वासना जर ज्ञानाग्निमध्ये दग्ध झाल्या तर संसारवृक्ष मुळीच राहणार नाही.

ज्ञानाग्निः सर्वकर्माणि भस्मसात्कुरुते तथा।

अविद्येची पहिली अभिव्यक्ती असते ती म्हणजे देहात्मबुद्धी म्हणजे तो पहिला <u>अंकुर</u> आहे. देहाच्या कामनांची पूर्तता करण्याकरता केलेले अहंकेंद्रित कर्म म्हणजे <u>पाणी</u>! पाणी बंद केले तर या संसारवृक्षाची वाढ रोखता येईल. हे शक्य नसेल तर व्यवहारात नायट्रिक ॲसिडचे थेंब घालतात. परमार्थात देखील अहंकारकेंद्रित कर्मांमध्ये समर्पणाचे दोन थेंब जरी टाकले तरी त्या झाडाची वाढ थांबेल आणि यथावकाश ते नष्ट होईल. आपला स्थूल देह म्हणजे झाडाचे <u>खोड</u> आहे. प्राण म्हणजे झाडाच्या <u>फांद्या</u>. फांद्यांमुळे खोड पोसले जाते त्याचप्रमाणे प्राणांमुळेच हा स्थूल देह पोसला जातो. देहकर्मे चालू राहतात.

ज्ञानेंद्रिये म्हणजे त्याच्या <u>डहाळ्या</u> आहेत. त्या पंचप्राणांवर अवलंबून असतात. फांद्याच कापून टाकल्या तर डहाळ्या राहात नाहीत. तसेच प्राण सोडून जातात तेव्हा ज्ञानेंद्रिये काम करू शकत नाहीत.



www.madhaveeraghuveer.com

# (१७) बंधातून सुटण्याचा उपाय - १४८ ते १५४



इंद्रियांचे दोन प्रकार आहेत.
ज्ञानेंद्रिये - बाह्य जगातून प्रेरणा स्वीकारणे
कर्मेंद्रिये - प्रेरणानुसार प्रतिक्रियात्मक कर्म करणे

विषयवस्तु ही फुले आहेत. लक्ष वेधून घेण्याचे काम करतात. प्रत्येक इंद्रियाची स्वतःची अशी विषयवस्तु असते. शब्द, स्पर्श, रूप, रस, गंध!

अहंकारकेंद्रित मनाने केलेल्या कर्मांमुळे असंख्य दुःखे भोगावी लागतात. ती आहेत वृक्षाची फळे! ही कर्मफळे त्रिविध (सात्त्विक, राजस, तामस) प्रकारानुसार मिळतात. ही कर्मफळे नेहमी दुःखदायकच असतात. शिवाय फळात बीज असतेच. कर्मफळे ही वासनांनी भरलेली असतात.

फळाचा भोक्ता हा जीव असतो. तो सारखा या फांदीवरून त्या फांदीवर धावत असतो. फळांना भोक्ता असल्याखेरीज फळे धारण करणाऱ्या वृक्षाची कधीच परिपूर्ती होत नाही. हा पक्षी फळाचा उपभोग घेतो. झाडावर विश्रांती घेतो. एक झाड फार काळ उपयुक्त नाही असे वाटताच दुसरे झाड शोधतो.

अज्ञानमूलोऽयमनात्मबन्धो
नैसर्गिकोऽनादिरनन्त ईरितः।
जन्माप्ययव्याधिजरादिदुःख
प्रवाहपातं जनयत्यमुष्य ॥१४८॥

ब्रह्मावर विश्व भासते ते अज्ञानामुळे! अज्ञानाचा हा बंध स्वाभाविक आहे आणि म्हणूनच त्याला अनादि म्हटले जाते कारण अज्ञान केव्हा आणि कशापासून निर्माण झाले हे सांगता येत नाही आणि ब्रह्मज्ञान होईपर्यंत ते नष्टही होत नाही. शिवाय ब्रह्मज्ञान होणे ही काही सहजसोपी गोष्ट नाही म्हणून अज्ञानाला अनंत असेही

July 2016

| Mon | Tue | Wed | Thu | Fri | Sat | Sun | Mon | Tue | Wed | Thu | Fri | Sat | Sun | Mon | Tue | Wed | Thu | Fri | Sat | Sun |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 | 7 | 8 | 9 | 10 | 11 | 12 | 13 | 14 | 15 | 16 | 17 |
| 18 | 19 | 20 | 21 | 22 | 23 | 24 | 25 | 26 | 27 | 28 | 29 | 30 | 31 | | | | | | | |



www.madhaveeraghuveer.com

Ascending efforts of man and
Descending Grace of God.



म्हटले आहे आणि म्हणूनच या श्लोकात
अज्ञानमूलक अनात्मबंधाला अनादि, अनंत
म्हटले आहे. हा बंध दुःखाचा प्रवाह किंवा
परंपरा निर्माण करतो असे आचार्य म्हणतात.
अविद्या ही स्वयंनिर्मित असते असे म्हटले जाते.
गुहेत अंधार असणे हा गुहेचा धर्मच आहे. त्याचप्रमाणे
हृदयाच्या गुहेत देखील अज्ञानाचा (तम) अंधकार
असणारच. जोवर आत्मतत्त्वाचे ज्ञान होत नाही तोवर
हा अंधार अटळ आहे.
अनंत सत्यतत्त्वाच्या अपरोक्ष साक्षात्कारानेच
केवळ अविद्येचा नाश होऊ शकतो.

नास्त्रैर्न शस्त्रैरनिलेन वह्निना
छेत्तुं न शक्यो नच कर्मकोटिभिः।
विवेक विज्ञान महासिना विना
धातुः प्रसादेन सितेन मञ्जुना ॥१४९॥

अस्त्रांनी, शस्त्रांनी, अग्नीने किंवा कोटि कर्मांनीही याला
छेदणे शक्य नाही. ईश्वरकृपेने मिळणाऱ्या, तीक्ष्ण व
मनोहर अशा विवेकरूपी खड्गाशिवाय, छेदला जात नाही.
अज्ञान आणि अज्ञानापासून निर्माण होणारा बंध
भौतिकसाधनांनी नष्ट होत नाही. त्यासाठी विवेकज्ञानाची
आवश्यकता असते. विवेकाला धारदार तलवारीची
उपमा दिली जाते. ती श्रेष्ठ, अमप्रतीची हवी.
विधातुः प्रसाद - ईश्वरकृपेशिवाय हा अनात्मबंध
तुटणे शक्य नाही. पुढे १५० व्या श्लोकात असाच
उल्लेख येणार आहे.
कठोपनिषदातील मंत्रात म्हटले आहे.
नायम् आत्मा प्रवचनेन लभ्यो न बहुधा श्रुतेन।
यमेव एष वृणुते तेन लभ्यः तस्य एष आत्मा विवृणुते
स्वाम्।

June 2016

| Mon | Tue | Wed | Thu | Fri | Sat | Sun | Mon | Tue | Wed | Thu | Fri | Sat | Sun | Mon | Tue | Wed | Thu | Fri | Sat | Sun |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 | 7 | 8 | 9 | 10 | 11 | 12 | 13 | 14 | 15 | 16 | 17 | 18 | 19 |
| 20 | 21 | 22 | 23 | 24 | 25 | 26 | 27 | 28 | 29 | 30 | | | | | | | | | | |


The difference between style and fashion is quality.

त्याला (परमात्म्याला) जो पात्र वाटतो. त्यालाच तो आपले स्वरूप उलगडून दाखवतो. ज्ञान देतो. त्या परमात्म्याची कृपा असेल तरच सम्यक् ज्ञान होऊन अज्ञान नाहीसे होते.

या श्लोकाचे गीतेतील श्लोकाशी साम्य असले तरी तिथे ते वर्णन आत्म्याचे आहे आणि इथे अनात्मबधाच्या चिवटपणाचे वर्णन आहे. म्हणूनच शस्त्र, अस्त्र, अग्नि यांनी तर तो बंध नाहीसा होत नाहीच परंतु कितीही चांगली कर्मे केली तरी अज्ञानामुळे होणारा हा भास संपत नाही. कारण कर्म हे संसाराला पोषक पूरक ठरणारे आहे.

मागील वृक्षाच्या रूपकात तर कर्मांच्या पाण्यावरच संसारवृक्ष तगतो, तरतो, वाढतो असे म्हटले आहे.

शस्त्र, अस्त्र ही संहारक शक्ती आहे.

वायु अग्नि या विनाशक निसर्गशक्ती आहेत या कशानेही या अविद्येचा नाश होत नाही. ही आशाभंग करणारी गोष्ट आहे.

परंतु पुढच्या दोन ओळीत त्याचा उपाय सांगितला आहे. धातु या शब्दाचे दोन अर्थ आहेत. धातुप्रसाद याचा एक अर्थ आंतरिक उपकरणांची शुद्धी आणि दुसरा अर्थ आहे तो म्हणजे ईश्वराची कृपा.

शरीर हे सप्तधातुंचे बनले आहे त्याची शुद्धी करण्यासाठी चित्तशुद्धी घडायला हवी.

जेव्हा वासना कमी होतात तेव्हा मनाचे विक्षेप कमी होतात. आणि मन जितके शांत होते तितकी चिंतनशीलता वाढते. विकसित झालेल्या चिंतनशीलतेने विवेक बुद्धीला धार येत असते. आणि या धार लावलेल्या तलवारीनेच केवळ आत्मा व अनात्मा यातील गोंधळ घालवता येतो.

July 2016

| Mon | Tue | Wed | Thu | Fri | Sat | Sun | Mon | Tue | Wed | Thu | Fri | Sat | Sun | Mon | Tue | Wed | Thu | Fri | Sat | Sun |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 | 7 | 8 | 9 | 10 | 11 | 12 | 13 | 14 | 15 | 16 | 17 |
| 18 | 19 | 20 | 21 | 22 | 23 | 24 | 25 | 26 | 27 | 28 | 29 | 30 | 31 | | | | | | | |



www.madhaveeraghuveer.com

1 January 2017



श्रुतिप्रमाणैकमतेः स्वधर्म
निष्ठा तयैवात्मविशुद्धिरस्य।
विशुद्धबुद्धेः परमात्मवेदनं
तेनैव संसारसमूलनाशः ॥ १५० ॥

श्रुतिंना प्रमाण मानण्याकडे स्वधर्मनिष्ठा असेल तर तिच्याच ~~मुळे~~ मुळे जीवाची चित्तशुद्धी होते व त्याची बुद्धी शुद्ध, त्याला परमात्म्याचे ज्ञान होते व ज्ञानानेच संसाराचा समूळ नाश होतो.

श्रुतिमध्ये चारही वेद व उपनिषदांचा समावेश होतो. श्रुतिंना प्रमाण मानायची वृत्ती असेल ~~तर~~ व स्वधर्मनिष्ठा असेल तर एवढ्यानेच चित्तशुद्धी होते, आणि शुद्धचित्त झाल्याने परमतत्त्वाचे ज्ञान होते.

स्वधर्म म्हणजे स्वतःच्या विहित कर्तव्यावर विश्वास! इथे धर्म शब्द कर्तव्य या अर्थी आला आहे.

एकदा का ज्ञान झाले की त्यावर होणारा संसाराचा भास नाहीसा होतो. एकदा दोरी आहे कळले की सापाचा भास नाहीसा होतो.

ज्याचे मन श्रुतिग्रंथातील सत्य तत्त्वाशी एकाग्र झाले असेल अशा माणसालाच स्वधर्माच्या निर्दिष्ट मार्गावरून स्थैर्याने मार्गक्रमणा करता येईल. स्वधर्माच्या आदेशानुसार जो निःस्वार्थ बुद्धीने दीर्घ काळ राहू शकतो त्याची बुद्धी स्थिर आणि मन शांत राहू शकते. तोच समाधानी होतो. जशी — बगळा — पतिव्रता — कसा

वेदांत म्हणजे यथार्थ ज्ञान Pure Knowledge. ते शुष्क पुस्तकी ज्ञान नाही. एखाद्या कागदावर 'साखर' हा शब्द अनेक भाषांमध्ये लिहिला असला तरी तो वाचून साखरेची गोडी समजणार नाही. गोडी चाखणे हा जरी जिभेचा विषय असला तरी तो कागद चाटूनसुद्धा गोडी समजणार नाही.

June 2016

| Mon | Tue | Wed | Thu | Fri | Sat | Sun | Mon | Tue | Wed | Thu | Fri | Sat | Sun | Mon | Tue | Wed | Thu | Fri | Sat | Sun |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 | 7 | 8 | 9 | 10 | 11 | 12 | 13 | 14 | 15 | 16 | 17 | 18 | 19 |
| 20 | 21 | 22 | 23 | 24 | 25 | 26 | 27 | 28 | 29 | 30 | | | | | | | | | | |


Pray as if depended on God and work as if everything depended on man.

www.madhaveeraghuveer.com

कोशैरन्नमयाद्यैः पञ्चभिरात्मा न संवृतो भाति।
निजशक्तिसमुत्पन्नैः शैवालपटलैरिवाम्बु वापीस्थम्॥१५१॥

स्वसामर्थ्याने उत्पन्न झालेल्या अन्नमय इत्यादी पाच कोशांनी झाकला गेलेला आत्मा शेवाळाच्या आवरणाने विहिरीतील झाकल्या गेलेल्या पाण्याप्रमाणे प्रत्यक्ष दिसत नाही.

अन्नमय, प्राणमय, मनोमय, विज्ञानमय, आनंदमय कोश। हे पाच कोश आत्म्याच्या निजसामर्थ्याने निर्माण होतात मायेमुळे असतात आणि माया ही परमेशशक्ती आहे.

शेवाळ्यामुळे पाण्याचे निर्मळरूप (निवळ शंख) दिसत नाही. त्याचप्रमाणे पाच कोशांनी आत्म्याला आवृत केले असल्याने त्याची प्रतीति येत नाही.

पाण्यावर शेवाळे असताना प्रकाशमान सूर्याचे तेजस्वी प्रतिबिंब त्यात पडत नाही. वासना या शेवाळ्याप्रमाणे असतात. अहंकारजन्य कामनांना दूर करणे म्हणजे शेवाळे दूर करण्यासारखे आहे. शेवाळे हाताने दूर करणे हा तात्पुरता उपाय झाला. पाणी टाकीतून वाहून जाणे आणि नवीन पाणी टाकीत पडणे हा उत्कृष्ट उपाय आहे.

स्वाध्याय, चिंतन, मनन यामुळे नव्या आध्यात्मिक विचारांचा प्रवाह वाहू लागतो. भक्तिभावाचे प्रवाह मनात वाहत राहतील आणि मग आत्मतत्त्वाच्या अनुभूतीस अडथळा आणणारे सर्व काही (शेवाळे) वाहून जाईल.

तच्छैवालापनये सम्यक् सलिलं प्रतीयते शुद्धम्।
तृष्णासन्तापहरं सद्यः सौख्यप्रदं परं पुंसः॥१५२॥

जेव्हा शेवाळ दूर केले जाते तेव्हा शुद्ध व निर्मळ पाणी दिसू लागते. तहानेमुळे होणारा त्रास दूर होतो.

पाण्यातील सर्व अशुद्ध द्रव्ये तळाशी स्थिर करण्याचे आणि ते शोषून घेण्याचे गुणधर्म शेवाळात असतात. म्हणजेच जेव्हा पाण्यावर शेवाळे असते तेव्हा त्याखाली असणारे पाणी अत्यंत निर्मळ व स्वच्छ असते.

तृष्णा हा शब्द विषयोपभोग याकरता वापरला जातो. आणि विषयवस्तुंविषयीची तृष्णा सत्यतत्त्व जाणल्यावरच भागते.

शेवाळे खाऊन काही तहान भागवता येत नाही तसेच पंचकोशांशी असणारे तादात्म्य हे कधीच टिकाऊ सुख देऊ शकत नाही. केवळ सत्य स्वरूपाची प्राप्तीच शाश्वत आनंद देऊ शकेल. शेवाळ जरी पाण्यापासून निर्माण होत असेल तरी ते पाणी नाही. तसेच पंचकोश जरी आत्मतत्त्वापासून निर्माण होत असले तरी ते म्हणजे आत्मतत्त्व नव्हे.

पञ्चानामपि कोशानामपवादे विभात्ययं शुद्धः।
नित्यानन्दैकरसः प्रत्यग्रूपः परः स्वयंज्योतिः॥१५३॥

मागील श्लोकाचा संदर्भ घेऊन शेवाळ्याची संकल्पना स्पष्ट करत आहेत. शेवाळ्याने झाकले गेलेले पाणी जसे शेवाळ दूर करताच दिसू लागते तसा कोशांनी झाकला गेलेला आत्मा कोशांचा निरास केला की मूळस्वरूपात शोभू लागतो. प्रकाशरूप आत्मा स्पष्टपणे प्रत्ययास येतो.

मात्र बंधमुक्त व्हायचे असेल तर आत्मा / अनात्मा (पाणी / शेवाळ) यातील भेद समजायला हवा. यालाच आत्मानात्मविवेक म्हणतात.

जेव्हा 'मी' म्हणजेच जाणीवयुक्त व्यक्तिभाव वाढला होतो तेव्हा आत्मतत्त्व प्रकाशू लागते. परमात्म्याचे आकलन होते तेव्हा क्षुद्र जीवात्मा ही समजूत आधारशून्य होते.



No one travelling on a business trip would be missed if he failed to arrive.

www.madhaveeraghuveer.com

आत्मानात्मविवेकः कर्तव्यो बन्धमुक्तये विदुषा।
तेनैवानन्दी भवति स्वं विज्ञाय सच्चिदानन्दम्॥१५४॥

बंधातून मुक्त होण्यासाठी शहाण्याने आत्मानात्म विवेक साधावा. त्यामुळेच तो स्वतःच्या सच्चिदानंदरूपाला जाणून आनंदी होतो.

या ज्ञानमार्गाने जाताना नेहमीच आत्मा-अनात्मा यामध्ये विवेक करावा लागतो. अमुक एक अनुभव हा देहाचा (किंवा बुद्धी/कामनांचा) आहे अशी स्पष्टपणे खात्री झाल्यावर आपले लक्ष आत्मतत्त्वाकडे वळवावे. आणि तो अनुभव आत्मतत्त्वाचा नाही अशी भावना करावी.

या दृढीकरणाच्या प्रक्रियेमुळेच मी स्वतःला दुःखाच्या बंधापासून मुक्त करू शकतो, आत्म्याशी अनुसंधान राखू शकतो. त्यानंतर कोणताही संघर्ष, ताणतणाव उरत नाही. तो सच्चिदानंद स्वरूपच होऊन जातो.

मुञ्जादिषीकामिव दृश्यवर्गात्
प्रत्यञ्चमात्मानमसङ्गमक्रियम्।
विविच्य तत्र प्रविलाप्य सर्वं
तदात्मना तिष्ठति यः स मुक्तः॥१५५॥

☆ मुंज गवतापासून जसा त्यातील बारीक तंतू बाजूला केला जातो, त्याप्रमाणे असंग व निष्क्रिय अशा प्रत्यगात्म्याला दृश्य विश्वापासून वेगळे करून, त्याच्यातच सर्वांचा लय करून जो आत्मस्वरूपात राहतो, तोच मुक्त होय.

मुंज गवताचा हा उल्लेख वैदिक संस्कृतीला शोभणारा आहे. मुंज गवताचा वापर यज्ञोपवीतासाठी किंवा मेखला म्हणून केला जायचा. या गवतातील लहान तंतू जसा वेगळा काढावा तसा स्थूल, दृश्य



www.madhavvairagnuvel.com

विश्वापासून आत्मा वेगळा काढायचा. पुढे त्या आत्मस्वरूपातच सर्व विश्वाचा लय करायचा म्हणजे विश्व हा आभास आहे हे मनावर ठसवायचे. मुमुक्षुचे ते आद्यकर्तव्य आहे असे आचार्य सांगतात.

मुंज्या गवताच्या पानाची आवरणे सोलून आतील गाभा काढतात. हा फारच नाजुक व कोमल असल्याने काळजीपूर्वक काढावा लागतो. तो स्पष्ट दिसतो त्याचप्रमाणे आत्मतत्त्वावरील सर्व कोशांचा निरास करून आतील निष्क्रिय व असंग आत्मतत्त्व प्रत्यक्ष करून घेता येते. हा सर्वांच्या अंतर्यामी असला तरी आपल्या प्रतीतीस येत नाही.

देहोऽयमन्नभवनोऽन्नमयस्तु कोशः
चान्नेन जीवति विनश्यति तद्विहीनः।
त्वक्चर्ममांसरुधिरास्थिपुरीषराशिः
नायं स्वयं भवितुमर्हति नित्यशुद्धः॥१५६॥

अन्नापासून बनलेला हा देहच अन्नमय कोश आहे. हा अन्नामुळेच जगतो व त्याविना नाश पावतो. त्वचा, कातडे (चरबी) मांस, रक्त, अस्थि आणि मल यांचा समूह असलेला हा कोश नित्य, निर्मल आत्मा होण्यास समर्थ नाही.

न वा सप्तधातुर्न वा पंचकोशः असे आचार्यांनी पूर्वीच सांगितले आहे. ज्याप्रमाणे घर मातीचा असतो आणि जेव्हा फुटतो तेव्हा मातीलाच मिळतो. म्हणजेच मूळ स्वरूपात मिसळून जातो. मलमूत्रासारखे टाकाऊ पदार्थही यात मिसळलेले असतात. त्यामुळे देह निर्मल, निर्दोष नाही. मात्र आत्मा निर्मल निर्दोष आहे.

बहुतांश माणसांना स्वतःच्या भौतिक देहापलीकडे काही भव्य, दिव्य आहे याचीच जाणीव नसते.

June 2016

| Mon | Tue | Wed | Thu | Fri | Sat | Sun | Mon | Tue | Wed | Thu | Fri | Sat | Sun | Mon | Tue | Wed | Thu | Fri | Sat | Sun |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 | 7 | 8 | 9 | 10 | 11 | 12 | 13 | 14 | 15 | 16 | 17 | 18 | 19 |
| 20 | 21 | 22 | 23 | 24 | 25 | 26 | 27 | 28 | 29 | 30 | | | | | | | | | | |


Mistakes that are caused by the lack of attention, are the cause of tension.
www.madhavraghuveer.com

त्यामुळे एकदम 'मी हा देह नव्हे' असे म्हणणे सहजासहजी पटणार नाही, म्हणून शास्त्रीय दृष्टिकोनातून निरीक्षण व विश्लेषण केले आहे. त्यातून 'आपण म्हणजे वस्तुत: देह नव्हे' असे ज्ञान होते.

पुं-बीज हे पित्याने खाल्ल्या अन्नरसातून तयार झालेले असते. ते जेव्हा मातेच्या गर्भात येते तेव्हा त्याचे भरण-पोषण आईने खाल्ल्या अन्नावरच होते. त्याची वाढही अन्नामुळेच होते आणि देहाचा नाश होतो तेव्हा तो देह पशु-पक्षी, कीटक-वनस्पती यांचे अन्नच होत असतो. म्हणूनच जो अन्नापासून निर्माण होतो, अन्नावरच पोसले जाते, अन्नातच विलीन होते त्याला यथार्थपणे 'अन्नमय कोश' म्हटले आहे.

अत्यंत मोहक आणि आकर्षक असा देह वास्तविक पाहता घाणीने भरलेले भांडे आहे. आणि म्हणूनच हा मलयुक्त, अपवित्र देह — नित्य शुद्ध, तेजस्वी, पवित्र असा आत्मा असूच शकत नाही.

पूर्वं जनेरधि मृतेरपि नायमस्ति
जातक्षणक्षणगुणोऽनियतस्वभाव: ।
नैको जडश्च घटवत् परिदृश्यमान:
स्वात्मा कथं भवति भावविकारवेत्ता ॥१५८॥

हा जन्मापूर्वी व मृत्युनंतर असत नाही. क्षणात जन्म घेतो, क्षणभंगुर आणि अस्थिर आहे. अनेक रूपे धारण करणारा आहे. जड आहे. घटासारखा दृश्यपदार्थ आहे. हा भावविकार जाणणारा (देह) आत्मा कसा बरे होईल?

देह जड, अशाश्वत, क्षणभंगुर आहे. जन्म, जरा, मृत्यु या विकारांनी युक्त आहे. नित्य परिवर्तनशील आहे. याचे रूप सुद्धा सारखे बदलते. तो बहुरूपी आहे. हा देह इंद्रियांच्या कक्षात येणारा आहे. देहाला भावभावना आहेत.

मात्र आत्मा असा नाही. त्याला विकार नसेल. तो शाश्वत, नित्य, अविकारी, निरवयव व अपरिवर्तनीय आहे. सच्चिदानंद हेच त्याचे एकमेव रूप आहे. तो अनादि-अनंत आहे.

हा देह त्या व्यक्तीच्या जन्मापासून अस्तित्वात आला. मृत्युनंतर तो विनाश पावणार, कुजणार.

क्षणाक्षणाला देहात परिवर्तने घडत असतात. कधी सुखी-दुःखी, रजोगुणी-तमोगुणी, चांगला-वाईट असतो. देहाचे स्वरूप अस्थिर आहे.

देह स्वभावतः अचेतन असतो. मी हालचाल करतो त्याबरोबर माझे कपडेही हालचाल करतात. त्याचप्रमाणे माझ्या देहाला प्रेरणा देणारा कुणी वेगळाच आहे. दूरदर्शक यंत्र स्वतःहून काही पाहू शकत नाही परंतु त्यातून निरीक्षण करणारा चतुर निरीक्षक पाहू शकतो.

तसेच जाणिवतत्व देहाद्वारे काम करत असते. देह म्हणजे परमात्म्यावरील कर्करोगासारखी वाढ आहे. देह हा आत्मा होऊच शकत नाही.

पाणिपादादिमान्देहो नात्मा व्यङ्गेऽपि जीवनात् ।
तत्तच्छक्तेरनाशाच्च न नियम्यो नियामकः ॥१५८॥

हा हात, पाय इ. नी युक्त देह म्हणजे आत्मा नव्हे. एखादा अवयव तुटला तरी त्याच्या शक्तीचा नाश न झाल्याने तो जिवंत राहतो. आणि जो नियमांनी बांधला गेला आहे तो नियामक होत नाही.

देहाला अवयव असतात. आत्मा निरवयव आहे. एखादा अवयव तुटला तर त्या देहाला व्यंगासहित जगावे लागते. त्याच्यावर चैतन्य शक्तीचे नियंत्रण असते. म्हणून विकलांग अवस्थेतही तो जगतो. तो नियम्य आहे. जो नोकर आहे तो मालक कसा होईल?



www.madhaveeraghuveer.com

3 January 2017

WEDNESDAY

JUN '16

22

174-192 WK-25

देहतद्धर्मतत्कर्मतदवस्थादिसाक्षिणः।
सत एव स्वतःसिद्धं तद्वैलक्षण्यमात्मनः॥१५९॥

देह, त्याचे धर्म, त्याचे कर्म, त्याच्या अवस्था यांचा साक्षी असलेल्या सद्रूप आत्म्याचे वेगळेपण स्वतः सिद्धच आहे.

माझा हात, माझा डोळा तसेच माझे शरीर असा उल्लेख आपण करतो. म्हणजेच देह हा आत्म्याहून वेगळा आहे हे स्पष्टच आहे.

देहाचे धर्म — जन्म, मृत्यु आहेत. ते आत्म्याचे नाहीत. बाल्य, तारुण्य, वार्धक्य या देहाच्या अवस्था आहेत. आत्म्याला त्या नाहीत. हलणाऱ्या पाण्यात पडणारे सूर्याचे प्रतिबिंब हलले तरी सूर्य पूर्वीसारखाच राहतो. त्याचप्रमाणे देहाच्या अवस्था बदलल्या तरी मूळ आत्म्याला धक्का पोहोचत नाही. देहाची कर्मे देहच करतो. आत्म्याला ती करावी लागत नाहीत. मात्र आत्म्याच्या अस्तित्वाशिवाय ती घडतही नाहीत.

म्हणजे आत्म्याचे अस्तित्वच पुरेसे असते. या सर्व घडामोडींचा तो साक्षी ~~अवस्था~~ ~~फक्त~~ असतो. आणि साक्षी हा वेगळा, अलिप्त असतो.

शल्यराशिर्मांसलिप्तो मलपूर्णोऽतिकश्मलः।
कथं भवेदयं वेत्ता स्वयमेतद्विलक्षणः॥१६०॥

मांसाने वेढलेला, हाडांचा सापळा असलेला, मलयुक्त आणि अत्यंत निंद्य असा हा (अन्नमय कोश) वेगळा स्वयंसिद्ध आत्मा कसा बरे होईल?

निंद्य शरीर निर्मळ आत्मा कसा बरे असू शकेल? तो या सर्वांहून विलक्षण (भिन्न) आहे, तो सर्वांना जाणणारा सदाशुद्ध आत्मा आहे.

July 2016

| Mon | Tue | Wed | Thu | Fri | Sat | Sun | Mon | Tue | Wed | Thu | Fri | Sat | Sun | Mon | Tue | Wed | Thu | Fri | Sat | Sun |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 | 7 | 8 | 9 | 10 | 11 | 12 | 13 | 14 | 15 | 16 | 17 |
| 18 | 19 | 20 | 21 | 22 | 23 | 24 | 25 | 26 | 27 | 28 | 29 | 30 | 31 | | | | | | | |



www.madhavvairagi... (watermark)

त्वङ्मांसमेदोऽस्थिपुरीषराशौ
अहंमतिं मूढजनः करोति।
विलक्षणं वेत्ति विचारशीलो
निजस्वरूपं परमार्थभूतम्॥५६१॥

June 2016

| Mon | Tue | Wed | Thu | Fri | Sat | Sun | Mon | Tue | Wed | Thu | Fri | Sat | Sun | Mon | Tue | Wed | Thu | Fri | Sat | Sun |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 | 7 | 8 | 9 | 10 | 11 | 12 | 13 | 14 | 15 | 16 | 17 | 18 | 19 |
| 20 | 21 | 22 | 23 | 24 | 25 | 26 | 27 | 28 | 29 | 30 | | | | | | | | | | |



www.madhaveeraghuveer.com

देहात्मधीरेव नृणामसद्धियां
जन्मादिदुःखप्रभवस्य बीजम्।
यतस्ततस्त्वं जहि तां प्रयत्नात्
त्यक्ते तु चित्ते न पुनर्भवाशा ॥१६६

देहात्मबुद्धी ही असत्‌बुद्धी मनुष्याच्या जन्मादि दुःखाच्या उत्पत्तीचे कारण आहे. म्हणूनच तू तिचा प्रयत्नपूर्वक त्याग कर. तिचा त्याग केला असता पुनर्जन्माची भीती उरणार नाही.

अहंता, ममता ही दुःखाचे मूळ आहे. ती असत् (मिथ्या) आहे. म्हणून तिचा त्याग करण्याचा आग्रह आचार्य धरतात. देहच जर क्षणभंगुर असेल तर देहबुद्धी तरी फार काळ कशी टिकेल?

देह खरा मानला की पावलोपावली दुःख येणारच. देहाला इजा झाल्याचे दुःख, मृत्यूचे दुःख होतेच. हे ममत्व सोडून द्यायला सांगतात. परंतु हे सोडणे सहज शक्य नाही म्हणून प्रयत्नपूर्वक त्यागण्याचा आग्रह आचार्य धरतात. देहात्मबुद्धीच्या त्यागासाठी अगदी कडोनिकडीचे प्रयत्न हवेत.

या श्लोकात मागील १० श्लोकांचा उपसंहार केला आहे. देहतादात्म्याचा त्याग केला की सर्व दुःखे संपतात. मात्र त्यासाठी शास्त्राभ्यास किंवा युक्तिवाद उपयोगी पडत नाही. त्यासाठी प्रयत्न, आचरण व अभ्यास यांची मदत घ्यावी. आपण देह नसून परमोच्च सत्यतत्त्व आहोत याचा वेळोवेळी अभ्यास त्यावर चिंतन मनन, निदिध्यासन केले तर तो विचार चित्तामध्ये मूळ धरतो, ठसतो. अंतःकरणात वासना मुळीच शिल्लक रहात नाही. आणि ती व्यक्ती भवसागर पार करते.

June 2016

| Mon | Tue | Wed | Thu | Fri | Sat | Sun | Mon | Tue | Wed | Thu | Fri | Sat | Sun | Mon | Tue | Wed | Thu | Fri | Sat | Sun |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 | 7 | 8 | 9 | 10 | 11 | 12 | 13 | 14 | 15 | 16 | 17 | 18 | 19 |
| 20 | 21 | 22 | 23 | 24 | 25 | 26 | 27 | 28 | 29 | 30 | | | | | | | | | | |



Never give up, for that is just the place and time that the tide will turn.

www.madhaveeraghuveer.com

कर्मेन्द्रियैः पञ्चभिरञ्चितोऽयं
प्राणो भवेत् प्राणमयस्तु कोशः।
येनात्मवानन्नमयोऽनुपूर्णः
प्रवर्ततेऽसौ सकलक्रियासु॥१६७॥

पाच कर्मेंद्रियांनी युक्त असा हा प्राणच प्राणमय कोश ठरतो. ज्यामुळे हा अन्नमय कोश अन्नाने पूर्ण होऊन सर्व क्रियांमध्ये प्रवृत्त होतो.

हात, पाय, वाणी, जननेंद्रिय व गुद ही पाच कर्मेंद्रिये आहेत. यांच्या क्रियांमधून चैतन्याची अभिव्यक्ती होत असते. तिलाच 'प्राणमय कोश' म्हटले आहे. मागील श्लोकामध्ये वर्णन केलेला अन्नमय कोश हा प्राणमय कोशाने संपूर्णपणे व्याप्त असतो. अगदी पायाच्या करंगळीपासून ते मस्तकापर्यंत सर्व ठिकाणी प्राण आहेच.

थोडक्यात प्राणमय कोश हा अन्नमय कोशाचा आत्मा आहे. हे जीवनदायी आवरण आणि त्याचे चैतन्य यामुळेच देहाच्या सर्व क्रिया सुरु असतात. त्याचा एक भाग स्थूल देहाशी व दुसरा भाग सूक्ष्म देहाशी जोडलेला आहे. किंबहुना सूक्ष्म देहाला स्थूल देहाशी बांधून ठेवणारे ते माध्यम आहे.

नैवात्मापि प्राणमयो वायुविकारो
गन्ताऽगन्ता वायुवद् अन्तर्बहिरेषः।
यस्मात् किञ्चित् क्वापि न वेत्ति इष्टमनिष्टं
स्वं वान्यं वा किञ्चन नित्यं परतन्त्रः॥१६८॥

हा प्राणमय कोशही आत्मा नाही. वायुप्रमाणेच हा वायुचा विकार आत बाहेर जाणारा येणारा आहे. ज्यामुळे याला इष्ट-अनिष्ट, आपले-परके कळत नाही. हा परतंत्र आहे.



www.madhaveeraghuveer.com

(२०) — मनोमय कोश – १६९ ते १८५

पाच कर्मेंद्रिये व प्राण मिळून हा प्राणमय कोश बनतो. या प्राणमय कोशामुळेच अन्नमय कोश म्हणजेच स्थूल देह कार्यप्रवण होतो. हा प्रेरणा देणारा आहे. पण तरीसुद्धा तो आत्मा नाही. कारण

१. तो वायूचा विकार आहे.
२. तो सारखा आत बाहेर करत असतो
३. प्राणाला स्वातंत्र्य नाही. आपले – परके किंवा इष्ट – अनिष्ट समजून कार्य करण्याची मुभा नाही. तो परतंत्र आहे.

आत्मा मात्र परावलंबी नसून नित्यस्वतंत्र आहे.

वायु जेव्हा शरीरात असतो तेव्हा त्याला प्राण म्हणतात आणि जेव्हा शरीराबाहेर असतो तेव्हा त्याला वातावरणातील हवा म्हणतात.

प्राणाला स्वतःची किंवा दुसऱ्याची दुःखे समजत नाहीत तो स्वतः जड असल्याने त्याला स्वतःचे ज्ञान नसते.

ज्ञानेन्द्रियाणि च मनश्च मनोमयः स्यात्
कोशो ममाहमिति वस्तुविकल्पहेतुः ।
संज्ञादिभेदकलनाकलितो बलीयान्
तत्पूर्वकोशमनुपूर्य विजृम्भते यः ॥१६९॥

ज्ञानेंद्रिये आणि मन हा 'मी – माझे' इ. विकल्पांना कारणीभूत ठरणारा मनोमय कोश आहे. नामादि भेदांच्या जाणिवेने जो जाणता येतो तो पूर्वीच्या कोशांना व्यापून राहणारा बलशाली कोश आहे. मनामध्ये संकल्प – विकल्प होतात. आपपर भाव निर्माण करणारे हे मनच असते अन्नमय व प्राणमय या पूर्वकोशांना हा व्यापून राहतो. अन्नमय कोशाला तर मनाने व्यापलेले असतेच. परंतु



www.madhaveeraghuveer.com

प्राणाच्या कार्यावरही मनाचा प्रभाव पडतोच.
ज्ञानेंद्रिये ही खरे तर देहाला असतात. परंतु मन जेव्हा इतरत्र व्यग्र असेल तेव्हा विषय-वस्तू जरी ज्ञानेंद्रियांच्या टप्प्यात आली तरी त्यांचे ग्रहण आपण करू शकत नाही. म्हणजेच मन थाऱ्यावर नसेल तर इंद्रिय ज्ञानग्रहण शक्य नसते.
अहं - ममत्व या भावना मनोमय कोशामुळेच निर्माण होतात. आणि टिकूनही राहतात.

पञ्चेन्द्रियैः पञ्चभिरेव होतृभिः
प्रचीयमानो विषयाज्यधारया ।
जाज्वल्यमानो बहुवासनेन्धनैः
मनोमयाग्निर्दहति प्रपञ्चम ॥१७०॥

पंचेंद्रियरूप पाच होत्यांकडून विषयरूपी तुपाच्या धारेने जो वाढवला गेला आहे आणि नानाविध वासनारूपी इंधनाने जो प्रज्वलित केला गेला आहे तो मनोमय कोशरूपी अग्नि प्रपंचाला प्रज्वलित करतो.

मनोमय कोश हा यज्ञीय अग्नि
पंचेंद्रिये हे होते (हवनात भाग घेणारे)
विषय हे तुपाची आहुति
नानाविध वासना हे इंधन

ज्ञानेंद्रिये आवडत्या विषयात रमतात म्हणजेच विषयरूप तुपाची आहुति अग्नीत घालतात. ही आहुति मिळाली आणि वासनारूपी इंधन मिळाले की हा मनोमय कोशरूपी अग्नि प्रज्वलित होतो. प्रपंच फुलवतो. म्हणजेच संसाराचा पसारा वाढवतो आणि हे जन्म-मृत्यूचे संसरण सुरूच राहते.

July 2016

| Mon | Tue | Wed | Thu | Fri | Sat | Sun | Mon | Tue | Wed | Thu | Fri | Sat | Sun | Mon | Tue | Wed | Thu | Fri | Sat | Sun |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 | 7 | 8 | 9 | 10 | 11 | 12 | 13 | 14 | 15 | 16 | 17 |
| 18 | 19 | 20 | 21 | 22 | 23 | 24 | 25 | 26 | 27 | 28 | 29 | 30 | 31 | | | | | | | |



www.madhaveeraghuveer.com

न ह्यस्त्यविद्या मनसोऽतिरिक्ता
मनो ह्यविद्या भवबन्धहेतुः ।
तस्मिन्विनष्टे सकलं विनष्टं
विजृम्भितेऽस्मिन्सकलं विजृम्भते ॥१५७

मनाहून वेगळी अविद्या नाही. कारण मन हेच भवबंधाला कारणीभूत ठरणारी अविद्या आहे. ते नष्ट झाले की सर्व काही नाश पावते आणि ते पसरत गेले की सर्व काही पसरत जाते.

भवबंधाला कारणीभूत होणारी अविद्या असे आचार्य इथे मनाला म्हणतात. अविद्या म्हणजे अज्ञान) म्हणजेच एका वस्तूच्या दुसऱ्या वस्तूचा भास होणे. त्या वस्तुविषयी निर्माण झालेला विकल्प! आणि मनच संकल्प-विकल्प निर्माण करते आणि म्हणूनच भास निर्माण करणाऱ्या मनालाच इथे 'अविद्या' म्हणतात.

तसेच मन बंधाला कारण ठरते. माझे घर माझी पत्नी, माझा पैसा असे करत करत मन त्यांना चिकटत असते. त्यातून आसक्ती व त्यातून बंध निर्माण होत असतो.

मनाचा हा भास संपला की विश्व नष्ट होते आणि मनाचा भास दृढ होत गेला की विश्वाचा पसारा वाढतो.

जेव्हा मनाचा निरास होतो तेव्हा इंद्रियजन्य ज्ञान आणि मर्त्यपणाची भावना संपून जाते, जेव्हा ते मन तल्लीन होते तेव्हा संपूर्ण जग प्रकाशित होते.

त्यासाठी - या भवाच्या पलीकडे जाण्यासाठी - मनाचे संयमन केले पाहिजे व मनाच्या अंतरात गेले पाहिजे. विषय वस्तूपासून दूर गेले पाहिजे, श्रुतीग्रंथांचा अभ्यास व चिंतन घडले पाहिजे. अशाने सत्वगुणाचे प्राबल्य वाढते आणि माया हुसकावून लावली जाते. मग त्या व्यक्तीला सत्यस्वरूपाचे आकलन होते.

www.madhaveeraghuveer.com

स्वप्नेऽर्थशून्ये सृजति स्वशक्त्या
भोक्त्रादि विश्वं मन एव सर्वम्।
तथैव जाग्रत्यपि नो विशेषः
स्तत्सर्वमेतन्मनसो विजृम्भणम् ॥१७८॥

अर्थशून्य स्वप्नात मनच स्वसामर्थ्याने भोक्ता इ. सर्व विश्व निर्माण करते, तसेच जागृतीत विशेष काही घडत नाही. तेव्हा हा सर्व मनाचा पसारा आहे.

मन स्वसामर्थ्याने स्वप्नात रंकाला राजा बनवते. अतर्क्य घटना मन तयार करते. अपंग मनुष्य शर्यतीत पहिला येतो. पण हे स्वप्नातील विश्व अळवावरचे पाणी आहे. क्षणभंगुर आहे. स्वप्न संपले की ते नाहीसे होते.

ही स्वप्नावस्था आपण सर्वजण अनुभवतो आणि त्यामुळे हा अनुभव पटतो. परंतु आचार्यांच्या दृष्टीने जागृतावस्था ही सुध्दा यापेक्षा फारशी वेगळी नाही. दृश्य विश्व हाही अज्ञानामुळे मनाला होणारा भास आहे. खरे तर सर्व चराचर परब्रह्माने व्यापले असूनसुध्दा आपल्याला तिथे विश्व भासते. स्वप्नातील विश्वाप्रमाणेच हे विश्व देखील नष्ट होणारे आहे. स्वप्नसृष्टी आणि दृश्य विश्व दोन्हीही मनाचे खेळच आहेत.

स्वप्नामध्ये मन हेच स्वप्नकर्ता, मन हेच स्वप्नदृश्य आणि मन हेच स्वप्नातील सुखदुःखांचे अनुभव होत असते.

याच प्रकारे जागृतावस्था ही देखील सत्य नाही. जागृतावस्थेत पाहिलेले आणि वरकरणी खरे वाटणारे विश्व हा निव्वळ बुडबुडा/भ्रम आहे. आपण जे पहात असतो ते आपल्याच मनाचे प्रक्षेपण असतो. मनाला थांबवा की जगाचा शेवट होतो.

∴ मनाला थांबवा. ते विश्व गुंडाळा आणि आपल्या कायेत ते रचाच्या आसनासारखे वाळा आणि आत अंतर्यामी पहा. दुसऱ्या जगात पदार्पण करा.

July 2016

| Mon | Tue | Wed | Thu | Fri | Sat | Sun | Mon | Tue | Wed | Thu | Fri | Sat | Sun | Mon | Tue | Wed | Thu | Fri | Sat | Sun |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 | 7 | 8 | 9 | 10 | 11 | 12 | 13 | 14 | 15 | 16 | 17 |
| 18 | 19 | 20 | 21 | 22 | 23 | 24 | 25 | 26 | 27 | 28 | 29 | 30 | 31 | | | | | | | |



www.madhavaeeraghuveer.com

Notes

सुषुप्तिकाले मनसि प्रलीने
नैवास्ति किञ्चित्सकलप्रसिद्धेः ।
अतो मनःकल्पित एव पुंसः
संसार एतस्य न वस्तुतोऽस्ति ॥१७३॥

सुषुप्ति अवस्थेत मन लीन झाले असता काहीच असत नाही हे सर्व प्रसिद्ध आहे म्हणून या जीवाचा संसार हा मनःकल्पितच आहे, खराखुरा नाही.

स्वप्न व जागृती या दोन्ही अवस्थांमध्ये मन कार्यरत असते आणि त्याचाच सारा खेळ सुरु असतो. तिसऱ्या सुषुप्ति अवस्थेत मात्र मनाचा लय होत असल्यामुळे ते कार्यरत नसते तिथे संकल्प-विकल्प थांबतात. आणि अर्थातच त्यावर आधारित असणारे भास नसतात. साहजिकच तेव्हा स्वप्नसृष्टी व दृश्यविश्व यापैकी काहीच अस्तित्वात असत नाही. म्हणून आचार्य म्हणतात की संसार किंवा विश्व हे मनःकल्पितच आहे.

वायुनानीयते मेघः पुनस्तेनैव नीयते ।
मनसा कल्प्यते बन्धो मोक्षस्तेनैव कल्प्यते ॥

वाऱ्याकडून मेघ आणला जातो. पुन्हा त्याच्याकडूनच तो नेला जातो. मनामुळेच बंध निर्माण होतो व त्याच मनाने मोक्षदेखील प्राप्त होतो.

त्यासाठी निसर्गातील एक दृष्टांत आचार्य देतात. मेघाचा 'हर्ता व कर्ता' वाराच आहे. मनही असेच असते. तेच बंध निर्माण करते व तेच बंध दूरदेखील करते. मन एव मनुष्याणां कारणं बन्धमोक्षयोः ।

व्यापारी व उंट — उंटाला बांधायची दोरी तो मागील गावात विसरतो. तेव्हा केवळ अभिनय करुन तो उंटाला बांधतो. व दुसऱ्या दिवशी दोरी सोडण्याचा अभिनय करतो.

देहादिसर्वविषये परिकल्प्य रागं
बध्नाति तेन पुरुषं पशुवद्गुणेन ।
वैरस्यमत्र विषवत्सुविधाय पश्चाद्
एनं विमोचयति तन्मन एव बन्धात् ॥

हे मनच देहादि सर्व विषयांमध्ये आसक्ती उत्पन्न करून त्यायोगे पशूला दोरीने बांधावे त्याप्रमाणे पुरुषाला बांधून टाकते आणि नंतर याच विषवत् विषयांमध्ये वैराग्य निर्माण करून त्याला बंधानून सोडवते.

पशूला दावणीला बांधावे तसे मन जीवाला जन्म-मृत्यु चक्राला बांधून ठेवते. पशू जसा दोरीने जखडला जातो तसाच जीव मनामुळे विश्वाच्या पसाऱ्यात सापडतो. अपरिहार्य भ्रमंतीत (जन्म-मृत्यु) अडकतो. आचार्यांचे हे वर्णन मोठे मार्मिक आहे.

तस्मान्मनः कारणमस्य जन्तोः
बन्धस्य मोक्षस्य च वा विधाने ।
बन्धस्य हेतुर्मलिनं रजोगुणैः
मोक्षस्य शुद्धं विरजस्तमस्कम् ॥१७६॥

म्हणून मन हेच या मनुष्यप्राण्याच्या बंधाच्या वा मोक्षाच्या अवस्थेचे कारण आहे. रजोगुणांनी मलिन झालेले मन बंधाचे कारण तर रजतमरहित शुद्ध मन हे मोक्षाचे कारण आहे.

मन हे त्रिगुणांनी युक्त असते. रजोगुण प्रभावी असलेले मन हे बंधाला कारणीभूत ठरते. तर सत्त्व गुणांचा प्रकर्ष ज्या मनामध्ये होतो ते मन मोक्षाला कारण ठरते.



www.madhaveeraghuveer.com

विवेकवैराग्य गुणातिरेकात्
शुद्धत्वमासाद्य मनो विमुक्त्यै ।
भवत्यतो बुद्धिमतो मुमुक्षोः
ताभ्यां दृढाभ्यां भवितव्यमग्रे ॥ १८०॥

विवेकवैराग्यगुणांच्या उत्कर्षाने शुद्धत्व प्राप्त करून मन मुक्तीला कारणीभूत होते. म्हणून बुद्धिमान मुमुक्षूने ते दोन्ही गुण दृढ करून पुढे जायला हवे.

विवेक व वैराग्य यांचा प्रकर्ष झाला की मन शुद्ध होते. जोवर भौतिक विषयांची अभिलाषा मनात आहे तोवर मन मलीनच असणार. विषयांविषयी जेव्हा तिरस्कार, घृणा निर्माण होईल तेव्हा त्याविषयी ओढ वाटणार नाही; ते मिळवण्यासाठी तळमळणार नाही. आणि मग आपोआपच मनावरील रजतमाचा प्रभाव कमी होईल. मन शुद्ध सात्विक होईल.

क्षणिक सुखं देणाऱ्या वस्तु कधीच नित्य टिकत नाहीत. शाश्वत व अशाश्वत यातील फरक समजू लागला की अशाश्वताची ओढ नाहीशी होते. असा भेद समजणे (योग्य - अयोग्य, नित्य - अनित्य चांगले वाईट, मधुमय - विषमय) म्हणजेच विवेक होय.
अशा शुद्धचित्त माणसालाच मुक्ति मिळते.

August 2016

| Mon | Tue | Wed | Thu | Fri | Sat | Sun | Mon | Tue | Wed | Thu | Fri | Sat | Sun | Mon | Tue | Wed | Thu | Fri | Sat | Sun |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 | 7 | 8 | 9 | 10 | 11 | 12 | 13 | 14 | 15 | 16 | 17 | 18 | 19 | 20 | 21 |
| 22 | 23 | 24 | 25 | 26 | 27 | 28 | 29 | 30 | 31 | | | | | | | | | | | |

मनो नाम महाव्याघ्रो विषयारण्यभूमिषु।
चरत्यत्र न गच्छन्तु साधवो ये मुमुक्षवः ॥१९८॥

मन नामक मोठा वाघ इथे विषयरूपी वन-प्रदेशात फिरत असतो. जे सज्जन मुमुक्षु आहेत त्यांनी तिकडे जाऊ नये.

वाघ जसा घनदाट अरण्यात फिरत असताना सहजी हाती येत नाही तसेच मन हे विषयांच्या अरण्यात भ्रमण करत असताना सहजासहजी नियंत्रणाखाली येत नाही.

जे मोक्षमंदिराच्या यात्रेवर निघाले आहेत त्यांच्यासाठी रस्त्यावर एक सूचनाफलक लावला पाहिजे— "मार्ग धोक्याचा आहे. मन नावाचा नरभक्षक वाघ मोकाट सुटला आहे. तेव्हा वळण घ्या. येथेच आणि आत्ताच."

जे साधना करतात, त्यांनी आपल्या मनाच्या बाबतीत सावध असावे. परंतु आत्मसंयमनाच्या शस्त्रागारांच्या फटीतून निसटून जाण्याची मनाची क्षमता असते. त्यासाठी उपाय म्हणजे साधकांनी विवेक आणि वैराग्य मार्गाला परिश्रमपूर्वक व अविरतपणे चिकटून राहिले पाहिजे. कधीच ढिले पडू नका. नाहीतर मन तुमचा ताबा घेईल.

मन हे परमेश्वराने दिलेले उपकरण आहे आणि स्वभावतः ते विषयवस्तूकडे धाव घेते. पण तरीसुद्धा आपण सावध आणि साक्षी म्हणून राहिलो तर [illegible]

July 2016

| Mon | Tue | Wed | Thu | Fri | Sat | Sun | Mon | Tue | Wed | Thu | Fri | Sat | Sun | Mon | Tue | Wed | Thu | Fri | Sat | Sun |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 | 7 | 8 | 9 | 10 | 11 | 12 | 13 | 14 | 15 | 16 | 17 |
| 18 | 19 | 20 | 21 | 22 | 23 | 24 | 25 | 26 | 27 | 28 | 29 | 30 | 31 | | | | | | | |


Luck usually comes to those who are too busy to be looking for it.

www.madhaveeraghuveer.com

मनः प्रसूते विषयानशेषान्
स्थूलात्मना सूक्ष्मतया च भोक्तुः।
शरीरवर्णाश्रमजातिभेदान्
गुणक्रियाहेतुफलानि नित्यम्॥१७९॥

मनच विश्वातील सर्व स्थूल-सूक्ष्म विषयांना, शरीर वर्ण, आश्रम, जाती इ० भेदांना आणि गुण, क्रिया, हेतू आणि फलादींना भोक्त्यासाठी निर्माण करते.

यापैकी वर्ण, आश्रम, जाती हे स्थूलशरीराशी निगडित विषय आहेत. तर गुण, क्रिया, कर्मफले हे सूक्ष्मशरीराशी संबंधित विषय आहेत. या दोन्ही शरीराचे विषय मनच निर्माण करते. हे स्थूलात्मना सूक्ष्मतया या शब्दावरून स्पष्ट होते.

माणूस जन्माला येतो तेव्हा कोणत्याही जातीवर्णाचा नसतो. हे वर्ण धर्म जाती माणसातील भेदाचे निदर्शक आहेत. आपल्यापेक्षा वेगळा आचार, विचार, उच्चार आढळला की मन त्याची नोंद घेते व त्याला वेगळा समजते. जगात सर्वत्र वर्णविद्वेष आढळतो. कातडीच्या रंगावरून उद्रेक होतात. (परदेशात)

खरं तर माणसामाणसातील चैतन्य एकसारखेच असते. त्यात फरक नाही. जर्मन खेळाडू गौरवर्णीय बोरिस बेकर आणि त्याची कृष्णवर्णीय प्रेयसी-बार्बरा भेद असतो तो मनात! त्यावर लगेच बोट ठेवले जाते. अगदी चारभेद (देशस्थ-कोकणस्थ) मानतात.

त्याचप्रमाणे क्रियांचा संबंध सूक्ष्मशरीराशी आहे. अमुक एक कर्म विशिष्ट व्यक्तीने, विशिष्ट पद्धतीनेच करावे ही देखील मनाचीच कल्पना असते. अगदी पुण्य कर्म-स्वर्ग आणि पापकर्म-नरक हे सुद्धा मनोनिर्मित आहे. प्रत्यक्ष स्वर्ग-नरक दाखवता येत नाही.

या सर्व भोक्त्यासाठी आहेत.

August 2016

| Mon | Tue | Wed | Thu | Fri | Sat | Sun | Mon | Tue | Wed | Thu | Fri | Sat | Sun | Mon | Tue | Wed | Thu | Fri | Sat | Sun |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 | 7 | 8 | 9 | 10 | 11 | 12 | 13 | 14 | 15 | 16 | 17 | 18 | 19 | 20 | 21 |
| 22 | 23 | 24 | 25 | 26 | 27 | 28 | 29 | 30 | 31 | | | | | | | | | | | |



www.madhavvairagi.com

असङ्गचिद्रूपममुं विमोह्य
देहेन्द्रियप्राणगुणैर्निबध्य ।
अहं ममेति भ्रमयत्यजस्रं
मनः स्वकृत्येषु फलोपभुक्तिषु ॥१८०॥

या असंग, चिद्घन आत्म्याला मोहात पाडून देह इंद्रिये, प्राण इ० च्या गुणांनी बांधून मनच 'मी-माझे' या भावनेने आपल्या कर्मांमध्ये व त्यांच्या फलांच्या उपभोगामध्ये अविरत फिरत असते.

आत्मा मूळचा निःसंग आणि चैतन्यरूप असला तरी मन त्याला भूल पाडते. म्हणजे कर्माचे कर्तृत्व आणि भोक्तृत्व आत्म्याकडे असल्याचा भ्रम होतो. जीवाच्या ठिकाणी अहंभाव निर्माण होतो.

(एक मुनी - विरक्त — कुरतडणारी मांजर - उंदराच्या बंदोबस्ता — मांजर — दुधासाठी म्हैस - चाऱ्यासाठी शेती - राखणीसाठी पत्नी

अशा अनेक कर्मात तो अडकतो व मनामुळेच)

मन विविध उपाधींनी जीवाला बंधनात टाकते.

कर्मामधील मनाची 'अहं' वृत्ती, विषयोपभोगातील त्याची माझेपणाची भावना हेच मनोमय कोशाने निर्माण केलेले भ्रम आहेत.

अध्यासदोषात्पुरुषस्य संसृतिः
अध्यासबन्धस्त्वमुनैव कल्पितः ।
रजस्तमोदोषवतोऽविवेकिनो
जन्मादिदुःखस्य निदानमेतत् ॥१८१॥

अध्यासदोषामुळेच पुरुषाला जन्म-मरण चक्र लाभते पण अध्यासाचा बंध देखील या मनानेच कल्पिला आहे तसेच रज, तम इ० दोषांनी अविवेकी माणसाच्या

July 2016

| Mon | Tue | Wed | Thu | Fri | Sat | Sun | Mon | Tue | Wed | Thu | Fri | Sat | Sun | Mon | Tue | Wed | Thu | Fri | Sat | Sun |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 | 7 | 8 | 9 | 10 | 11 | 12 | 13 | 14 | 15 | 16 | 17 |
| 18 | 19 | 20 | 21 | 22 | 23 | 24 | 25 | 26 | 27 | 28 | 29 | 30 | 31 | | | | | | | |



Loneliness comes when one forget that God is the supreme companion.

www.madhavpeeraghuveer.com

जन्म आदि दुःखांचे मूळ कारणच हे आहे.

जीवाला जन्ममृत्युच्या चक्रात फिरावे लागते ते अध्यास दोषामुळेच। अध्यास म्हणजे भास दोरीवर सर्पाचा भास होतो त्याप्रमाणे ब्रह्मावर जगताचा भास होतो. हा भास घातक आहे.

हा भास जीवाला बद्ध करतो, जखडून टाकतो. आचार्य म्हणतात ——— अमुना (मनसा) एव कल्पित:। भास हा मनाच्या विकल्पावर अवलंबून आहे म्हणूनच मन: कल्पित आहे.

हा भास रजतमादि गुणांनी युक्त - अविवेकी माणसांना होतो. इथे आत्मानात्म विवेक नसलेले लोक अभिप्रेत आहेत. जे नित्य-अनित्य, सत्य असत्य जाणत नाहीत

ब्रह्माचे खरे स्वरूप ज्यांना ठाऊक आहे अशा लोकांना हा भास होणार नाही. रत्नपारखी असलेला मनुष्य काचेला हिरा समजणार नाही. शास्त्रीय संगीताची जाण असणारा कधी ग्राम्य संगीताला स्वर्गीय गाणं म्हणणार नाही. घोड्याची परीक्षा असणारा आई व कमीतील भेद चटकन ओळखेल.

मात्र ज्याला ज्ञान नाही (अविवेकी) त्याच्या दृष्टीने सर्व घोडे सारखेच असतील.

थोडक्यात म्हणजे अविवेकी माणसाच्या दृष्टीने जन्म, जरा व मृत्यु आदी दुःखांना मनच कारण आहे.

अत: प्राहुर्मनोऽविद्यां पण्डितास्तत्त्वदर्शिन:।
येनैव भ्राम्यते विश्वं वायुनेवाभ्रमण्डलम् ॥१८०॥

म्हणून तत्त्वज्ञानी पंडित मनालाच अविद्या म्हणतात. वाऱ्यामुळे जसे मेघमंडळ तसे या मनामुळे विश्व फिरवले जाते.

मोक्षैकसक्त्या विषयेषु रागं
निर्मूल्य संन्यस्य च सर्वकर्म।
सच्छ्रद्धया यः श्रवणादिनिष्ठो
रजः स्वभावं स धुनोति बुद्धेः ॥३६८॥

मोक्षाच्या एकमेव ओढीने विषयांतील प्रेम समूळ नष्ट करून व सर्व कर्मांचा त्याग करून जो श्रद्धेने श्रवणादींवर निष्ठा ठेवतो तो बुद्धीच्या रजोगुणयुक्त स्वभावाचा नाहीसा करतो.

मनशुद्धीची आवश्यकता सांगून झाल्यावर आचार्य मन शुद्ध कसे करावे ते सांगतात.

त्यासाठी पहिली महत्वाची गोष्ट म्हणजे चित्ताची एकाग्रता! 'मोक्ष' या एकाच गोष्टीचा ध्यास घ्यायला हवा. इतर कोणत्याही गोष्टीची ओढ उठू नये. अर्जुन - पोपटाचा डोळा.

मनुष्य सर्वकर्मांतून अलिप्त होईल तेव्हा विषयांची ओढ नाहीशी होईल. आणि शास्त्रग्रंथांचे श्रवण केल्यावर विषयोपभोगातील दोष जाणवतील. मात्र श्रवण हे श्रद्धापूर्वक व्हायला हवे. आणि नुसते श्रवण उपयोगाचे नाही तर पाठोपाठ मनन - निदिध्यासन घडायला हवे. मनन केले की आपोआप आत्मस्वरूप जाणून घ्यायचा ध्यास लागतो. हा ध्यासही वाढत जायला हवा. अळीला भ्रमराचा ध्यास लागतो तेव्हा ती भ्रमरच होऊन जाते. थोडक्यात ज्याचा ध्यास लागतो त्याच्याशी तो तन्मय होऊन जातो.

एका काळ्या कुरूप स्त्रीने सुंदर बालकाच्या चित्राचा ध्यास घेतला आणि तिने तशाच गोंडस बाळाला जन्म दिला.
रोमजवळील खेडे — लहान मुलगा — पुतळ्यासारख्या चेहऱ्याचा ध्यास — आकस्मिक अवलोकन — अनेक वर्षांनी त्याचा चेहरा पुतळ्यासारखा झाला. उदा. — स्वातंत्र्य.

August 2016

| Mon | Tue | Wed | Thu | Fri | Sat | Sun | Mon | Tue | Wed | Thu | Fri | Sat | Sun | Mon | Tue | Wed | Thu | Fri | Sat | Sun |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 | 7 | 8 | 9 | 10 | 11 | 12 | 13 | 14 | 15 | 16 | 17 | 18 | 19 | 20 | 21 |
| 22 | 23 | 24 | 25 | 26 | 27 | 28 | 29 | 30 | 31 | | | | | | | | | | | |

आत्मस्वरूपाविषयी सुद्धा असेच घडते. सरूपता मुक्ती — लाभते. उद्धव-श्रीकृष्ण सारखेच दिसू लागले. पती-पत्नी देखील अनेक वर्षांच्या साहचर्याने सारखेच दिसायला लागतात.

हे श्रवणादि उपाय उपनिषदांतदेखील सांगितले आहेत आत्मा वा अरे श्रोतव्य: मन्तव्य: निदिध्यासितव्य: । असे मनाचे सामर्थ्य विविध प्रकारे वर्णन करून आचार्य सांगतात की मनोमयकोश म्हणजे आत्मा नव्हे.

गीतेतील सिद्धांतानुसार मनुष्य क्षणभरदेखील कर्म न करता राहू शकत नाही. मग कर्मातून अलिप्त कसे व्हायचे?

समर्पण भावाने, अहंकाररहित होऊन, फलाशा न बाळगता जेव्हा उत्कृष्ट कर्मे करतो तेव्हा शिल्लक असलेल्या वासना संपतात. आणि नवीन वासना निर्माण होत नाहीत. त्यानंतर मन अतिशय शांत व अविचलित होत जाते. त्यामुळे त्याची चिंतनशीलता वाढते आणि त्यातून आकलनशक्ती वाढते. श्रवणाभ्यासाने तो व्यक्ती 'मी कर्ता' हा अहंकाराची भावना काढून टाकू शकतो. आणि यातूनच बुद्धीतून रजोगुण पूर्णपणे काढून टाकला जातो. मन व बुद्धी अधिकाधिक शुद्ध होत जातात. आणि अशा वेळी मोक्ष फार दूर रहात नाही. जणू हाताच्या तळव्यावर ठेवलेले फळच असते. त्याने केवळ आस्वाद घ्यायचा असतो.

मनोमयो नापि भवेत्परात्मा
ह्याद्यन्तवत्त्वात्परिणामिभावात् ।
दुःखात्मकत्वाद्विषयत्वहेतो-
र्द्रष्टा हि दृश्यात्मतया न दृष्टः ॥१८५॥

July 2016

| Mon | Tue | Wed | Thu | Fri | Sat | Sun | Mon | Tue | Wed | Thu | Fri | Sat | Sun | Mon | Tue | Wed | Thu | Fri | Sat | Sun |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 | 7 | 8 | 9 | 10 | 11 | 12 | 13 | 14 | 15 | 16 | 17 |
| 18 | 19 | 20 | 21 | 22 | 23 | 24 | 25 | 26 | 27 | 28 | 29 | 30 | 31 | | | | | | | |

मनोमय कोश हा आधीच्या कोशांपेक्षा सूक्ष्म आणि व्यापक आहे. तो त्या सर्वांना व्यापून पुन्हा शिल्लक राहतो. हे जरी खरे असले तरीही तो म्हणजे आत्मा नाही. कारण →

१. मनोमय कोशाला आदि अंत आहे. आत्म्याला नाही. मन / ज्ञानेंद्रिये कशापासून तरी निर्माण होतात. मात्र आत्मा कशापासूनही निर्माण होत नाही म्हणून त्याला अंत नाही. (सुषुप्तिमध्ये मनाचे कार्य थांबते.)

२. मनोमय कोशात विकार आहेत. मुळात मन हेच संकल्पविकल्पातून विकार निर्माण करणारे आहे तर आत्मा निर्विकार आहे. (मन चंचल — आनंदी / दुःखी)

३. मनोमय कोश दुःखरूप आहे. दुःखाचा निर्माता आहे. मन विषयांकडे धावते आणि त्याच्या प्रेरणेने इंद्रिये विषयात कार्यरत होतात. परंतु आत्मा मात्र विषयात्मक किंवा दुःखरूप नाही. तो नित्य निर्विषय आणि सच्चिदानंदरूप आहे. ———

४. मनोमय कोश हा दृश्य विश्वाचा भाग आहे. कारण त्यावर नियंत्रण ठेवणारा किंवा त्याच्या कार्याचा साक्षी कुणीतरी असतो. आत्मा मात्र असा परतंत्र नाही. त्याचा कोणीही साक्षी नाही. तर तो चराचराचा साक्षी आहे.

अशा साक्षी, द्रष्टा, ज्ञाता असणाऱ्या आत्म्याला कोण पाहू शकेल? यावरून हेच सिद्ध होते की मनोमय कोश हा आत्म्याहून वेगळा आहे. तो विनाशी / नश्वर आहे.

मन हे जेव्हा आनंदी असते तेव्हा देखील त्याला परिवर्तनाची भीती असते. जीवनात ही घडी - - - - -

मनोमय कोशाची व्याख्या आणि स्पष्टीकरण करताना आचार्यांनी १६ श्लोकांद्वारे विस्तृत विवेचन केले आहे.

August 2016

| Mon | Tue | Wed | Thu | Fri | Sat | Sun | Mon | Tue | Wed | Thu | Fri | Sat | Sun | Mon | Tue | Wed | Thu | Fri | Sat | Sun |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 | **7** | 8 | 9 | 10 | 11 | 12 | 13 | **14** | 15 | 16 | 17 | 18 | 19 | 20 | **21** |
| 22 | 23 | 24 | 25 | 26 | 27 | **28** | 29 | 30 | 31 | | | | | | | | | | | |

MONDAY
JUL '16
11
193-173 WK-28

बुद्धिर्बुद्धीन्द्रियैः सार्धं सवृत्तिः कर्तृलक्षणः ।
विज्ञानमयकोशः स्यात्पुंसः संसारकारणम् ॥१८६॥

वृत्तींसह बुध्दी आणि ज्ञानेंद्रिये यांनी युक्त मी कर्ता असे मानणारा विज्ञानमय कोशच माणसाच्या संसरणाचे कारण ठरेल.

सवृत्तिः बुध्दिः असा शब्द आचार्य वापरतात. इथे ४ अंतःकरणाच्या ४ वृत्ति अभिप्रेत आहेत. म्हणजे

१. अहंकार किंवा ममत्व  २. संकल्प-विकल्प
३. अनुसंधान  ४. निश्चय करणे

या ४ वृत्ति तर आहेतच परंतु याव्यतिरिक्त आणखी काही त्रिगुणांच्या वृत्ति कार्यरत असतात.

या सर्व वृत्ति + बुध्दी ज्ञानेंद्रिये = विज्ञानमय कोश

अहंकाराने वेढलेली बुध्दी कर्तृत्वाचा अभिमान देते आणि आसक्तीपूर्वक केलेली कर्मे जीवाला जन्म-मरणाच्या चक्रात वारंवार लोटत असतात.

आणि म्हणूनच ही बुध्दी ज्या कोशाचा मुख्य घटक आहे त्या विज्ञानमय कोशाला संसारकारण म्हणतात.

मानवामध्ये असणाऱ्या अनंत सत्यतत्त्वाला आवरण पडते ते या विज्ञानमय कोशाचे! यातून कर्तृत्वाभिमान वाढत जातो. वासना वाढत जातात. आणि वासना शिल्लक राहिल्या की पुन्हा जन्म-पुन्हा मरण या चक्रातून सुटकाच होत नाही.

अनुव्रजच्चित्प्रतिबिम्बशक्तिः
विज्ञानसंज्ञः प्रकृतेर्विकारः ।
ज्ञानक्रियावानहमित्यजस्रं
देहेन्द्रियादिष्वभिमन्यते भृशम् ॥१८७॥

July 2016

| Mon | Tue | Wed | Thu | Fri | Sat | Sun | Mon | Tue | Wed | Thu | Fri | Sat | Sun | Mon | Tue | Wed | Thu | Fri | Sat | Sun |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 | 7 | 8 | 9 | 10 | 11 | 12 | 13 | 14 | 15 | 16 | 17 |
| 18 | 19 | 20 | 21 | 22 | 23 | 24 | 25 | 26 | 27 | 28 | 29 | 30 | 31 | | | | | | | |


If you are not sure where you are going, you'll probably end up nowhere.

चित्प्रतिबिंबशक्तीचे जो अनुसरण करतो असा हा प्रकृतीचा विज्ञान नामक विकार आहे. ज्ञानक्रियाशक्तिसंपन्न असा हा कोशदेह, इंद्रिये इ० च्या ठायी सदैव 'मी' असा आत्यंतिक अभिमान बाळगतो.

स्थूल, सूक्ष्म अन्नमय, प्राणमय, मनोमय कोशां-प्रमाणेच हा विज्ञानमय कोशही मायेचा विकार आहे. तो मायेमुळेच भासतो, म्हणूनच तो अविकारी ब्रह्माहून निराळा आहे. तो काय करतो?

तर बुद्धीत पडणाऱ्या चित्प्रतिबिंबाचे अनुसरण करतो. चिदाभासालाच आपले स्वरूप मानतो. आणि स्वतःला कर्ता व ज्ञाता मानतो. वाघाचे कातडे पांघरलेल्या गाढवासारखेच त्याची गत होते.

अनुव्रज या शब्दातून अभिमानाचा प्रकर्ष सुचविला आहे. या विज्ञानमय कोशालाच 'जीव' अशी संज्ञा आचार्य पुढील श्लोकामध्ये देतात.

व्रज म्हणजे भटकणे. अनु + व्रज म्हणजे पावलावर पाऊल टेकून अनुसरणारे असे!

जाणिवतत्त्व हे सर्वदा, सर्वकाळी सर्वव्यापक असते. विद्युत शक्ती जशी बल्बमध्ये प्रतिबिंबित होते तेव्हा प्रकाश देते. पंख्यातून फिरते. फ्रीजमधून गारवा देते. हीटरमधून उष्णता देते. त्याचप्रमाणे हे जाणिवतत्त्व जेव्हा बुद्धीमधून प्रतिबिंबित होते तेव्हा ते चित् असते.

ही बुद्धी पुढे ज्ञानेंद्रियांशी, देहाशी तादात्म्य पावते. त्यातून अहंता - ममता वाढते. ती आपल्या अंतःकरणात प्रवेश करते. विवेकशक्तीला नागवते, आणि आपल्याला मर्यादांशी बांधून टाकते. मानव जर या आवरणापासून मुक्त झाला तर तो अहंता व ममता यापासून दूर होऊ शकेल.

www.madhaveeraghuveer.com

August 2016

| Mon | Tue | Wed | Thu | Fri | Sat | Sun | Mon | Tue | Wed | Thu | Fri | Sat | Sun | Mon | Tue | Wed | Thu | Fri | Sat | Sun |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 | 7 | 8 | 9 | 10 | 11 | 12 | 13 | 14 | 15 | 16 | 17 | 18 | 19 | 20 | 21 |
| 22 | 23 | 24 | 25 | 26 | 27 | 28 | 29 | 30 | 31 | | | | | | | | | | | |

If you keep your vision elevated, your chin will automatically keep up.

अनादिकालोऽयमहंस्वभावो
जीवः समस्तव्यवहारवोढा।
करोति कर्माण्यनुपूर्ववासनः
पुण्यान्यपुण्यानि च तत्फलानि॥

भुङ्क्ते विचित्रास्वपि योनिषु व्रजन्
नायाति निर्यात्यध ऊर्ध्वमेषः।
अस्यैव विज्ञानमयस्य जाग्रत्
स्वप्नाद्यवस्थाः सुखदुःखभोगः॥१८८॥

हा अनादि, अहंस्वभावरूप जीव सर्वव्यवहार करणारा आहे. हा आपल्या पूर्ववासनानुसार पुण्य वा पापकृत्ये करतो आणि त्यांची फळे भोगतो.

विविधयोनींमध्ये भ्रमण करणारा हा (जीव) खाली येतो, वर जातो. जागृती, स्वप्न, सुषुप्ती, या अवस्था, सुखदुःखादि भोग या विज्ञानमयाचेच आहेत.

विज्ञानमयकोशालाच इथे जीव म्हणून वर्णन करतात. जीव हा अहंस्वभाव आहे. 'मी माझे' करणे हा त्याचा उपजत स्वभाव आहे.

पूर्व कर्मांच्या संस्कारानुसार हा पाप/पुण्य करतो व त्यांचे चांगले/वाईट फळ भोगतो. आणि त्या फळानुसार विविध योनीत (उच्च-नीच) जन्म घेतो.

कधी किडा मुंगी सारख्या नीच योनीत तर कधी थोर महात्म्यांच्या उच्च कोटीत जन्म घेतो.

अहम् ही संकल्पनाच अनादि आहे. विश्व निर्मितीच्या सुरुवातीला प्रथम कोणती गोष्ट निर्माण झाली असेल तर तो म्हणजे अहम्. तेव्हाच कर्ता ही संकल्पना आली. म्हणूनच अहंभाव हा अनादि आहे तोच जीवभाव व तेच व्यक्तित्व आहे.

॥श्री॥

देहाश्रमनिष्ठाश्रमधर्मकर्म
गुणाभिमानं सततं ममेति।
विज्ञानकोशोऽयमतिप्रकाशः
प्रकृष्टसान्निध्यवशात्परात्मनः॥
अतो भवत्येष उपाधिरस्य
यदात्मधीः संसरति भ्रमेण॥१८०॥

देहादींवरील निष्ठा, आश्रमधर्म, कर्मे, गुण इ०च्या अभिमान आणि सदैव ममत्व इ० नीयुक्त असलेला हा विज्ञानमय कोश परमात्म्याच्या अत्यन्त जवळ आहे आणि म्हणूनच प्रकाशमय आहे. म्हणून हा आत्म्याची उपाधी आहे. त्याच्या ठायी भ्रमाने आत्मबुध्दी निर्माण करून आत्मा संसरण करत राहतो.

स्फटिकाला स्वतःचा रंग नसतो परन्तु लाल जास्वंदीच्या फुलाशेजारी स्फटिक ठेवला असता तोही लाल रंगाचा दिसतो तसाच हा विज्ञानमय कोश मूळचा जड असला तरी परमात्म्याच्या आत्यंतिक सान्निध्यामुळे प्रकाशमान होतो.

विज्ञानमयकोशात त्या परमात्म्याचे प्रतिबिंब पडते त्या चित्प्रतिबिंबाचे अनुसरण विज्ञानमयकोश करतो त्यामुळे विज्ञानमय कोशाला आत्म्याचे प्रकृष्ट सान्निध्य लाभते.

गाढ झोपेमध्ये विज्ञानमय कोश आत्म्याच्या इतक्या जवळ असतो की जणू काही त्याचेच स्वरूप बनून जातो. पण तरीदेखील मध्ये पातळ पडदा असतो. म्हणूनच चांगली झोप झाल्यावर उत्साह वाटतो. कारण आत्म्याची भेट झालेली असते.

विज्ञानमय कोश हा इतर कोशांपेक्षा सूक्ष्मतर म्हणून अधिक व्यापक असतो.

FRIDAY

JUL '16

# 15

197-169 WK-28

तो आत्म्याला जवळचा असतो. तो अत्यंत तेजोमय असतो. त्यामुळे इतर कोशांच्या तुलनेत त्याला अधिक प्रतिबिंबत्व असते. हा कोश सत्यतत्त्वाच्या सर्वात जवळची उपाधी आहे.

आत्मधी: ही संज्ञा अहंभावाचा निर्देश करते आणि व्यक्तिभावाची व्याख्याही करते. म्हणजेच जीव! या जीवाला संसरण आहे- जाणे- येणे आहे. परंतु आत्म्याला हे येरझार नाही.

आत्म्याला सत्यतत्त्व न मानणे आणि अनात्म्याला किंवा जीवाला सत्यतत्त्व मानणे यामुळे निर्माण होणारी भ्रांती पुनर्जन्माला कारण ठरते.

योऽयं विज्ञानमय: प्राणेषु
हृदि स्फुरत्ययं ज्योति:
कूटस्थ: सन्नात्मा कर्ता
भोक्ता भवत्युपाधिस्थ: ॥१८१॥

हा जो स्वयंप्रकाशी विज्ञानस्वरूप आत्मा प्राणात व हृदयात स्फुरण पावतो आहे तो कूटस्थ असूनही उपाधीत असल्यामुळे कर्ता भोक्ता होतो.

इथे आत्मा या अर्थी विज्ञानमय हा उल्लेख आला आहे. बृहदारण्यकातील एका मंत्राशी या श्लोकाचे साधर्म्य आढळते. त्यात आत्मा कसा? असा प्रश्न विचारला आहे व त्याचे उत्तर म्हणून सोऽयं विज्ञानमय: असे म्हटले आहे.

हा परमात्मा स्वयंप्रकाशी असतो व हृदयाकाशात राहतो अशी कल्पना असल्यामुळे हृदि स्फुरति असे म्हटले आहे. आणि हृदि शब्दापूर्वी प्राणेषु हा शब्द आला आहे. कारण चैतन्य हे प्राणात स्फुरत असते आणि

www.madhaveeraghuveer.com

July 2016

| Mon | Tue | Wed | Thu | Fri | Sat | Sun | Mon | Tue | Wed | Thu | Fri | Sat | Sun | Mon | Tue | Wed | Thu | Fri | Sat | Sun |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 | 7 | 8 | 9 | 10 | 11 | 12 | 13 | 14 | 15 | 16 | 17 |
| 18 | 19 | 20 | 21 | 22 | 23 | 24 | 25 | 26 | 27 | 28 | 29 | 30 | 31 | | | | | | | |

त्यामुळेच सर्व शरीरात हालचाल होत असते.

आत्मा हा वास्तविक कूटस्थ, निर्विकार असतो पण विज्ञानमयकोशाच्या उपाधिमुळे तो स्वतःला कर्ता व भोक्ता मानतो.
(कूट - ऐरण)

बैलगाडीच्या खालून चालणाऱ्या कुत्र्याला वाटते की बैलगाडी माझ्यामुळेच चालते आहे.

स्वयं परिच्छेदमुपेत्य बुद्धेः
तादात्म्यदोषेण परं मृषात्मनः ।
सर्वात्मकः सन्नपि वीक्षते स्वयं
स्वतः पृथक्त्वेन मृदो घटानिव ॥१८२॥

बुद्धीच्या उपाधिने युक्त होऊन मिथ्यादेहाशी तादात्म्य पावण्याच्या दोषामुळे, सर्वव्यापक असणारा परमात्मा स्वतःला स्वतःपेक्षा वेगळा मानतो. [जसा घट हा मातीहून वेगळा वाटतो तसा]

इथे बुद्धी ही विज्ञानमय कोशाचा प्रमुख घटक आहे. या कोशाच्या उपाधीत अडकल्यामुळे आत्मा स्वतःला कर्ता व भोक्ता मानू लागतो.

मातीपासून बनवलेली भांडी जेव्हा निरनिराळी नामरूपे धारण करतात तेव्हा आपण त्यांना वेगवेगळी समजतो. परंतु सत्यतः साररूपाने ती एकच असतात.

उपाधिसम्बन्धवशात्परात्मा
ह्युपाधिधर्माननुभाति तद्गुणः ।
अयोविकारानविकारिवह्निवत्
सदैकरूपोऽपि परः स्वभावात् ॥१८३॥

August 2016

| Mon | Tue | Wed | Thu | Fri | Sat | Sun | Mon | Tue | Wed | Thu | Fri | Sat | Sun | Mon | Tue | Wed | Thu | Fri | Sat | Sun |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 | 7 | 8 | 9 | 10 | 11 | 12 | 13 | 14 | 15 | 16 | 17 | 18 | 19 | 20 | 21 |
| 22 | 23 | 24 | 25 | 26 | 27 | 28 | 29 | 30 | 31 | | | | | | | | | | | |



www.madhaveeraghuveer.com

आत्मा मुळात अविकारी, अपरिवर्तनशील सच्चिदानंदस्वरूप असतो. पण त्याला उपाधि लागली की तो त्या त्या गुणांनी युक्त होतो. जसे आकाश अमर्याद, सर्वव्यापक असते, परंतु घटाच्या/मठाच्या उपाधित सापडते की मर्यादित होते. पाण्याच्या बाबतीतही तसेच होते. अथांग पाणी घटात भरले की ते घटाच्या आकाराचे होते. आत्मादेखील देहाच्या उपाधित सापडला की देहाचे गुणधर्म त्याला चिकटतात.

अग्निला आकार नसतो वजन नसते परंतु जेव्हा लोखंडाचे तुकडे अग्नित तापवले जातात तेव्हा चौकोनी, दंडगोल, वर्तुळाकार अग्नि किंवा ५० औंस १ पौंड अग्नि असे म्हटले जाते. वस्तुत: ते लोखंडाचे वजन किंवा आकार असतात.

परमात्मा एकरूपच आहे. असणे पण हेच त्याचे मूळ स्वरूप आहे. ते केवळ अस्तित्वस्वरूपच असते. 'ते नाही' असे कधीच होणार नाही. ते आहेच, असतेच. ते वर्णनातीत आहे. या अंतरात्म्याला गुणधर्म नाहीत. जेव्हा त्यात गुणधर्म पाहिले जातात तेव्हा ते सीमित होते.

मी शुद्ध चैतन्य आहे आणि माझा शरीर-मन-बुद्धी यांच्याशी काही कर्तव्य नाही असे वाटणे हेच आध्यात्मिक पूर्णावस्थेची अत्युच्च अवस्था आहे.

July 2016

| Mon | Tue | Wed | Thu | Fri | Sat | Sun | Mon | Tue | Wed | Thu | Fri | Sat | Sun | Mon | Tue | Wed | Thu | Fri | Sat | Sun |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 | 7 | 8 | 9 | 10 | 11 | 12 | 13 | 14 | 15 | 16 | 17 |
| 18 | 19 | 20 | 21 | 22 | 23 | 24 | 25 | 26 | 27 | 28 | 29 | 30 | 31 | | | | | | | |



Let me plant only good, pure seeds so that the fruit will be the best.

www.madhaveeraghuveer.com

## (२२) अनादि विद्येच्या नाशाचे स्पष्टीकरण - १९८ ते २०८

### मोक्ष म्हणजे काय? - शिष्याचा प्रश्न

शिष्य उवाच -

भ्रमेणाप्यन्यथा वाऽस्तु जीवभावः परात्मनः।
तदुपाधेरनादित्वान्नानादेर्नाश इष्यते।।१९६।।
अतोऽस्य जीवभावोऽपि नित्या भवति संसृतिः।
न निवर्तेत तन्मोक्षः कथं मे श्रीगुरो वद।।१९७।।

शिष्य म्हणाला - हे गुरुवर, भ्रमाने किंवा अन्य कोणत्या तरी कारणामुळे परमात्म्याला जीवभाव प्राप्त झाला आहे. ती उपाधी अनादि आहे आणि अनादि वस्तूचा नाश होत नाही.

म्हणून याचा जीवभाव नित्य आहे आणि जन्म मरणही नित्यच आहे. ते नाहीसे होत नाही. मग मोक्ष कसा प्राप्त होतो ते मला सांगावे.

एकदा का परमात्म्याने मायेत प्रवेश केला की 'जीवभाव' नित्य होतो. आणि जीवभाव नित्य झाला की जाणे-येणे, जन्म-मृत्यु नित्य होतात. मग यातून मुक्ती मिळणार तरी कशी?

श्री गुरुरुवाच -

सम्यग्पृष्टं त्वया विद्वन् सावधानेन तच्छृणु।
प्रामाणिकी न भवति भ्रान्त्या मोहितकल्पना।।
भ्रान्तिं विना त्वसङ्गस्य निष्क्रियस्य निराकृतेः।
न घटेतार्थसम्बन्धो नभसो नीलतादिवत्।।१९८।।

हे विद्वाना, तू योग्य प्रश्न विचारला आहेस त्याचे उत्तर लक्षपूर्वक ऐक. भ्रमामुळे जी चुकीची कल्पना होते, तिला कोणत्याही प्रमाणाचा आधार नसतो. जसा आकाशाचा निळाईशी संबंध भ्रमानेच असतो तसा निराकार, निष्क्रिय ब्रह्माचा दृश्याशी संबंध भ्रमामुळेच असतो.

August 2016

| Mon | Tue | Wed | Thu | Fri | Sat | Sun | Mon | Tue | Wed | Thu | Fri | Sat | Sun | Mon | Tue | Wed | Thu | Fri | Sat | Sun |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 | 7 | 8 | 9 | 10 | 11 | 12 | 13 | 14 | 15 | 16 | 17 | 18 | 19 | 20 | 21 |
| 22 | 23 | 24 | 25 | 26 | 27 | 28 | 29 | 30 | 31 | | | | | | | | | | | |



www.madhavveeraghuveer.com

स्वस्य द्रष्टुर्निर्गुणस्याक्रियस्य
प्रत्यग्बोधानन्दरूपस्य बुद्धेः ।
भ्रान्त्या प्राप्तो जीवभावो न सत्यो
मोहापाये नास्त्यवस्तु स्वभावात् ॥१९८॥

यावद्भ्रान्तिस्तावदेवास्य सत्ता
मिथ्याज्ञानोज्जृम्भितस्य प्रमादात् ।
रज्ज्वां सर्पो भ्रान्तिकालीन एव
भ्रान्तिनाशे नैव सर्पोऽस्ति तद्वत् ॥१९९॥

द्रष्टया, निर्गुण, निष्क्रिय व ज्ञानघन आनंदस्वरूप परमात्म्याला बुद्धीला होणाऱ्या भ्रमामुळे जीवभाव प्राप्त झाला तरी तो सत्य नसतो. भ्रम दूर झाल्यावर अवस्तु स्वाभाविकपणे उरतच नाही.

दोरीवर साप जोवर भ्रम आहे तोवरच दिसतो. भ्रम नाहीसा झाल्यावर तिथे साप नसतोच. त्याचप्रमाणे जीवभाव हा मिथ्याज्ञानाने चुकीचा समज झाल्यामुळे प्राप्त होतो. तो भ्रम असेतोवरच टिकतो, नंतर नाहीसा होतो.

अनादित्वमविद्यायाः कार्यस्यापि तथेष्यते ।
उत्पन्नायां तु विद्यायामाविद्यकमनाद्यपि ॥२००॥
प्रबोधे स्वप्नवत्सर्वं सहमूलं विनश्यति ।
अनाद्यपीदं नो नित्यं प्रागभाव इव स्फुटम् ॥२०१॥
अनादेरपि विध्वंसः प्रागभावस्य वीक्षितः ।
यद्बुद्ध्युपाधिसम्बन्धात् परिकल्पितमात्मनि ॥२०२॥

अज्ञान व अज्ञानाचे कार्य यांचे अनादित्व मानले गेले आहे पण ज्ञानाचा उदय झाला की अनादि असूनही अज्ञान ज्याप्रमाणे जागल्यावर स्वप्न समूळ नष्ट होते त्याप्रमाणे नष्ट होते.

जीवत्वं न ततोऽन्यत्तु स्वरूपेण विलक्षणम्।
सम्बन्धः स्वात्मनो बुद्ध्या मिथ्याज्ञानपुरःसरः ॥२०३॥

जो जीवभाव बुद्धीच्या उपाधीमुळे आत्म्यावर कल्पिला गेला आहे (श्लोक २०२) तो त्या आत्मरूपाहून वेगळा नाही. आत्म्याचा बुद्धीशी जो संबंध येतो, तो मिथ्याज्ञानामुळेच येतो.

चैतन्यतत्त्व बुद्धीशी तादात्म्य पावल्यामुळे किंवा त्यात प्रतिबिंबित झाल्यामुळे जीवभावाची संकल्पना निर्माण होते. मन आणि ज्ञानेंद्रिये सूक्ष्म शरीरात अंतर्भूत झाली असल्याने इथे 'बुद्धी' शब्द वापरला आहे.

विनिवृत्तिर्भवेत्तस्य सम्यग्ज्ञानेन नान्यथा।
ब्रह्मात्मैकत्वविज्ञानं सम्यग्ज्ञानं श्रुतेर्मतम् ॥२०४॥
तदात्मानात्मनोः सम्यग्विवेकेनैव सिध्यति।
ततो विवेकः कर्तव्यः प्रत्यगात्मसदात्मनोः ॥२०५॥

त्याचा विनाश सम्यक् ज्ञानानेच होतो, इतर कशानेही नाही. आणि ब्रह्म व आत्मा यांच्या एकरूपत्वाचे ज्ञान हेच सम्यक् ज्ञान असे श्रुतींचे मत आहे. हे ज्ञान आत्मा व अनात्मा यांच्यातील योग्य तो भेद कळल्यामुळेच होते. म्हणून परमात्मा व जीवात्मा यामध्ये असलेला भेद जाणून घ्यायला हवा.

बुद्धीच्या उपाधीमुळे निर्विकारी आत्मा विकारी होतो. स्वतःला 'मी कर्ता, मी भोक्ता' समजू लागतो. असे गुरूंनी स्पष्ट करताच शिष्याचे काहीसे समाधान झाले. परंतु नवीनच प्रश्न पडले.

अज्ञान जर अनादि असेल तर ते अनंतही असले पाहिजे. तर मग ही उपाधि नष्ट तरी कशी



www.madhaveeraghuveer.com

होणार? आणि ती नष्ट झाली नाही तर जीवभाव तरी कसा संपणार? आणि आत्मा मुक्त कसा होणार?

यावर आचार्य प्रसन्न होऊन उत्तर देतात. अज्ञान हे अनादि असले तरी त्यामुळे निर्माण होणारा जीवभाव हा अवस्तु आहे. आणि अवस्तुला नाश आहे. वस्तु ही परमात्मस्वरूपाला दिलेली पारिभाषिक संज्ञा आहे.

सद्गुरुनायके पूर्ण कृपा केली।
निजवस्तु दाविली माझी मज॥

जी गोष्ट अनित्य, अशाश्वत, परिवर्तनशील आहे ती अवस्तु आहे. अवस्तुला नाश आहेच आहे. त्यामुळे अज्ञान नाहीसे होते.

आत्मवस्तुचे ज्ञान होताच अज्ञान नाहीसे होते सूर्याचा उदय होताच अंधार नाहीसा होतो.

जोपर्यंत दोरीवर सर्पाचा भास होतो, तोवर भीती इ० भावना निर्माण होतात. परंतु तो भास नाहीसा झाल्यावर सर्पाचे अस्तित्व जाणवेनासे होते आणि मग भीतीचा लवलेशही उरत नाही.

अनादी असला तरी जीवभाव शाश्वत नाही. हे सांगताना आचार्य प्रागभावाचा उल्लेख करतात. प्राक् म्हणजे पूर्वी आणि अभाव म्हणजे नसणे. घटाच्या निर्मितीपूर्वी घट अस्तित्वात नव्हता म्हणजेच घटाचा प्रागभाव होय. हा अभाव कधीपासून आहे हे सांगता येत नाही. ∴ तो अनादि म्हणावा लागतो. परंतु घट अस्तित्वात येताच प्रागभाव नाहीसा होतो. या प्रागभावाप्रमाणेच जीवभाव आहे तो शाश्वत नाही. ज्ञानाने तो नाहीसा होणार आहे.

थोडक्यात काय तर परमात्म्याचा बुद्धीशी संबंध येतो तो मिथ्याज्ञानाने आणि हा संबंध नष्ट कशामुळे होतो? तर सम्यक्‌ज्ञानाने! ब्रह्म व आत्मा एकच आहे हेच सम्यक्‌ज्ञान!

घटाकाश - मठाकाश - महदाकाश - चिदाकाश.
Individual Soul व सर्वगत आत्मा यामध्ये भेद भासतो परंतु भेद नाही.

जलं पङ्कवदस्पष्टं पङ्कापाये जलं स्फुटम् ।
यथा भाति तथात्मापि दोषाभावे स्फुटप्रभः ॥२०६॥

चिखलयुक्त पाणी गढूळ दिसते. व चिखल नाहीसा झाल्यावर जसे ते निर्मळ दिसते तसाच आत्माही दोष नाहीसे झाल्यावर प्रकाशरूपच असतो.

पावसाळ्यात चिखलामुळे गढूळ झालेले पाणी हिवाळ्यात चिखल नाहीसा झाला की 'निवळ' होते. स्फटिक शुद्ध होते. परब्रह्माचे देखील तसेच आहे. देह, बुद्धि इ० उपाधिमुळे परब्रह्म जीवरूपात येते. त्याचे गुण-दोष त्याला चिकटतात. परंतु उपाधि सरली की निर्मळ असे परमात्मरूपच प्रकटते.

पाणी तेच, परंतु उपाधिमुळे वेगळे भासते. तसेच परब्रह्म एकच पण उपाधिमुळे वेगळे भासते. उपाधितून मुक्त झालेले ब्रह्म स्वतेजाने लखलखू लागते. म्हणून अशा अशा उपाधींचा निरास होणे आवश्यक आहे.

August 2016

| Mon | Tue | Wed | Thu | Fri | Sat | Sun | Mon | Tue | Wed | Thu | Fri | Sat | Sun | Mon | Tue | Wed | Thu | Fri | Sat | Sun |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 | 7 | 8 | 9 | 10 | 11 | 12 | 13 | 14 | 15 | 16 | 17 | 18 | 19 | 20 | 21 |
| 22 | 23 | 24 | 25 | 26 | 27 | 28 | 29 | 30 | 31 | | | | | | | | | | | |



www.madhaveeraghuveer.com

असन्निवृत्तौ तु सदात्मनः स्फुट
प्रतीतिरेतस्य भवेत्प्रतीचः।
ततो निरासः करणीय एवा
सदात्मनः साध्वहमादिवस्तुनः ॥२०७॥

असत् उपाधिंचा निरास झाला की या अंतरात्म्याची सद्रूपात स्पष्ट प्रतीती येते. असत् वस्तूंच्या मागे असणाऱ्या अहं वृत्तींचा ही त्याग घडायला हवा. अहंकार हा सर्वात मोठा अडथळा आहे.

माझे घर माझे नाही.
माझी पत्नी, माझी मुले
एवढेच काय देहही माझा नाही.

आचार्य पुन्हा पुन्हा हा अहंभाव कसा असत् आहे ते सांगतात. व त्याचा निरास करण्याचा आग्रह धरतात.

★ विज्ञानमयकोश हा परमात्मा नव्हे

अतो नायं परात्मा स्यात् विज्ञानमयशब्दभाक्।
विकारित्वात् जडत्वात् च परिच्छिन्नत्वहेतुतः।
दृश्यत्वात् व्यभिचारित्वात् अनित्यो नित्य इष्यते ॥२०८॥

म्हणून विज्ञानमय या नावाने ओळखला जाणारा हा कोशदेखील विकारी आहे आणि म्हणूनच जड आहे व मर्यादित आहे म्हणून दृश्य आहे आणि व्यभिचारी आहे म्हणून परमात्मा नाही. अनित्यवस्तू कधीही नित्य होऊ शकत नाही.

विज्ञानमय कोश डोळ्यांनी पाहता येणारा इंद्रियगोचर मात्र आहे म्हणूनच तो दृश्य आहे आणि व्यभिचारी म्हणजे परिवर्तनशील आहे. म्हणून विज्ञानमयकोश म्हणजे आत्मा नाही असे आचार्य सांगतात.

# (२३) आनन्दमय कोशविवेक २०९ ते २११

आनन्दप्रतिबिम्बचुम्बित तनुर्वृत्तिस्तमोजृम्भिता
स्यादानन्दमयः प्रियादिगुणकः स्वेष्टार्थलाभोदयः।
पुण्यस्यानुभवे विभाति कृतिनामानन्दरूपः स्वयं
भूत्वा नन्दति यत्र साधु तनुभृत् मात्रः प्रयत्नं विना ॥२०९॥
आनन्दमयकोशस्य सुषुप्तौ स्फूर्तिरुत्कटा।
स्वप्नजागरयोरीषदिष्टसंदर्शनादिना ॥२१०॥
नैवायमानन्दमयः परात्मा
सोपाधिकत्वात् प्रकृतेर्विकारात्।
कार्यत्वहेतोः सुकृतक्रियाया
विकार संघात समाहितत्वात् ॥२११॥

आनंदाच्या प्रतिबिंबाने व्याप्त व तमोगुणामुळे प्रकट होणारी वृत्ति म्हणजे आनंदमयकोश होय. हा आपल्याला इष्ट असणाऱ्या पदार्थांच्या प्राप्तिमुळे निर्माण होतो. प्रियगुण ज्याच्यामध्ये आहेत असा हा आनंदमय कोश पुण्याचा अनुभव घेताना पुण्यवान लोकांना विशेषतः भासमान होतो. जेथे शरीरमात्र धारण करणारा प्रत्येक प्राणी प्रयत्नांशिवाय आनंदरूप होऊन स्वतःच आनंदाचा अनुभव घेतो.

सुषुप्ति अवस्थेत आनंदमय कोशाचे स्फुरण उत्कटतेने होते. स्वप्नात व जागृतीत (हे स्फुरण) इष्टवस्तूंच्या दर्शनाने किंचित मात्रच होते.

हा आनंदमय कोश उपाधिसह असल्याने आणि पापपुण्याचा परिणाम असल्यामुळे, प्रकृतिचा विकार असल्यामुळे आणि विकारांच्या समूहाने वेढलेला असल्यामुळे परमात्मा नाही.

परमात्मा अविकारी, निरुपाधिक, स्वयंप्रकाशी स्वयंसिद्ध आहे. तो कोणापासूनही निर्माण होणारा नाही.

आनंदमय कोश व परमात्मा यांची स्वरूपे पूर्ण भिन्न आहेत म्हणून तो परमात्मा नाही.

www.madhaveeraghuveer.com

Imp.

MONDAY
JUL '16
25
207-159 WK-30

जागृती ही अवस्था.

अन्नमय कोश -
अन्नापासून बनलेला हा देह अन्नमय कोश आहे. जन्मापूर्वी तो नव्हता व मृत्युनंतर तो असणार नाही. तो अस्थिर क्षणभंगुर आहे. स्वभावत: देह अचेतन असतो त्याला प्रेरणा देणारा कुणी वेगळाच आहे. देहाला अवयव असतात. आत्मा निरवयव आहे. देहाचे धर्म (जन्म-मृत्यु) देहाच्या अवस्था (बाल्य-तारुण्य-वार्धक्य) देहाची कर्मे आहेत. परंतु आत्म्याच्या अस्तित्वामुळेच हे सर्व घडू शकते. देहबुद्धी सर्व दु:खाचे मूळ आहे. देह म्हणजे आत्मा नव्हे हे निश्चित!

स्वप्न
प्राणमय कोश - हात, पाय, वाणी, जननेंद्रिय, गुद या पाच कर्मेंद्रियांनी हा प्राणमय कोश बनतो. यांच्या क्रियामधून चैतन्याची अभिव्यक्ती होत असते. या प्राणमय कोशचा एक भाग स्थूल देहाशी तर दुसरा भाग सूक्ष्म देहाशी जोडलेला आहे. मस्तकापासून ते पायाच्या करंगळीपर्यंत प्राण आहेत. प्राणमय कोश हा अन्नमय कोशाचा आत्मा आहे. परंतु तो सच्चिदानंद आत्मा नाही. कारण तो वायूचा विकार आहे. तो सारखा आत बाहेर करत असतो आणि प्राणाला स्वातंत्र्य नाही.

स्वप्न
मनोमय कोश - ज्ञानेंद्रिये आणि मन हा मी-माझे इ. विकल्पांना कारणीभूत ठरणारा मनोमय कोश आहे. जेव्हा मन इतरत्र व्यग्र असते तेव्हा विषयवस्तू ज्ञानेंद्रियांच्या टप्प्यात आली तरी त्यांचे ग्रहण करू शकत नाहीत. मन हीच भवबंधाला कारणीभूत ठरणारी विद्या आहे. माणसामाणसातील चैतन्य एकच असते. फरक असतो तो मनाचा → वर्णविल

July 2016

| Mon | Tue | Wed | Thu | Fri | Sat | Sun | Mon | Tue | Wed | Thu | Fri | Sat | Sun | Mon | Tue | Wed | Thu | Fri | Sat | Sun |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 | 7 | 8 | 9 | 10 | 11 | 12 | 13 | 14 | 15 | 16 | 17 |
| 18 | 19 | 20 | 21 | 22 | 23 | 24 | 25 | 26 | 27 | 28 | 29 | 30 | 31 | | | | | | | |



If all economists were laid end to end, they would not reach a conclusion.

असे हे मन शुद्ध करण्यासाठी चित्ताची एकाग्रता आवश्यक आहे. मनोमय कोश हा सूक्ष्म आहे.
१. मनोमय कोशाला आदि-अंत आहे.
२. मनोमय कोशाला विकार आहेत.
३. मनोमय कोश दुःखरूप आहे.
४. मनोमय कोश हा दृश्य विश्वाचा भाग आहे.

विज्ञानमय कोश - सुषुप्ती

वृत्तीसह बुद्धी आणि ज्ञानेंद्रिये यांनी युक्त असा 'मी कर्ता' असे मानणारा विज्ञानमय कोश आहे. तोच संसरणाचे कारण आहे. हा मायेचा विकार आहे. तो स्वतःला कर्ता व भोक्ता समजत असल्यामुळे वाघाचे कातडे पांघरलेल्या गाढवासारखी त्याची अवस्था होते. तो जे नाही ते समजायला लागतो. स्फटिकाला स्वतःचा रंग नसतो. ज्या वस्तूजवळ ठेवावा त्या वस्तूचा रंग त्याला आहे असे भासते. गाढ निद्रेमध्ये विज्ञानमय कोश आत्म्याच्या अगदी जवळ जातो. पण तरीसुद्धा मध्ये पातळ पडदा असतो. इतर कोशांपेक्षा हा अधिक सूक्ष्मतर म्हणून व्यापक आहे. आत्म्याला आकार नाही परंतु कोशाला असतो त्याप्रमाणे आहे.

सुषुप्ती
आनंदमय कोश - आनंद हे परमात्म्याचे रूप आहे. या स्वरूपाच्या प्रतिबिंबाने जिला व्यापून टाकले आहे अशी बुद्धीची वृत्ती म्हणजे आनंदमय कोश आहे. या कोशाचा अनुभव विनासायास येतो. पुण्यकर्म फलोन्मुख झाली की असा आनंद प्राप्त होतो. इथे प्रिय, आमोद, प्रमोद या त्रिविधवृत्ती अपेक्षित आहेत.
परंतु तरीही आनंदमय कोश हा सोपाधिक असल्याने तो परमात्मा होऊ शकत नाही.

(२४)

# परमात्म्याचे साक्षीस्वरूप
## २९२ ते २२४

WEDNESDAY
JUL '16
27
209-157 WK-30

अशा रीतीने पाचही कोशांचा युक्तिवादाने निषेध केला आहे. अधिष्ठानभूत, साक्षी ज्ञानरूप आत्मा शिल्लक राहतो. असा हा आत्मा स्वयंप्रकाश, पाचही कोशांहून वेगळा, तिन्ही अवस्थांचा साक्षी असणारा निर्विकार, निरंजन सदैव आनंदरूप आहे. त्याला आपले स्वरूप म्हणून जाणून घेतले पाहिजे. २९३

पञ्चानामपि कोशानां निषेधे युक्तितः कृते ।
तन्निषेधावधिः साक्षी बोधरूपोऽवशिष्यते ॥२९२॥
योऽयमात्मा स्वयंज्योतिः पञ्चकोशविलक्षणः ।
अवस्थात्रयसाक्षी सन् निर्विकारो निरञ्जनः ।
सदानन्दः स विज्ञेयः स्वात्मत्वेन विपश्चिता ॥२९३॥

पाचही कोशांचा युक्तिवादाने निषेध केला असता त्यांचा निषेध करणारा, अधिष्ठानभूत, ज्ञानरूप, साक्षी आत्मा अवशिष्ट उरतो.

जो हा आत्मा स्वयंप्रकाश, पाचही कोशांहून वेगळा तिन्ही अवस्थांचा साक्षी असणारा, निर्विकार, निरंजन, सदैव आनंदरूप — त्यालाच विद्वानांनी आपले स्वरूप म्हणून जाणले पाहिजे.

सूक्ष्म अभ्यासाने, ज्ञानाने आणि ध्यानाने पाचही कोशांचा निरास केल्यावर जे काही शिल्लक राहते तर तो स्वयंप्रकाशी आत्मा आहे तो स्वतःहूनच ओळखला जातो तो शाश्वत आहे. नित्य आहे. या आत्म्यालाच शहाण्या माणसाने जाणले पाहिजे. असे आचार्य आवर्जून सांगतात.

परंतु हे प्रतिपादन न कळल्यामुळे शिष्य पुन्हा एकदा प्रश्न विचारतो.

July 2016

| Mon | Tue | Wed | Thu | Fri | Sat | Sun | Mon | Tue | Wed | Thu | Fri | Sat | Sun | Mon | Tue | Wed | Thu | Fri | Sat | Sun |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 | 7 | 8 | 9 | 10 | 11 | 12 | 13 | 14 | 15 | 16 | 17 |
| 18 | 19 | 20 | 21 | 22 | 23 | 24 | 25 | 26 | 27 | 28 | 29 | 30 | 31 | | | | | | | |



Strive not to be a success, but rather to be of value.

शिष्य उवाच —
मिथ्यात्वेन निषिद्धेषु कोशेषु एतेषु पञ्चसु
सर्वाभावं विना किंचन पश्यामि अत्र हे गुरो
विज्ञेयं किमु वस्तु अस्ति स्वात्मना अत्र विपश्चिता ॥२१४

मिथ्या असल्यामुळे हे पाचही कोश निषिद्ध झाल्यावर सर्व अभावाखेरीज हे गुरुवर्य, मला इथे काहीच दिसत नाही. मग विद्वानाने ज्याला आपले स्वरूप म्हणून जाणावे अशी कोणती वस्तु आहे?

साक्षीकडे जर सर्व गोष्टींचा अभावच जाणवत असेल तर स्वरूप मानायचे तरी कोणाला?

हा प्रश्न मुमुक्षु शिष्याला पडला तरी कसा?

न्यूटन —— मांजराची कथा.

शृंगेरी शंकराचार्यांना भेटायला पुण्यात एक विद्वान आले होते. ते म्हणाले आम्ही शृंगेरीला गेलो तेव्हा तिथे कोणी नव्हते. तेव्हा आचार्य त्यावर म्हणाले
"शारदाम्बा तो वहीं थी न!"

जिथे कुणी नाही असे म्हणतो तिथे सर्व काही असते. कारण चैतन्य सर्वगत आहे. चराचरात भरलेले आहे.

मात्र जेव्हा बुद्धीकडून अध्यात्म कल्पनांचा निव्वळ विचारच केला जातो तेव्हा तिच्या वाट्याला नैराश्यच येते.

परंतु आचार्य सांगतात (निक्षून, गर्जून) सांगतात.

शुद्ध अभावरूप अस्तित्व हेच अंतिम सत्य आहे.

तेव्हा शिष्य म्हणतो की मला तर पोकळीच दिसते आहे. तेव्हा सूज्ञ माणसाने काय व कसे जाणायचे?

बौद्धांची शून्यवाद विचार पद्धति अशाच प्रकारची आहे. सर्वं शून्यम्। सर्वं क्षणिकम्। सर्वं दुःखम्।

याचे निरसन आता आचार्य करत आहेत.

www.madhaveeraghuveer.com

August 2016

| Mon | Tue | Wed | Thu | Fri | Sat | Sun | Mon | Tue | Wed | Thu | Fri | Sat | Sun | Mon | Tue | Wed | Thu | Fri | Sat | Sun |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 | 7 | 8 | 9 | 10 | 11 | 12 | 13 | 14 | 15 | 16 | 17 | 18 | 19 | 20 | 21 |
| 22 | 23 | 24 | 25 | 26 | 27 | 28 | 29 | 30 | 31 | | | | | | | | | | | |

श्री गुरुकृपा —

सत्यमुक्तं त्वया विद्वन् निपुणोऽसि विचारणे।
अहमादिविकारास्ते तदभावोऽयमप्यथ॥२९५॥

सर्वे येनानुभूयन्ते यः स्वयं नानुभूयते।
तमात्मानं वेदितारं विद्धि बुद्ध्या सुसूक्ष्मया॥२९६॥

हे विद्वाना, तू खरे बोललास. विचार करण्यात तू कुशल आहेस. तुझे अहंकारादि विकार व त्यांचा अभावही – या सार्‍याच गोष्टी ज्याच्यामुळे अनुभवता येतात, पण जो स्वतः काही अनुभवता येत नाही त्या सर्वज्ञ आत्म्याला सूक्ष्मबुद्धीने जाण.

'मी - माझे' हे विकार व त्या विकारांच्या अभावाचा अनुभव देखील परमात्म्यामुळेच येतो. तो सर्वसाक्षी आहे. म्हणून तेच तुझे स्वरूप आहे असे जाण.

असे जेव्हा गुरु सांगतात तेव्हा शिष्याच्या दोन्ही प्रश्नांची उत्तर देतात.

१. स्वरूप म्हणून कुणाला जाणावे? हे सांगतात
२. सर्वज्ञ जाणवणारा अभाव ही खरा नाही. हे स्पष्ट करतात.

शिष्याची अडचण अशी आहे की सर्वच गोष्टींचा निरास केला तर मग जाणून काय घ्यायचे? यावर गुरुजी त्याची प्रशंसा करून त्याला प्रोत्साहन देतात.

'मला इथे काहीच दिसत नाही' असे जरी वाटत असले तरी हे जाणणारा कोणीतरी असतोच.

मन - बुद्धी - अहंकाराचा निरास केला तरी असे काही शिल्लक राहते, की ज्याच्यामुळे अनुभव घेतला जातो. ज्याच्या केवळ अस्तित्वाने सर्व ज्ञान शक्य होते.

शिष्य — मी ते कसे जाणून घ्यावे?

गुरु — बुद्धी सूक्ष्म करून! जी बुद्धी मुक्त आहे. वासनांच्या प्रभावाखाली ती कार्य करत नाही.

July 2016

| Mon | Tue | Wed | Thu | Fri | Sat | Sun | Mon | Tue | Wed | Thu | Fri | Sat | Sun | Mon | Tue | Wed | Thu | Fri | Sat | Sun |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 | 7 | 8 | 9 | 10 | 11 | 12 | 13 | 14 | 15 | 16 | 17 |
| 18 | 19 | 20 | 21 | 22 | 23 | 24 | 25 | 26 | 27 | 28 | 29 | 30 | 31 | | | | | | | |



Sometimes rest is the only medicine needed.

जडतेकडून सूक्ष्मतेकडे प्रवास

जड — स्त्री म्हणजे दोन पायांवर चालणारी विषयकुलसा.

थोडा सूक्ष्मतेकडे वळल्यावर तिच्यातील सौंदर्य जाणवते. आणखी सूक्ष्म गेल्यावर त्यातील जिवंतपणा — अनेक भूमिका — जाणवतो. माता, भगिनी, वहिनी, काकू, त्यातून तिचे दिव्यत्व समजते. आणि शेवटी तिला वंदन करावेसे वाटते.

ही बुद्धी सूक्ष्म कशी करायची? वासनांना आवर कसा घालायचा? दिव्यत्वाचा शोध कसा घ्यायचा? तर निष्काम कर्म हेच त्याचे उत्तर आहे.

तत्साक्षिकं भवेत्तत्तद् यद् यद् येन अनुभूयते ।
कस्याप्यननुभूतार्थे साक्षित्वं नोपयुज्यते ॥२७॥

| August 2016 | | | | | | | | | | | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| Mon | Tue | Wed | Thu | Fri | Sat | Sun | Mon | Tue | Wed | Thu | Fri | Sat | Sun | Mon | Tue | Wed | Thu | Fri | Sat | Sun |
| 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 | 7 | 8 | 9 | 10 | 11 | 12 | 13 | 14 | 15 | 16 | 17 | 18 | 19 | 20 | 21 |
| 22 | 23 | 24 | 25 | 26 | 27 | 28 | 29 | 30 | 31 | | | | | | | | | | | |



www.madhaveeraghuveer.com

असौ असाक्षिको भावो यत: स्वेनानुभूयते।
अत: परं स्वयं साक्षात् प्रत्यगात्मा न चेतर:॥
॥२९८॥

हा आत्मा आपला आपल्याच अनुभवाला येतो म्हणून तो स्वत:च साक्षी आहे, भावरूप आहे. हा प्रत्यगात्माच साक्षात् ब्रह्मरूप आहे. त्याहून श्रेष्ठ असा दुसरा कुणी त्याचा साक्षी नाही.

आत्मा हा स्वत:च ब्रह्मरूप, ज्ञानरूप त्यामुळे त्याला जाणणारा अन्य कुणी असत नाही असे आचार्यांचे प्रतिपादन आहे. जो स्वत:च सर्व सृष्टीचा द्रष्टा, साक्षी आहे, त्याला जाणणारा अन्य कोण असणार?

बृहदारण्यक उपनिषद - याज्ञवल्क्य-मैत्रेयी संवाद
विज्ञातारं अरे केन विजानीयात्?
ज्ञात्याला जाणणारा दुसरा कोणीही असत नाही.

जाग्रत् स्वप्न सुषुप्तिषु स्फुटतरं योऽसौ समुज्जृम्भते।
प्रत्यग्रूपतया सदाहमहमित्यन्त: स्फुरन्नेकधा।
नानाकारविकारभागिन इमान्पश्यन् अहंधीमुखान्
नित्यानन्दचिदात्मना स्फुरति तं विद्धि स्वमेतं हृदि॥

सदैव 'मी-मी' अशा एकाच प्रकारे अंत:करणात ॥२९९

स्फुरण पावणारा हा जो अंतरात्मा प्रत्यक्‌रूपाने जागृती, स्वप्न, सुषुप्ति अशा सर्व अवस्थांमध्ये अत्यंत स्पष्टपणे प्रतीत होतो व अहंबुद्धी ज्यात प्रमुख आहे अशा प्रकृतीच्या नानाविध विकारांकडे साक्षित्वाने पहात नित्य आनंदरूपाने स्फुरण पावतो, त्यालाच 'आत्मा' असे जाण.

July 2016

| Mon | Tue | Wed | Thu | Fri | Sat | Sun | Mon | Tue | Wed | Thu | Fri | Sat | Sun | Mon | Tue | Wed | Thu | Fri | Sat | Sun |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 | 7 | 8 | 9 | 10 | 11 | 12 | 13 | 14 | 15 | 16 | 17 |
| 18 | 19 | 20 | 21 | 22 | 23 | 24 | 25 | 26 | 27 | 28 | 29 | 30 | 31 | | | | | | | |


Self control will give you unlimited control.

घटोदके बिम्बितमर्कबिम्ब
मालोक्य मूढो रविमेव मन्यते।
तथा चिदाभासमुपाधिसंस्थं
भ्रान्त्याहमित्येव जडोऽभिमन्यते ॥२२०॥

घटातील पाण्यात प्रतिबिंबित होणाऱ्या सूर्यबिंबालाच सूर्य असे मूर्ख माणूस मानतो. तसेच उपाधीत असलेल्या चिदाभासालाच भ्रांतीमुळे जड माणूस 'मी' असे मानतो.

~~विरुद्ध श्लोक~~

घटं जलं तद्गतमर्कबिम्बं
विहाय सर्वं दिवि वीक्ष्यतेऽर्कः।
तटस्थितस्तत्त्रितयावभासकः
स्वयंप्रकाशो विदुषा यथा तथा ॥२२१॥

देहं धियं चित्प्रतिबिम्बमेवं
विसृज्य बुद्धौ निहितं गुहायाम्।
द्रष्टारमात्मानमखण्डबोधं
सर्वप्रकाशं सदसद्विलक्षणम् ॥२२२॥

नित्यं विभुं सर्वगतं सुसूक्ष्मं
अन्तर्बहिःशून्यमनन्यमात्मनः।
विज्ञाय सम्यक् निजरूपमेतत्
पुमान्विपाप्मा विरजो विमृत्युः ॥२२३॥

घट, त्यातील पाणी, त्यातील सूर्यबिंब या सर्वांना सोडून त्या तिघांचा भास निर्माण करणाऱ्या अलिप्त अशा स्वयंप्रकाश सूर्याला शहाणा मनुष्य जसा आकाशात पाहतो त्याप्रमाणे ------
देह, बुद्धी व हा चिदाभास यांना सोडून बुद्धीरूपी गुहेत स्थित, साक्षीरूप, नित्य ज्ञानस्वरूप, सर्वांना प्रकाशित करणाऱ्या सत्-असत् पेक्षा वेगळ्या------



www.madhaveeraghuveer.com

२८मार्च२०१८



नित्य, विभु, सर्वगत, अत्यंत सूक्ष्म, आत बाहेर इ. भेदांनी रहित, अभिन्न अशा या आत्म्याला आपले योगस्वरूप जाणून पुरुष पापमुक्त, निर्मल आणि अमर होतो.

या चार श्लोकात आचार्यांनी एक महत्वाचा सिध्दांत मांडला आहे.

मर्यादित चिद्रूपाला ब्रह्म मानणे हा मूर्खपणा आहे यासाठी ते एक नित्याचा दृष्टांत देतात. व अविवेकी आणि ज्ञानी माणसातील अंतर स्पष्ट करतात.

घरातील पाण्यात जर सूर्याचे प्रतिबिंब पडले असेल तर मूर्ख माणूस त्यालाच सूर्य मानतो. तसेच अज्ञानी माणूस देहाच्या उपाधीत अडकलेल्या ब्रह्मालाच परब्रह्म मानतो. मात्र शहाणा माणूस घट, पाणी आणि प्रतिबिंबाला दूर सारून या तिघांचा भास निर्माण करणाऱ्या अलिप्त, स्वयंप्रकाशी सूर्यालाच सूर्य म्हणून जाणतो.

विद्वानाने देखील या सर्व गोष्टींचे मिथ्यत्व जाणून सर्वसाक्षी, व्यापक, ज्ञानरूप अशा आत्म्याचे सत्यत्व मनात दृढ करायला हवे. आणि एकदा हे स्वरूप जाणले की मनुष्य पापमुक्त, निर्मल होतो.

विशोक आनन्दघनो विपश्चित्
स्वयं कुतश्चित् न बिभेति कश्चित् ।
नान्योऽस्ति पन्था भवबन्धमुक्ते
विना स्वतत्वागमं मुमुक्षोः ॥२२४॥

शोकरहित व आनंदघन असा हा विद्वान स्वतः कुठेही व कशामुळेही घाबरत नाही. स्वरूपाच्या ज्ञानाशिवाय मुमुक्षूला भवबंधातून मुक्त होण्याचा दुसरा मार्ग नाही.

September 2016

| Mon | Tue | Wed | Thu | Fri | Sat | Sun | Mon | Tue | Wed | Thu | Fri | Sat | Sun | Mon | Tue | Wed | Thu | Fri | Sat | Sun |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 | 7 | 8 | 9 | 10 | 11 | 12 | 13 | 14 | 15 | 16 | 17 | 18 |
| 19 | 20 | 21 | 22 | 23 | 24 | 25 | 26 | 27 | 28 | 29 | 30 | | | | | | | | | |

(२५) ब्रह्मतत्त्वाचे अद्वितीयत्व
२२५ ते २३०

ज्याला स्वतःचे खरे रूप समजतो तो आनंदघन होऊन जातो. ना ममत्व ना आसक्ती! तो निर्भय होतो. असा निर्भय, निरासक्त माणूसच त्या सत् तत्त्वाचे ज्ञान करून घेण्यास पात्र असतो. जे काही जाणावयाचे आहे ते ज्याने जाणलेले असते तोच स्वयंप्रकाशी मुनी असतो.

ब्रह्माभिन्नत्व विज्ञानं भवमोक्षस्य कारणम् ।
येनाद्वितीयमानन्दं ब्रह्म सम्पद्यते बुधैः ॥२२५॥

ब्रह्माचे आत्म्याशी असलेले ऐक्य जाणणे हे भवसागरातून मुक्त होण्याचे कारण आहे ज्यायोगे विद्वान अद्वितीय आनंदरूप ब्रह्माची प्राप्ती करून घेतो.



www.madhaveeraghuveer.com

सदिदं परमाद्वैतं स्वस्मादन्यस्य वस्तुनोऽभावात् ।
न ह्यन्यदस्ति किंचित् सम्यक् परतत्त्वबोधसुदशायाम् ॥२२८॥

हे श्रेष्ठ असे अद्वैत सत् तत्त्वच शाश्वत आहे कारण आत्म्याशिवाय अन्य कोणतीही वस्तूच नाही. या परमतत्त्वाचे संपूर्ण ज्ञान झाले की दुसरे काहीच उरत नाही.

स्वस्मात् अन्यस्य वस्तुनः अभावात् -
वस्तु म्हणजे केवळ शाश्वत वस्तु - सद्वस्तु
सर्वं खल्विदं ब्रह्म!

एकदा जाणिवेची उच्चतर पातळी गाठली की तिथे आत्मतत्त्वाखेरीज इतर सर्व वस्तूंचा अभाव असतो. केवळ एकमेव अनंत ब्रह्मच अनुभवायला येते.

यदिदं सकलं विश्वं नानारूपं प्रतीतमज्ञानात् ।
तत्सर्वं ब्रह्मैव प्रत्यस्ताशेषभावनादोषम् ॥२२९॥

मृत्कार्यं भूतोऽपि मृदो न भिन्नः ।
कुम्भोऽस्ति सर्वत्र तु मृत्स्वरूपात् ।
न कुम्भरूपं पृथगस्ति कुम्भः
कुतो मृषाकल्पितनाममात्रः ॥२३०॥

हे जे संपूर्ण नानाविध विश्व अज्ञानामुळे अनुभवास येते ते त्यातील सर्व कल्पनांचे दोष नाहीसे केले की ब्रह्मच आहे.

मृत्तिकेचे कार्य असूनही सर्व बाजूंनी मृत्तिकारूप असल्यामुळेच मृत्तिकेहून घट भिन्न नाही. घटरूप (मातीहून) भिन्न नाहीच तर मातीच्या ठायी कल्पित नाममात्र घटाचे अस्तित्व कुठून असणार?

September 2016

| Mon | Tue | Wed | Thu | Fri | Sat | Sun | Mon | Tue | Wed | Thu | Fri | Sat | Sun | Mon | Tue | Wed | Thu | Fri | Sat | Sun |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 | 7 | 8 | 9 | 10 | 11 | 12 | 13 | 14 | 15 | 16 | 17 | 18 |
| 19 | 20 | 21 | 22 | 23 | 24 | 25 | 26 | 27 | 28 | 29 | 30 | | | | | | | | | |



www.madhaveeraghuveer.com

तीन सत्ता — व्यावहारिक, प्रातिभासिक, पारमार्थिक.



केनापि मृद्भिन्नतया स्वरूपं
घटस्य संदर्शयितुं न शक्यते।
अतो घटः कल्पित एव मोहान्
मृदेव सत्यं परमार्थभूतम्॥२३१॥

घटाचे मृत्तिकेहून वेगळे स्वरूप दाखवणे कुणालाही शक्य नाही. म्हणून घट हा अज्ञानामुळेच कल्पिलेला आहे. सत्य आहे ती माती! मातीच पारमार्थिक सत्य आहे.

घटापासून माती वेगळी काढून घटाचे स्वतंत्र अस्तित्व दाखवणे कुणालाही शक्य नाही. म्हणूनच घट कल्पित आहे व माती हे परमार्थभूत सत्य आहे.

ब्रह्म सत्य जगन्मिथ्या हा आचार्यांचा सिद्धांत आहे.

दोरीवर साप, शिंपलीवर रुपे ही झाली प्रातिभासिक सत्ये! जी गोष्ट अस्तित्वात नसताना भासते ती प्रातिभासिक सत्याचे उदाहरण आहे. आणि ज्या गोष्टींचा आपल्याला दररोज प्रत्यय येतो ते सर्व व्यावहारिक सत्य असते.

परंतु तिसरे आहे ते पारमार्थिक सत्य! या सत्याला कधीही बाध येत नाही.

ब्रह्मात्मैक्य ज्ञानानंतर व्यावहारिक सत्य उरत नाही. भास नाहीसा झाल्यावर प्रातिभासिक सत्य नाहीसे होते.

ब्रह्म हेच पारमार्थिक सत्य आहे. ते अस्तित्व असते.

परंतु काही अज्ञ लोक ब्रह्माहून विश्व वेगळे मानतात अशांची तुलना झोपेत बरळणाऱ्यांशी केली आहे.

सद्ब्रह्मकार्यं सकलं सदैव
तन्मात्रमेतन्न ततोऽन्यदस्ति।
अस्तीति यो वक्ति न तस्य मोहो
विनिर्गतो निद्रितवत्प्रजल्पः॥२३२॥

www.madhaveeraghuveer.com

विश्व हे ब्रह्माहून वेगळे असे म्हणणाऱ्याला कशाचेही भान नसते. न बाह्य विश्वाचे न स्वतःच्या देहाचे! त्यामुळे तो झोपेत बोलल्या सारखे काहीतरी बरळत असतो. बऱ्याचदा ते बोलणे संदर्भहीन असते. ते नेणीवेचे बोलणे असते. अर्थहीन असते.

ब्रह्मैवेदं विश्वमित्येव वाणी
श्रौती ब्रूतेऽथर्वनिष्ठा वरिष्ठा।
तस्मात्सर्वं ब्रह्ममात्रं हि विश्वं
नाधिष्ठानाद्भिन्नतारोपितस्य॥२३३॥

हे विश्व ब्रह्मच आहे. [सर्व खल्विदं ब्रह्मासि] अशी अथर्ववेदाची ग्वाही आहे. हे सर्व विश्व ब्रह्मरूपच आहे कारण आरोपित वस्तू ही अधिष्ठानापेक्षा वेगळी असूच शकत नाही.
श्रौती वाणी - मुण्डकोपनिषद
ब्रह्म एव इदं विश्वं इदं वरिष्ठम्। २.२.१२
श्रुतिवाक्यात ही ब्रह्म एव इदम्। असा निश्चय आहे.

सत्यं यदि स्यात् जगदेतदात्मनो
ऽनन्तत्वहानिर्निगमाप्रमाणता।
असत्यवादित्वमपीशितुः स्यात्
नैतत्त्रयं साधु हितं महात्मनाम्॥२३४॥

जर हे विश्व सत्य मानले तर आत्म्याच्या अनंतत्वाची हानी होते. श्रुती अप्रमाण ठरते आणि ईश्वराची वाणी देखील असत्य ठरते. या तिन्ही गोष्टी महात्म्यांना इष्टीने हितकर नाहीत.

September 2016

| Mon | Tue | Wed | Thu | Fri | Sat | Sun | Mon | Tue | Wed | Thu | Fri | Sat | Sun | Mon | Tue | Wed | Thu | Fri | Sat | Sun |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 | 7 | 8 | 9 | 10 | 11 | 12 | 13 | 14 | 15 | 16 | 17 | 18 |
| 19 | 20 | 21 | 22 | 23 | 24 | 25 | 26 | 27 | 28 | 29 | 30 | | | | | | | | | |

एका म्यानात ज्याप्रमाणे दोन तलवारी राहू शकत नाहीत, त्याप्रमाणे विश्व व आत्मा दोघेही अनंत असू शकत नाहीत.

विश्वाला सत्य मानले तर सारी श्रुतिवचने फोल ठरतील.

सत्यं ज्ञानमनन्तं ब्रह्म / अविनाशी वारे अयमात्मा ||

ही वचने आत्म्याच्या अनंतत्वाची पुष्टि करणारी आहेत. ती सारी मिथ्या ठरतील.

वेदांना ईश्वराचे निःश्वसित मानले आहे त्यामुळे वेदप्रामाण्याला बाध म्हणजे ईश्वराच्या वाणीला असत्यतेचा दोष लागतो हे योग्य नाही.

∴ विश्व खरे मानणे कल्याणकर नाही

ईश्वरो वस्तुतत्त्वज्ञो न चाहं तेष्ववस्थितः |
न च मत्स्थानि भूतानीत्येवमेव व्यचीक्लृपत् ||
||२३||

~~वस्तुतत्त्व~~ परमतत्त्व जाणणाऱ्या ईश्वराने - मी त्यांच्यामध्ये स्थित नाही आणि माझ्या ठायी प्राणिमात्र नाहीत असेच म्हटले आहे.

गीतेत ९व्या अध्यायातील श्लोकार्ध उद्धृत केला आहे. त्याचे स्पष्टीकरण येथे आचार्य करतात.

मी प्राणिमात्रांचा निर्माता, सृष्टिकर्ता इ. नाही. त्यांची उत्पत्ती हा माझ्या मायेचा खेळ आहे. मी त्यांची निर्मितीही करत नाही व त्यांच्या नाशाला कारणीभूत होत नाही. थोडक्यात प्राणिमात्र वा त्यांचे विश्व हा मायेमुळे होणारा भास आहे.

विश्व हे खरे नाही. ते मिथ्याच आहे.

August 2016

| Mon | Tue | Wed | Thu | Fri | Sat | Sun | Mon | Tue | Wed | Thu | Fri | Sat | Sun | Mon | Tue | Wed | Thu | Fri | Sat | Sun |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 | 7 | 8 | 9 | 10 | 11 | 12 | 13 | 14 | 15 | 16 | 17 | 18 | 19 | 20 | 21 |
| 22 | 23 | 24 | 25 | 26 | 27 | 28 | 29 | 30 | 31 | | | | | | | | | | | |


Our life is full of sweet memories for us to gather and to keep.

30 March 2017



यदि सत्यं भवेद् विश्वं सुषुप्तावुपलभ्यताम्
यन्नोपलभ्यते किञ्चिदतोऽसत्स्वप्नवन्मृषा ॥२३६॥

जर विश्व सत्य असते तर ते सुषुप्ति अवस्थेतही अनुभवायला आले असते. तसे ते होत नाही. म्हणून ते स्वप्नासारखे मिथ्या आहे.

श्रुतिला प्रमाण मानून आचार्यांनी विश्व कसे मिथ्या आहे याचे प्रतिपादन केल्यानंतर आता आचार्य युक्तिवाद करतात, तर्कशास्त्रदृष्टीने सिद्ध करतात. सत्य गोष्टीला कधीही नाश नसतो. हे जर खरे असले तर सुषुप्तिमध्ये जे अनुभवता येत नाही ते सारे खोटेच असले पाहिजे. सुषुप्तिमध्ये विश्वाच्या अस्तित्वाची जाणिव देखील नसते. यामुळे विश्व हे कायम न टिकणारे / स्वप्नवत भासणारे आहे.

सत्य हे भूत-भविष्य-वर्तमान या तिन्ही काळात अपरिवर्तनीय असते. जे एकदा असते व एकदा नसते असे कधीच सत्य असू शकणार नाही. आणि मनुष्य जागा झाल्यावर सुद्धा जे पाहतो ते बदलणारे असते. म्हणून ते खोटे आहे

अतः पृथङ्नास्ति जगत्परात्मनः
पृथक् प्रतीतिस्तु मृषा गुणादिवत् ।
आरोपितस्यास्ति किमर्थवत्ता-
धिष्ठानमाभाति तथा भ्रमेण ॥२३७॥

म्हणून जग हे परमात्म्याहून वेगळे नाही. जसे गुण इ. अनुसार त्याची वेगळी जाणिव वृथाच होते. आरोपित वस्तूला स्वतंत्र अस्तित्व असतेच कुठे? अधिष्ठानच भ्रमामुळे तसे भासते.

असत विश्व हे सद्रूप ब्रह्माहून वेगळेच असणार नाही का?

जिथे दोरीचे अधिष्ठान आहे तिथेच सर्पाचा भास होतो. दोरीच नसती तर भास झालाच नसता. भासाला स्वतंत्र अस्तित्व नसते. बिंब अस्तित्वात असेल तरच प्रतिबिंब भासणार. तसेच मुळात ब्रह्मच नसते तर भास कुणावर झाला असता? थोडक्यात काय तर विश्वाला अस्तित्व लाभते ते केवळ ब्रह्मामुळे! म्हणजे इथे मूळ अधिष्ठानच वेगळ्या रूपात दिसते आहे.

भ्रान्तस्य यद् यद् भ्रमतः प्रतीतं
ब्रह्मैव तत् तद् रजतं हि शुक्तिः।
इदं तया ब्रह्म सदैव रूप्यते
त्वारोपितं ब्रह्मणि नाममात्रम्॥२३८॥

भ्रमामुळे अज्ञानी माणसाला चांदी म्हणून जे कळते तो वास्तविक शिंपला असतो. तसेच भ्रमामुळे जे प्रतीत होते ते वस्तुतः ब्रह्म असते. इदं शब्दाने सदैव ब्रह्मच उल्लेखिले जाते. पण ब्रह्मावर आरोपित असलेले विश्व नाममात्रच आहे.

आरोपित विश्व हे ब्रह्माठायी नाममात्रच आहे. भासामुळे त्याला विश्व हे नाव दिले असले तरी मुळात ते ब्रह्मच आहे. सर्वं खलु इदं ब्रह्म! हा भाव इथे व्यक्त होतो.

शुक्ति म्हणजे शिंपला. असा शिंपला जर वाळूत चमकत असेल तर चांदीचा तुकडा पडला असल्याचा भास होतो परंतु हा भास तात्कालिक असतो.

थोडक्यात विश्व म्हणून जे भासते ते मुळात अद्वितीय शुद्ध, निरंजन, प्रशांत, अनादि, अनंत अविकारी ब्रह्मच आहे

www.madhavgeeraghuveer.com

अतः परं ब्रह्म सद् अद्वितीयं
विशुद्धविज्ञानघनं निरञ्जनम् ।
प्रशान्तमाद्यन्तविहीनमक्रियं
निरन्तरानन्दरसस्वरूपम् ॥ २३९ ॥
निरस्तमायाकृतसर्वभेदं
नित्यं ध्रुवं निष्कलमप्रमेयम् ।
अरूपमव्यक्तमनाख्यमव्ययं
ज्योतिः स्वयं किञ्चिदिदं चकास्ति ॥ २४० ॥

ज्ञातृज्ञेयज्ञानशून्यमनन्तं निर्विकल्पम् ।
केवलाखण्डचिन्मात्रं परं तत्त्वं विदुर्बुधाः ॥ २४१ ॥
अहेयमनुपादेयं मनोवाचामगोचरम् ।
अप्रमेयमनाद्यन्तं ब्रह्म पूर्णं महन्महः ॥ २४२ ॥

म्हणून परब्रह्म हे सत्, अद्वितीय, विशुद्ध विज्ञानघन, निरंजन, शांत, आदि अंतरहित, निष्क्रिय, सदैव आनंदरूप आहे. - - - - - २३९

मायेने केलेल्या सर्व भेदांचा निरास करणारे, नित्य सुखरूप, निरवयव, अप्रमेय, अरूप, अव्यक्त, अवर्णनीय आणि अक्षय तेज आहे. जे स्वतःच प्रकाशते आहे. - - - - - २४०

ज्ञाता, ज्ञेय व ज्ञान या त्रिपुटीने रहित, अनंत, निर्विकल्प, केवळ आणि अखंड चैतन्यरूप म्हणून विद्वान त्याला जाणतात. - - - - - २४१

ते ब्रह्म अत्याज्य व अग्राह्य आहे. मन आणि वाणी यांच्या कक्षेबाहेरील व अप्रमेय, आदि-अंतरहित परिपूर्ण व महातेजस्वी असे ते आहे.



www.madhuraveeraghuveer.com

(२७)

# तत्त्वमसि महावाक्याचा अर्थ
## २४३ ते २६७

THURSDAY
AUG '16
11
224-142 WK-32

आपल्यापैकी प्रत्येकात असणाऱ्या आत्मतत्त्वाचे निर्देशन करणारे हे वीस गुण आहेत.
१. परम - अतीत - सर्वांच्या पलीकडचे.
२. सत्य - भूत - वर्तमान - भविष्य या तिन्ही काळात सदैव असणारे ३. अद्वितीय - त्या अंतिम तत्त्वाला बाधा आणणारा दुसरेपणा, ज्याने नसता असे - ४. शुद्ध - ज्याच्यामध्ये दुसरे काहीच (वासना, दोष) नसते. ५. विज्ञान घन - ज्याच्या ज्ञानामुळे इतर विज्ञान शक्य होतात. ------सविस्तर वर्णन---

★ अहेयम् - जे कधीही टाकून देता येत नाही असे
पंचकोशांचा निरास केल्यानंतर अशी एक अवस्था येते की ज्याच्यापुढे आता टाकता येणार नाही तेच परमोच्च परमतत्त्व असते.

अनुपादेयम् - ज्याचे ग्रहणही करता येणार नाही जे आपल्यापाशी नसते ते आपण ग्रहण करतो. परंतु जे महान सत्यतत्त्व तुम्हीच आहात ते ग्रहण कसे करणार?

तत्त्वंपदाभ्यामभिधीयमानयोः
ब्रह्मात्मनोः शोधितयोर्यदीत्थम् ।
श्रुत्या तयोस्तत्त्वमसीति सम्यक्
एकत्वेन प्रतिपाद्यते मुहुः ॥२४३॥

ऐक्यं तयोर्लक्षितयोर्न वाच्ययोः
निगद्यतेऽन्योन्यविरुद्धधर्मिणोः ।
खद्योतभान्वोरिव राजभृत्ययोः
कूपाम्बुराश्योः परमाणुमेर्वोः ॥२४४॥

August 2016

| Mon | Tue | Wed | Thu | Fri | Sat | Sun | Mon | Tue | Wed | Thu | Fri | Sat | Sun | Mon | Tue | Wed | Thu | Fri | Sat | Sun |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 | 7 | 8 | 9 | 10 | 11 | 12 | 13 | 14 | 15 | 16 | 17 | 18 | 19 | 20 | 21 |
| 22 | 23 | 24 | 25 | 26 | 27 | 28 | 29 | 30 | 31 | | | | | | | | | | | |



If you think you can do a thing or think you can't do a thing, you're right.

www.madhaveeraghuveer.com

तयोर्विरोधोऽयमुपाधिकल्पितो
न वास्तवः कश्चिदुपाधिरेषः।
ईशस्य माया महदादिकारणं
जीवस्य कार्यं शृणु पञ्चकोशम्॥२४५॥

एतावुपाधी परजीवयोस्तयोः
सम्यङ्निरासे न परो न जीवः।
राज्यं नरेन्द्रस्य भटस्य खेटक-
स्तयोरपोहे न भटो न राजा॥२४६॥

अथात आदेश इति श्रुतिः स्वयं
निषेधति ब्रह्मणि कल्पितं द्वयम्।
श्रुतिप्रमाणानुगृहीतयुक्त्या
तयोर्निरासः करणीय एवम्॥२४७॥

नेदं नेदं कल्पितत्वान्न सत्यं
रज्जौ दृष्टव्यालवत्स्वप्नवच्च।
इत्थं दृश्यं साधुयुक्त्या व्यपोह्य
ज्ञेयः पश्चादेकभावस्तयोर्यः॥२४८॥

ततस्तु तौ लक्षणया सुलक्ष्यौ
तयोरखण्डैकरसत्वसिद्धये।
नालं जहत्या न तथाऽजहृत्या
किन्तूभयार्थैकतयैव भाव्यम्॥२४९॥

स देवदत्तोऽयमितीह चैकता
विरुद्धधर्मांशमपास्य कथ्यते।
यथा तथा तत्त्वमसीति वाक्ये
विरुद्धधर्मानुभयत्र हित्वा॥२५०॥

www.madhaveeraghuveer.com

September 2016

| Mon | Tue | Wed | Thu | Fri | Sat | Sun | Mon | Tue | Wed | Thu | Fri | Sat | Sun | Mon | Tue | Wed | Thu | Fri | Sat | Sun |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 | 7 | 8 | 9 | 10 | 11 | 12 | 13 | 14 | 15 | 16 | 17 | 18 |
| 19 | 20 | 21 | 22 | 23 | 24 | 25 | 26 | 27 | 28 | 29 | 30 | | | | | | | | | |

☆ 3 April 2017

संलक्ष्य चिन्मात्रतया सदात्मनो:
रखण्डभाव: परिचीयते बुधै:।
एवं महावाक्यशतेन कथ्यते
ब्रह्मात्मनोरैक्यमखण्डभाव: ॥२५१॥

'तत् त्वम् असि' इ० वाक्यामधील तत् व त्वम् पदांच्या शोधातून सांगितल्या गेलेल्या ब्रह्म व आत्मा या तत्त्वांचे पूर्ण ऐक्य पुन्हा पुन्हा श्रुतिद्वारे प्रतिपादन केले जाते. - - - - २४३

परस्परविरोधी धर्म असणाऱ्या त्या दोघांचे ऐक्य काजवा व सूर्य, विहिर व सागर, परमाणु व सुमेरु पर्वत यांच्यासारखेच आहे असे लक्ष्यार्थाने म्हणतात. वाच्यार्थाने नव्हे. - - - - - - - २४४

त्यांच्या (वाच्यार्थातील) विरोध (वेगळेपणा) हा उपाधीमुळे निर्माण झालेला आहे आणि ही उपाधी सुद्धा वास्तव नाही. महत् आदि तत्त्वांचे कारण असणारी माया ही ईश्वराची उपाधी तर कार्यरूप पंचकोश ही जीवाची उपाधी आहे. - - - २४५

या दोन उपाधी ईश्वर व आत्मा यांच्या आहेत. यांचा पूर्णपणे निरास झाला की ना ईश्वर उरतो, ना जीव! राजाचे राज्य व सैनिकाची ढाल ही त्यांची उपाधी असेल त्या दोन्हींचा जेव्हा अभाव निर्माण होतो तेव्हा ना सैनिक उरतो ना राजा! - - - - २४६

अथात आदेश - - - अशा प्रकारे श्रुति स्वत:च ब्रह्मावर कल्पिलेल्या द्वैताचा निषेध करते. श्रुति प्रमाणानुकूल युक्तिवादाने त्या दोन्हींचा निरास करायला हवा हे कल्पित असल्यामुळे खरे नाही. रज्जुवर भासणाऱ्या सर्पाप्रमाणे व स्वप्नाप्रमाणे हे सत्य नाही. अशा प्रकारे दृश्यविश्वाचा निरास करून नंतर त्या दोहोंमधील जो ऐक्य भाव उरतो तोच ज्ञेय आहे - - - - २४८

August 2016

| Mon | Tue | Wed | Thu | Fri | Sat | Sun | Mon | Tue | Wed | Thu | Fri | Sat | Sun | Mon | Tue | Wed | Thu | Fri | Sat | Sun |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 | 7 | 8 | 9 | 10 | 11 | 12 | 13 | 14 | 15 | 16 | 17 | 18 | 19 | 20 | 21 |
| 22 | 23 | 24 | 25 | 26 | 27 | 28 | 29 | 30 | 31 | | | | | | | | | | | |


Honesty is a very expensive gift, Don't expect it from cheap people.

पण त्या दोहोंच्या अखंड ऐक्यज्ञानासाठी ते
दोन्ही लक्षणेच जाणावे लागतात मात्र
त्यासाठी केवळ जहती लक्षणा पुरेशी नाही
किंवा अजहती लक्षणाही पुरेशी नाही तर
हे जहदजहल्लक्षणेनेच जाणून घ्यावे लागते. ---२४९

ज्याप्रमाणे 'तो हा देवदत्त आहे' या वाक्यातील
पदांचे ऐक्य त्यातील विरुद्ध धर्मांश दूर करून
सांगितले जाते त्याप्रमाणेच 'तत् त्वम् असि' या
वाक्यात दोन्ही पदातील विरुद्धधर्म सोडून लक्षणेने,
केवळ चैतन्याच्या सहाय्याने आत्मा व ब्रह्म यातील
ऐक्य, अखंडत्व विद्वान जाणतात. अशा प्रकारे शेकडो
महावाक्यांनी ब्रह्म व आत्मा यांचे अखंडत्व वा ऐक्य
सांगितले जाते. ------ २५० २५१

तत्वमसि ——> आचार्यांनी केलेले विवेचन

तत् — परब्रह्म | त्वम् — जीव

| | |
|---|---|
| ते परब्रह्म | तूच आहेस. |
| अविनाशी | नाशवंत |
| नित्य | अनित्य |
| अविकारी | विकारी |
| सर्वदेशी | एकदेशी |

इतका स्पष्ट फरक असताना ते एक कसे?

काजवा व सूर्य, राजा व सेवक, विहिर व सागर
यामध्ये विरोधच आहे. काजवा मंद प्रकाश तर
सूर्य धगधगीत तेजोराशि आहे. राजा सार्वभौम
अधिपती तर सेवक यःकश्चित् दास आहे. विहिरीत
पाणी मर्यादित तर सागर अथांग, अमर्याद आहे.
परमाणू सूक्ष्म तर मेरुपर्वत प्रचंड उत्तुंग, विशाल आहे.

इतके परस्परविरोधी धर्म असताना दोन्हीमध्ये
साम्य कसे दाखवता येणार? असा विचार पडतो. परंतु
थोडा सूक्ष्म विचार केला तर नीट ध्यानात येते.

www.madhavveeraghuveer.com

कजवा व सूर्य दोन्ही स्वयंप्रकाशी आहेत.
दास व राजा दोघेही राजप्रासादातच!
विहिर व सागर दोन्हीतही केवळ पाणीच
आहे. अशा रीतीने वाच्यार्थाने जरी या
जोड्यांमध्ये ऐक्य नसले तरी लक्ष्यार्थाने ते
सहज दाखवता येते

ब्रह्म व जीवात्मा यांचेही असेच आहे. दोघांमध्ये
वास्तविक भेद नाहीच. जो भेद निर्माण होतो तो
केवळ उपाधि मुळेच!

माया ही परब्रह्मांची उपाधि आहे तर
पंचकोश ही जीवाची उपाधि आहे. या उपाधी
नाहीशा झाल्या तर उरते ते ब्रह्मच!

राज्य ही राजाची उपाधि आहे आणि
तलवार ही सैनिकाची " " या दोन्ही
उपाधींचा निरास झाला तर उरतो तो केवळ मानव!

परमात्म्याच्या उपाधि निरस्त झाल्या तर उरतो
तो केवळ परमात्माच!

हे ऐक्य लक्षणेनेच जाणून घ्यावे लागते.

जहती व अजहती या दोन्ही लक्षणा घ्याव्या लागतात

लक्षणा —— काल आम्ही तुमच्या घरावरून गेलो
घरासमोरून

जहति —— गंगेवर आमचे घर आहे.
गंगेच्या काठावर असा अर्थ घ्यावा लागतो.

अजहती - कुन्ताः प्रविशन्ति। भाले प्रवेशतात.
भाले घेतलेली माणसे

यात लक्ष्यार्थात मुख्यार्थाचा समावेश होतो.
काल लताला ऐकले.
कांग्रेसवर विजय मिळवला.
विधानसभेवर भगवा फडकला.


www.madhaveeraghuveer.com

मात्र कधी कधी ज्या लक्षणेत वाच्यार्थाचा काही भाग टाकावा लागतो तर काही भाग घ्यावा लागतो ती लक्षणा म्हणजे---- जहदजहल्लक्षणा होय.

सः देवदत्तः अयम्।

सः देवदत्तः या शब्दातून पूर्वीचा संदर्भ व्यक्त होतो तर अयं देवदत्तः मधून आता दिसत असलेला देवदत्त हा अर्थ स्पष्ट होतो. म्हणजे स्थलकालानुसार बदल झाला असला तरी दोन्ही भिन्न नाहीत एकच आहेत असा अर्थ स्पष्ट होतो.

परब्रह्म आणि जीव यांच्या बाबतीत देखील हेच लागू पडते.

तत् ———→ सर्वगत चैतन्य —— सर्वत्र

त्वम् ———→ उपाधियुक्त चैतन्य —आत्मा

या ठिकाणी दोन्ही पदांतील common factor घ्यायचा - चैतन्य, ते शक्तीत्व बाकीचे सोडून द्यायचे

अशा रीतीने सर्वच महावाक्ये ब्रह्म व आत्मा यांच्या अखंडत्वाचा वा ऐक्याचा पुरस्कार करतात.

अस्थूलमित्येतदसन्निरस्य
सिद्धं स्वतो व्योमवदप्रतर्क्यम्।
अतो मृषामात्रमिदं प्रतीतं
जहीहि यत्स्वात्मतया गृहीतम्।
ब्रह्माहमित्येव विशुद्धबुद्ध्या
विद्धि स्वमात्मानमखण्डबोधम्॥२५२॥

अस्थूल अशा प्रकारे असत् चा निरास करून आकाशासरखे अतर्क्य असे ब्रह्म स्वतःच सिद्ध होते. म्हणून आत्मस्वरूप म्हणून गृहीत धरलेले हे सर्व केवळ मिथ्या म्हणून सोड. आणि 'मी ब्रह्म आहे' म्हणून विशुद्ध बुद्धीने केवळ



www.madhaveeraghuveer.com

WEDNESDAY
AUG '16
17
230-136 WK-33

अखंड बोधस्वरूपाला ओळख.
बृहदारण्यक - ३.८ याज्ञवल्क्य - गार्गी संवाद ----
ब्रह्म हे स्थूल नाही, अणुस्वरूप नाही, ह्रस्व-दीर्घ नाही
अशा श्रुतिवचनांचा आधार घेऊन विश्वाचा निरास करावा. त्यासाठी देहावरील ममत्व सोडावे.

मृत्कार्यं सकलं घटादि सततं मृन्मात्रमेवाभितः
तद्वत्सज्जनितं सदात्मकमिदं सन्मात्रमेवाखिलम्।
यस्मान्नास्ति सतः परं किमपि तत्सत्यं स आत्मा स्वयं
तस्मात्तत्त्वमसि प्रशान्तममलं ब्रह्माद्वयं यत्परम्॥२५३

घट इ. सर्व जे मातीपासून बनले आहे ते नेहमीच सर्वबाजूंनी मातीशिवाय दुसरे काही नाही. त्याप्रमाणे सत तत्त्वापासून निर्माण झालेले हे सर्व सत्स्वरूप आहे व सत शिवाय काहीही नाही. कारण सत शिवाय दुसरे काही श्रेष्ठही नाही. जर सत्य काही असेल तर ते केवळ आत्माच आहे. म्हणून जे प्रशांत, विमल, अद्वितीय असे आत्मतत्त्व ते तूच आहेस.
सोऽहम् ची जाणीव आचार्य करून देतात.

आपण ज्याला माझे घर, माझी माणसे म्हणत असतो ते सर्व काही काळच साथ देतात.
सुंदरा, चतुरा, मधुरा, अंतरा।

धनानि भूमौ पशवश्च गोष्ठे
भार्या गृहद्वारे जनाः श्मशाने
देहश्चितायां परलोकमार्गे
कर्मानुगो गच्छति जीव एकः।

August 2016

| Mon | Tue | Wed | Thu | Fri | Sat | Sun | Mon | Tue | Wed | Thu | Fri | Sat | Sun | Mon | Tue | Wed | Thu | Fri | Sat | Sun |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 | 7 | 8 | 9 | 10 | 11 | 12 | 13 | 14 | 15 | 16 | 17 | 18 | 19 | 20 | 21 |
| 22 | 23 | 24 | 25 | 26 | 27 | 28 | 29 | 30 | 31 | | | | | | | | | | | |


Nothing is particularly hard if you divide it into small jobs.

www.madhaveeraghuveer.com

निद्राकल्पितदेशकालविषयज्ञात्रादि सर्वं यथा
मिथ्या तद्वदिहापि जाग्रति जगत् स्वाज्ञानकार्यत्वतः ।
यस्मादेवमिदं शरीरकरणप्राणाहमाद्यप्यसत्
तस्मात्तत्त्वमसि प्रशान्तममलं ब्रह्माद्वयं यत्परम् ॥२५४॥

ज्याप्रमाणे झोपेत दिसणारे देश, काळ, विषय, ज्ञाते इ. हे सर्व असत् आहे. म्हणून जे प्रशांत, विमल, अद्वय असे परब्रह्म तू आहेस.

झोपेत दिसणाऱ्या व्यक्ती, वस्तू, घटना खऱ्या नसतात. तसेच इथे अज्ञानामुळे भासणारे विश्व खरे नसते. जरी जागृतावस्थेत आपल्याला त्या जाणवत असल्या, दिसत असल्या तरी ते सर्व मिथ्या म्हणजेच परिवर्तनशील असते. ज्याला आपण म्हणून कवटाळतो ते सर्व असत् आहे. या सर्वांहून वेगळे असे प्रशान्त, विमल ब्रह्म तूच आहेस असे तू जाण.

जातिनीतिकुलगोत्रदूरगं
नामरूपगुणदोषवर्जितम् ।
देशकालविषयातिवर्ति यद्
ब्रह्म तत्त्वमसि भावयात्मनि ॥२५५॥

September 2016

| Mon | Tue | Wed | Thu | Fri | Sat | Sun | Mon | Tue | Wed | Thu | Fri | Sat | Sun | Mon | Tue | Wed | Thu | Fri | Sat | Sun |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 | 7 | 8 | 9 | 10 | 11 | 12 | 13 | 14 | 15 | 16 | 17 | 18 |
| 19 | 20 | 21 | 22 | 23 | 24 | 25 | 26 | 27 | 28 | 29 | 30 | | | | | | | | | |



www.madhaveeraghuveer.com

यत्परं सकलवागगोचरं
गोचरं विमलबोधचक्षुषः।
शुद्धचिद्घनमनादिवस्तु
ब्रह्म तत्त्वमसि भावयात्मनि॥२५६॥

षड्भिरूर्मिभिरयोगि योगिहृद्
भावितं न करणैर्विभावितम्।
बुद्ध्यवेद्यमनवद्यभूति यद्
ब्रह्म तत्त्वमसि भावयात्मनि॥२५७॥

सहा प्रकारच्या उर्मींशी ज्यांचा संबंध नाही असे योगिजन हृदयात ज्याचे चिंतन करतात जे इंद्रियांना न आकळणारे, बुद्धीला न कळणारे, निर्दोष ऐश्वर्ययुक्त असे जे ब्रह्मतत्त्व तेच आहेस असा मनाशी विचार कर.

क्षुधा, तृषा, जरा, मृत्यु, शोक, मोह असा ६ उर्मि आहेत. यांची जाणिवही त्यांना होत नाही. — योगी

इथे योगी म्हणजे ज्याचे मन परमेश्वराशी एकरूप झाले आहे असा! एकदा परमेश्वराशी एकरूप मन झाले की मग त्याला कुठली तहानभूक?

एक हुतो सो गयो श्यामसंग (अशी) अवस्था होते.
दहा पाच असतो का रे मने उद्धवा?
एक मात्र होते ते मी दिले माधवा।

www.madhaveeraghuveer.com

August 2016

| Mon | Tue | Wed | Thu | Fri | Sat | Sun | Mon | Tue | Wed | Thu | Fri | Sat | Sun | Mon | Tue | Wed | Thu | Fri | Sat | Sun |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 | 7 | 8 | 9 | 10 | 11 | 12 | 13 | 14 | 15 | 16 | 17 | 18 | 19 | 20 | 21 |
| 22 | 23 | 24 | 25 | 26 | 27 | 28 | 29 | 30 | 31 | | | | | | | | | | | |

भ्रान्तिकल्पितजगत् कलाश्रयं
स्वाश्रयं च सदसद् विलक्षणम्।
निष्कलं निरुपमानम् ऋद्धिमत्
ब्रह्म तत्त्वमसि भावयात्मनि ॥२५५॥

जन्मवृद्धिपरिणत्यपक्षय
व्याधिनाशविहीनमव्ययम्।
विश्वसृष्ट्यवनघातकारणं
ब्रह्म तत्त्वमसि भावयात्मनि ॥२५६॥

भ्रमामुळे भासणाऱ्या जगत्‌रूपी कलेचा आश्रय, स्वतःचा आश्रय असे सत् व असत् याहून वेगळे, निरवयव, अनुपम, ऐश्वर्यशाली असे जे ब्रह्मतत्त्व ते तू आहेस असा मनाशी विचार कर.

विश्व भासते परब्रह्मावर आणि लय पावते ही परब्रह्मातच ∴ परब्रह्म हेच त्याचे आश्रयस्थान आहे. या परब्रह्माला कशाचीही उपमा देता येत नाही, कारण तेच सर्वश्रेष्ठ तत्त्व आहे.

अस्तभेदमनपास्तलक्षणं
निस्तरङ्गजलराशिनिश्चलम्।
नित्यमुक्तमविभक्तमूर्ति यद्
ब्रह्म तत्त्वमसि भावयात्मनि॥२६०॥

एकमेव सदनेककारणं
कारणान्तरनिरासकारणम्।
कार्यकारणविलक्षणं स्वयं
ब्रह्म तत्त्वमसि भावयात्मनि॥२६१॥

जे भेदरहित आहे विकाररहित आहे. तरंगरहित समुद्रासारखे निश्चल आहे. नित्यमुक्त आहे, विभागरहित आहे ते ब्रह्मतत्त्व तूच आहेस असा मनाशी निश्चय कर. ब्रह्माला सागराची उपमा दिली आहे. निश्चल स्थिर शांत आहे. ---- २६०

भगवद्गीता ——— आपूर्यमाणमचलप्रतिष्ठम्।

अनेकांचे एकमेव कारण असणारे, इतर कारणांच्या निरास करणारे, स्वतः कार्य व कारण यांहून वेगळे असणारे ते ब्रह्मतत्त्व तूच आहेस असा विचार कर.

ब्रह्माला इथे अनेककारण म्हटले आहे. म्हणजेच बहुविध विश्व।

इथे कारण म्हणजे माया व कार्य म्हणजे विश्व। त्यामुळे तो कारणहि नाही कार्यही नाही. तो क्षरही नाहि अक्षरही नाही. तो विलक्षण आहे.

सगुण निर्गुण दोन्ही विलक्षण।
ब्रह्म सनातन ईश्वर हा।

August 2016

| Mon | Tue | Wed | Thu | Fri | Sat | Sun | Mon | Tue | Wed | Thu | Fri | Sat | Sun | Mon | Tue | Wed | Thu | Fri | Sat | Sun |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 | 7 | 8 | 9 | 10 | 11 | 12 | 13 | 14 | 15 | 16 | 17 | 18 | 19 | 20 | 21 |
| 22 | 23 | 24 | 25 | 26 | 27 | 28 | 29 | 30 | 31 | | | | | | | | | | | |


Nothing is more beautiful, than a believing heart.

www.madhaveeraghuveer.com

निर्विकल्पमनल्पमक्षरं
यत्क्षराक्षरविलक्षणं परम्।
नित्यमव्ययसुखं
ब्रह्म तत्त्वमसि भावयात्मनि॥२६२॥

यद्विभाति सदनेकधा भ्रमात्
नामरूपगुणविक्रियात्मना।
हेमवत् स्वयमविक्रियं सदा
ब्रह्म तत्त्वमसि भावयात्मनि॥२६३॥

जे स्वतः सदैव सोन्याप्रमाणे अविकारी आहे पण भ्रमामुळे नामरूपादि विकारांच्या रूपात अनेक प्रकारचे भासते ते ब्रह्मतत्त्व तूच आहेस असा मनाशी विचार कर.

एकच सोने कुंडल, हार, अंगठी, बांगड्या अशा विविध आकारांचे झाले की अनेकविध वाटते. तसेच ब्रह्म सुध्दा एकच आहे परंतु नामरूपांनी भिन्न भासते. एकच स्त्री जशी आई, बहीण, पत्नी वहिनी, काकू, आत्या असते तसेच आहे हे! नाती वेगळी असली तरी स्त्री एकच असते. त्याचप्रमाणे विश्व बहुविध भासत असले तरी त्यातील चैतन्य एकच असते.

www.madhaveeraghuveer.com

यच्चकास्ति अनपरं परात्परं
प्रत्यगेकरसमात्मलक्षणम् ।
सत्यचित् सुखमनन्तमव्ययम्
ब्रह्म तत्त्वमसि भावयात्मनि ॥२६४॥

उक्तमर्थमिममात्मनि स्वयं
भावय प्रथितयुक्तिभिर्धिया
संशयादिरहितं कराम्बुवत्
तेन तत्त्वनिगमो भविष्यति ॥२६५॥

जे अप्रतिमरूपाने प्रकाशते आहे, श्रेष्ठातिश्रेष्ठ आहे, एकमेव व सर्वांचा अंतरात्मा आहे. जे सत्य, चिद्रूप, सुखरूप अनंत अविनाशी आहे ते तूच आहेस असा मनाशी निश्चय कर.

हे जे सांगितले त्याविषयी स्वतःच्या मनाशी पूर्वीच्या युक्तिवादांच्या सहाय्याने व स्वतःच्या बुद्धीने विचार कर. म्हणजे हातावर पडणाऱ्या पाण्या-प्रमाणे संशय-विपर्ययाने रहित अशा तत्त्वाचे ज्ञान होईल.

आचार्य कधीच 'मी सांगतो म्हणून ऐक' असे म्हणत नाहीत. ते स्पष्ट सांगतात की यावर तू तुझ्या बुद्धीने विचार कर. म्हणजे तुला शाश्वत सत्य काय ते उलगडेल. हातावर पाणी जसे सहजतेने पडते किंवा जितक्या सहजतेने घेता येते, तितक्या सहजतेने ब्रह्मतत्त्वाचे ज्ञान शिष्याला होईल अशी त्यांना खात्री वाटते

स्वं बोधमात्रं परिशुद्धतत्त्वं
विज्ञाय संघे नृपवच्च सैन्ये।
तदात्मनैवात्मनि सर्वदा स्थितो
विलापय ब्रह्मणि विश्वजातम्॥२६६॥
बुद्धौ गुहायां सदसद्विलक्षणम्
ब्रह्मास्ति सत्यं परमद्वितीयम्॥
तदात्मना योऽत्र वसेद् गुहायां
पुनर्न तस्याङ्गगुहाप्रवेशः॥२६७॥

सैन्यातील राजाप्रमाणे भूतसंघातील विशुद्ध ज्ञानरूप आत्मतत्त्वाला जाणून सदैव तादात्म्यरूपाने राहणारा तू अखिल दृश्यविश्वाला त्या ब्रह्मतत्त्वात विलीन कर.

सैन्यात राजा जसा प्रेरणास्रोत, सर्वांचा नियंत्रक स्वामी असतो. तो केवळ अग्रभागी असला म्हणजे त्याच्या केवळ अस्तित्वानेच सैनिकांमध्ये वीरश्री संचारते तसाच आत्माही भूतसंघाचा म्हणजेच प्राणिमात्रांचा नियंत्रक असतो. अशा सर्वगत, सर्वव्यापक ब्रह्मात दृश्याचा विलय करून त्या परब्रह्माशी एकाकार हो.

सदसद्विलक्षण, सत्य, श्रेष्ठ, अद्वितीय असे ब्रह्मतत्त्व बुद्धिरूपी गुहेत राहते. जो या गुहेत त्याच्याशी एकरूप होऊन राहतो त्याला पुन्हा शरीररूपी गुहेत प्रवेश करावा लागत नाही.

हा बुद्धिरूपी गुहेचा उल्लेख उपनिषदातील आहे.

मूलतत्त्व हे गूढ जागीच असणार म्हणून ते तत्त्व गुहेत राहते असे म्हटले असावे.

बुद्धिगुहा व अंगगुहा असे दोन शब्द वापरून आचार्य मांडणीमध्ये लालित्य आणतात.

आत्मरूप झाला की पुन्हा जन्म नाही, हे त्यांना यातून सुचवायचे आहे.

September 2016

| Mon | Tue | Wed | Thu | Fri | Sat | Sun | Mon | Tue | Wed | Thu | Fri | Sat | Sun | Mon | Tue | Wed | Thu | Fri | Sat | Sun |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 | 7 | 8 | 9 | 10 | 11 | 12 | 13 | 14 | 15 | 16 | 17 | 18 |
| 19 | 20 | 21 | 22 | 23 | 24 | 25 | 26 | 27 | 28 | 29 | 30 | | | | | | | | | |

(२८) वासनानाशाचा उपाय
२६८ ते ३२१

५ जून २०१६



ज्ञाते वस्तुन्यपि बलवती वासनाऽनादिरेषा।
कर्ता भोक्ताप्यहमिति दृढा यास्य संसारहेतुः।
प्रत्यग्दृष्ट्याऽऽत्मनि निवसता सापनेया प्रयत्नात्
मुक्तिं प्राहुस्तदिह मुनयो वासनातानवं यत्॥

परमात्मतत्त्वाचे ज्ञान झाले तरीसुद्धा 'मी कर्ता आहे, भोक्ता आहे' अशा स्वरूपाची ही अनादि दृढ अशी जी वासना ती प्राण्या संसरणाचे कारण आहे. प्रत्यग् दृष्टीने आत्म्यात स्थिर राहणाऱ्याने ती प्रयत्नपूर्वक दूर केली पाहिजे. इथे वासनांची जी क्षीणता तिलाच मुनिजन मुक्ती म्हणतात.

वासनाक्षयाचे महत्त्व पटवून सांगताना जणू काही वासनाक्षय म्हणजेच मुक्ती असे आचार्य सांगतात. वासना केव्हा नष्ट होईल? तर मनोनाश झाला तर! आणि मनोनाश म्हणजे संकल्प-विकल्प थांबणे. मात्र हे थांबवणे सोपे नाही.

एक योगी - चटकन समाधि लागत असे. राजाने घोडा देण्याचे कबूल केले. आठ दिवसांनी समाधि उतरल्यावर घोडा मागितला.

समाधि - यांत्रिक क्रिया ठरली.

जोवर इच्छा तोवर कर्म घडणार आणि जोवर कर्म तोवर कर्मबंधन आहेच.

म्हणून मूळच नष्ट झाले तर मुक्ती शक्य आहे. वासनेच्या मुळाशी अहंता व ममता असते. या दोन्ही नाहीशा करण्यासाठी सोऽहम् भावना वाढवली पाहिजे. त्यासाठी प्रत्येकाने स्वतःच प्रयत्न करायला हवा. 'मी करतो, मी भोगतो' यातून मुक्तता हीच आपल्याला मोक्षाकडे नेणारी आहे. मोक्ष म्हणजे या जन्मानंतर, कोठेतरी दूर प्राप्त करून घेण्याची बाब नव्हे. तर तो याच जन्मी, याच जगात, याच देहात, आत्ता मिळू शकतो।

www.madhaveeraghuveer.com

अहं ममेति यो भावो देहाक्षादावनात्मनि ।
अध्यासोऽयं निरस्तव्यो विदुषा स्वात्मनिष्ठया ॥२६९॥

देह + अक्ष + आदौ + अनात्मनि

देह, नेत्र (इ. इंद्रिये विषयी) अशा अनात्म पदार्थाविषयी 'मी, माझे' हा जो अध्यास असतो तो आत्मस्वरूपज्ञानाने नाहीसा करायला हवा.

जे नाही ते भासणे हा अध्यास आहे.

त्या देहाला मी माझे माझे म्हणतो त्यावर सुद्धा माझे नियंत्रण नाही. अनेक क्रिया, हालचाली माझ्या control बाहेर आहेत. इजा, रोग होणे न होणे हे माझ्या हातात नाही. त्यांचा कधी ना कधी नाश होणार आहे, तो मी थांबवू शकत नाही. या साऱ्या गोष्टी असत् आहेत. अशाश्वत आहेत. तो केवळ अध्यास आहे. आणि एकदा का आत्मस्वरूपाचे ज्ञान झाले की तो नाहीसा होणार आहे. हे अध्यारोप झिडकारले पाहिजेत — निरस्तव्यः

त्यामुळे हा देह, इंद्रिये, मन आणि बुद्धी कार्य करतात. ते जाणिवतत्त्व मी आहे.

मी केवळ त्यांच्या कामांचा साक्षी आहे. मी ब्रह्म आहे अशी दृढ भावना व्हायला हवी.

ज्ञात्वा स्वं प्रत्यगात्मानं बुद्धितद्वृत्तिसाक्षिणम् ।
सोऽहमित्येव सद्वृत्त्याऽनात्मन्यात्ममतिं जहि ॥२७०॥

बुद्धी आणि तिच्या वृत्ती यांचा साक्षी असणाऱ्या प्रत्यगात्म्याला स्वस्वरूपाला जाणून 'तोच मी आहे' अशा चांगल्या वृत्तीने अनात्म पदार्थाविषयी असलेली आत्मबुद्धी टाकून दे.

www.madhaveeraghuveer.com

September 2016

| Mon | Tue | Wed | Thu | Fri | Sat | Sun | Mon | Tue | Wed | Thu | Fri | Sat | Sun | Mon | Tue | Wed | Thu | Fri | Sat | Sun |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 | 7 | 8 | 9 | 10 | 11 | 12 | 13 | 14 | 15 | 16 | 17 | 18 |
| 19 | 20 | 21 | 22 | 23 | 24 | 25 | 26 | 27 | 28 | 29 | 30 | | | | | | | | | |

इथे बुद्धीबरोबरच वृत्तींचा उल्लेख आला आहे. अहंता - ममता याबरोबरच प्रिय, मोद, आमोद, प्रमोद तसेच द्वेष, मत्सर, ईर्षा, हेवा या वृत्ति अभिप्रेत आहेत. या सर्व वृत्तींचा साक्षी आत्माच आहे.

मात्र सोऽहम् भाव दृढ करण्यासाठी काही पथ्ये पाळायला हवीत. ती अशी ——

लोकानुवर्तनं त्यक्त्वा त्यक्त्वा देहानुवर्तनम्।
शास्त्रानुवर्तनं त्यक्त्वा स्वाध्यासापनयं कुरु॥२७॥

लोकांचे अनुसरण (करण्याचे) सोडून, देहाचे अनुसरण सोडून, शास्त्राचे अनुसरण सोडून स्वतःच्या अध्यासाचा निरास कर.

कोणतीही गोष्ट करताना प्रथम लोकांचा विचार मनात येतो. हा माणसाचा स्वभाव पूर्णपणे ओळखून आचार्य लोकानुवर्ती वृत्तीचा त्याग करायला लावतात. लोक दोन्ही बाजूंनी बोलतच असतात. तेव्हा अनेकविध मतांकडे लक्ष न देता आत्महित साधणे हेच श्रेयस्कर आहे.

तसेच दुसरा विचार देहाचा असतो. नवीन गोष्ट करताना शरीराला सोसेल का? कोणता त्रास तर नाही ना होणार? हा विचार मनात येतोच. असा विचार करूच नये असे आचार्यांना म्हणायचे नाही तर विचार जरूर करावा. पण त्याच एका विचारात राहू नये. शारीरिक कष्टांना घाबरून काम करण्याचे राहू नये. युद्धात जखमा होतील म्हणून युद्ध करायचे टाळायचे ठरवले तर कसे होणार? देह हा निश्चितपणे आत्मज्ञानप्राप्तीचे साधन म्हणून वापरला पाहिजे. त्याचे फाजील लाड करून चालणार नाही.

August 2016

| Mon | Tue | Wed | Thu | Fri | Sat | Sun | Mon | Tue | Wed | Thu | Fri | Sat | Sun | Mon | Tue | Wed | Thu | Fri | Sat | Sun |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 | 7 | 8 | 9 | 10 | 11 | 12 | 13 | 14 | 15 | 16 | 17 | 18 | 19 | 20 | 21 |
| 22 | 23 | 24 | 25 | 26 | 27 | 28 | 29 | 30 | 31 | | | | | | | | | | | |

याचाच पडसाद मनोबोधात उमटला आहे
देहे दुःख ते सुख मानीत जावे
विवेके सदा सस्वरूपी भरावे।
त्याचप्रमाणे आचार्य शास्त्रानुवर्तनाचा त्याग करायला सांगतात. अधिकपणाने केलेले वाचन, श्रवण, निरुपण हे निष्फळ ठरते.
परब्रह्म हे तर शब्दातीत आहे. श्रुतीदेखील नेति-नेति म्हणतात. ब्रह्माचे स्वरूप अगम्य आहे. मग अशा शास्त्रग्रंथांचे अनुसरण कशासाठी करावे?
उगीच शब्दजालात अडकून मनुष्य आत्मज्ञानापासून दूर जाण्याची शक्यता नाकारता येणार नाही.
त्यामुळे या तिन्ही गोष्टी टाकून आत्मस्वरूपावर होणारा विश्वासाचा भास नाहीसा करणे आवश्यक आहे.

लोकवासनया जन्तोः शास्त्रवासनयापि च।
देहवासनया ज्ञानं यथावन्नैव जायते॥२७२॥

लोकवासना, शास्त्रवासना आणि देहवासना या तिन्ही वासनामुळे यथार्थ ज्ञान होत नाही.
लोकांनी आपल्याला चांगले म्हणावे ही इच्छा म्हणजे लोकानुवर्तनाचाच एक भाग आहे. त्यासाठी कित्येकदा माणूस आपल्या मनाविरुद्ध अनेक गोष्टी करतो, त्यामुळे तो खरे जीवन जगतच नाही. लोकांना काय आवडेल याचा सतत विचार करत राहिला तर त्याला जीवनाचा अर्थच समजत नाही. हे जसे व्यवहारात घडते तसेच अध्यात्मक्षेत्रातही घडते. लोक सिद्धींना मान देतात. सिद्धी मिळाल्या की डोक्यावर घेतात आणि अशा सिद्धींमध्ये अडकलेला साधक आत्मस्वरूप जाणून घेत नाही. सिद्धी म्हणजच ब्रह्म असे वाटू लागते. देहवासना म्हणजे देह सुंदर दिसावा, टिकावा या इच्छेतून माणूस अधिकाधिक देहासक्त होतो

त्यातून त्याचे आत्मस्वरूपाकडे दुर्लक्ष होते. तसेच शास्त्रचर्चेत मन रमू लागले की त्यातच मोठेपणा वाटू लागतो. त्यातून खरे आत्मस्वरूप जाणून घेण्याची उत्सुकता नष्टच होते. म्हणजेच या तिन्ही वासनांमुळे प्रभाव यथार्थ स्वरूप कळत नाही. या तिन्ही वासनांना आचार्य लोहशृंखला – लोखंडाची बेडी म्हणतात.

संसारकारागृहमोक्षमिच्छो
रयोमयं पादनिबद्धशृंखलम्।
वदन्ति तज्ज्ञाः पटुवासनात्रयं
योऽस्माद्विमुक्तः समुपैति मुक्तिम्॥२७३॥

संसाररूपी कारागृहातून सुटू इच्छिणाऱ्यांच्या पायात या त्रिविध प्रबळ वासना म्हणजे जणू लोहशृंखलाच असे विद्वान म्हणतात. जो यातून मुक्त होतो तोच खरा मुक्तीच्या जवळ जातो.

जीव या त्रिविध वासनांनी बद्ध होऊन संसाररूपी कारागृहात अडकतो. या शृंखला त्याला कुशलतेने अडकवतात. या शृंखला निर्धाराने तोडाव्या लागतात. ते त्याला शक्य होते तोच मोक्षाचा अधिकारी हो

जलादिसंपर्कवशात्प्रभूत
दुर्गन्धधूतागरुदिव्यवासना।
संघर्षणेनैव विभाति सम्यक्
विधूयमाने सति बाह्यगन्धे॥२७४॥
अन्तःश्रितानन्तदुरन्तवासना
धूलीविलिप्ता परमात्मवासना।
प्रज्ञातिसंघर्षणतो विशुद्धा
प्रतीयते चन्दनगन्धवत्स्फुटा॥२७५॥

पाणी इ० च्या संपर्कामुळे दुर्गंधाने निष्प्रभ झालेला अगरु चंदनाचा सुगंध जसा ते घासल्यामुळे बाह्य दुर्गंध दूर झाल्यावर पुन्हा योग्य प्रकारे अनुभवता येतो त्याप्रमाणे अंत:करणातील अनंत आणि नष्ट होण्यास कठीण अशा वासनारूपी दुर्गंधीने मारलेली परमात्मबुद्धी बुद्धीच्या संघर्षणाने चंदनाच्या सुगंधाप्रमाणे स्पष्टपणे प्रतीत होते.

अगरबत्तीत वापरले जाणारे अगरु नावाचे सुगंधी काष्ठ आहे. त्याचा जर फार काळ पाण्याशी संपर्क आला तर त्याचा सुगंध दुर्गंधात परिणत होतो. अशावेळी जर ते पुन्हा पुन्हा घासले तर तात्पुरता आलेला दुर्गंध नाहीसा होऊन पुन्हा सुगंधाचा अनुभव घेऊ शकतो.

आत्मबुद्धीचेही तसेच आहे. ही बुद्धी वासनेच्या दुर्गंधीने मारली की ती मंदावते. एखाद्या मूळ चमकदार वस्तूवर धूळ बसली की ती वस्तू अनाकर्षक होते. तशीच ही वासना सोऽहंची प्रखर जाणीव मंद करते

अशा वेळी बुद्धीवरील वासनांची पुटे निघून जावी म्हणून बुद्धी घासावी लागते. अशा प्रयत्नांनी ती निश्चयाची आत्मबुद्धी पुन्हा प्रत्ययाला येते. ईद्धतर होते.

घासल्यामुळे आपण काही चंदनाला सुवास चढवत नाही तो आत असतोच. फक्त तो उपलब्ध झालेला नसतो. त्याच प्रमाणे दिव्यत्व हे कुठून तरी बाहेरून घ्यायचे नाही तर ते असतेच. त्यावरील वासनांचा मळ काढून टाकला की दिव्यत्व अभिव्यक्त होते. ध्यानसाधनेने यथार्थज्ञान मनात आले की त्यातील घाणेरड्या, नाठाळ वासना दूर होतात.

∴ व्यक्तिमत्वाला थोडे घासण्याची, पुसण्याची आणि तासण्याची आवश्यकता आहे. (बळे जरी केले तरी, तत्काळ वासना नसण्याची प्रक्रिया सुरु होते आणि मग 'मी ब्रह्म आहे' अशा अवस्थेपर्यंत प्रवास सुरु होतो.

September 2016

| Mon | Tue | Wed | Thu | Fri | Sat | Sun | Mon | Tue | Wed | Thu | Fri | Sat | Sun | Mon | Tue | Wed | Thu | Fri | Sat | Sun |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 | 7 | 8 | 9 | 10 | 11 | 12 | 13 | 14 | 15 | 16 | 17 | 18 |
| 19 | 20 | 21 | 22 | 23 | 24 | 25 | 26 | 27 | 28 | 29 | 30 | | | | | | | | | |

Success is journey not a destination.

अनात्मवासनाजालैस्तिरोभूतात्मवासना।
नित्यात्मनिष्ठया तेषां नाशे भाति स्वयं स्फुटा॥
॥२७६॥

अनात्मवासनांच्या जाळ्यात अदृश्य झालेली आत्मवासना सततच्या आत्मज्ञानाने त्यांचा नाश झाला असता प्रत्यक्ष प्रतीत होते.

इथे आचार्य अनात्मवासना या शब्दातून देहबुद्धी व आत्मनिष्ठा या शब्दातून आत्मबुद्धी स्पष्ट करतात.

देहबुद्धीमुळे आत्मबुद्धी झाकली गेली आहे. त्यासाठी सतत आत्मस्वरूपात राहणे हा उपाय सांगतात. निवळशंख पाण्यावर साचलेले शेवाळे सतत दूर करत राहिले तर पुढे शेवाळे साठणार नाही व स्वच्छ पाणी दिसू लागेल.

यथा यथा प्रत्यगवस्थितं मन
स्तथा तथा मुञ्चति बाह्यवासनाः।
निःशेषमोक्षे सति वासनानाम्
आत्मानुभूतिः प्रतिबन्धशून्या: ॥२७७॥

मन अंतर्मुख झाले, परमात्मस्वरूपाठायी स्थिर झाले की बाह्यवासना, आसक्ती नाहीशी होत जाते व जेव्हा ते पूर्ण निरासक्त होते तेव्हा जीवाला आत्मज्ञान होते व तो मुक्त होतो असे आचार्य सांगतात.

घिरड्याचे पीठ प्रथम चिकट असते. तव्याला चिकटून बसते. परंतु जसजसे ते शिजत जाते तसतसे ते तव्यापासून सुटत जाते. मनाचे तसेच आहे. ते विविध विषयांत आसक्त असते परंतु जसे ते अंतरात्म्याच्या ठिकाणी एकाग्र होऊ लागते तेव्हा पूर्णपणे वासनारहित होते आणि अशा वासनारहित मनाला आत्म्याचा साक्षात्कार सहज होतो.

www.madhaveeraghuveer.com

માણસાચી સહજપ્રવૃત્તિ બાજારી પદાર્થાંકડે અસતે. પરંતુ
પુરુષાર્થ કા ધરલ્યા અભાવી ગોડી લાગણી કી બાહેરચે
દુઃખ કમી હોતે.
ભ. ગૌતમ બુદ્ધ – સુખોપભોગી, વિલાસી રાજપુત્ર,
પરંતુ જેવ્હા બાહ્યજગાતીલ દુઃખ, શોક, ચિંતા યાચા અનુભવ
આલા તેવ્હા ત્યાંચે મન અંતર્મુખ ઝાલે આણિ સર્વ વાસનાંતૂન
દૂર ઝાલે. તેવ્હાચ તે અર્હત ઝાલે બુદ્ધ ઝાલે.

| WK | Mon | Tue | Wed | Thu | Fri | Sat | Sun |
|---|---|---|---|---|---|---|---|
| 35 | | | | 1 | 2 | 3 | 4 |
| 36 | 5 | 6 | 7 | 8 | 9 | 10 | 11 |
| 37 | 12 | 13 | 14 | 15 | 16 | 17 | 18 |
| 38 | 19 | 20 | 21 | 22 | 23 | 24 | 25 |
| 39 | 26 | 27 | 28 | 29 | 30 | | |

## OBJECTIVES THIS MONTH

| DATE | DESCRIPTION | REMARKS |
|---|---|---|
| | | |

AUGUST '16

| M | T | W | T | F | S | S | M | T | W | T | F | S | S |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 | 7 | 8 | 9 | 10 | 11 | 12 | 13 | 14 |
| 15 | 16 | 17 | 18 | 19 | 20 | 21 | 22 | 23 | 24 | 25 | 26 | 27 | 28 |
| 29 | 30 | 31 | | | | | | | | | | | |

2016

OCTOBER '16

| M | T | W | T | F | S | S | M | T | W | T | F | S | S |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 | 7 | 8 | 9 |
| 10 | 11 | 12 | 13 | 14 | 15 | 16 | 17 | 18 | 19 | 20 | 21 | 22 | 23 |
| 24 | 25 | 26 | 27 | 28 | 29 | 30 | 31 | | | | | | |

SEP

www.madhaveeraghuveer.com

THURSDAY
SEP '16
1
245-121 WK-35

स्वात्मन्येव सदा स्थित्या मनो नश्यति योगिनः।
वासनानां क्षयश्चातः स्वाध्यासापनयं कुरु॥
॥२७८॥

स्वात्मस्वरूपात सदैव स्थित असल्यामुळे योग्यांचे मन नष्ट होते आणि वासनांचा देखील नाश होतो म्हणून स्वतःला होणारा भास दूर कर.
सदैव आत्मस्वरूपात रहायचे असेल तर प्रथम विश्व मिथ्या हे समजले पाहिजे. विश्वाचा भास दूर झाला पाहिजे.
योग्यांचे मन नष्ट होते असा स्पष्ट उल्लेख इथे आचार्य करतात.
योगाची व्याख्याच मुळी योगश्चित्तवृत्तिनिरोधः अशी केली आहे. चित्तवृत्तींचा क्रिया निरोध करू शकणारा तो योगी! त्याचे संकल्प विकल्पावर नियंत्रण येते आणि तो ब्रह्मस्वरूपावर मन एकाग्र करू शकतो. त्यामुळे त्याचे मन नष्ट होणे सहज शक्य आहे. आणि मनच नाहीसे झाल्यावर वासना राहतील कशा आणि कुठे? म्हणजेच वासना क्षय आपोआपच होईल आणि वासनाक्षय म्हणजेच मुक्ती! As soon as mind sits at present tense it disappears!
इन्द्रियाणि मनो बुद्धि रस्याधिष्ठानमुच्यते।
एतैर्विमोहयत्येष ज्ञानमावृत्य देहिनम्॥

तमो द्वाभ्यां रजः सत्त्वात्सत्त्वं शुद्धेन नश्यति।
तस्मात्सत्त्वं अवष्टभ्य स्वाध्यासापनयं कुरु॥
॥२७९॥

रज व सत्व या दोहोंमुळे तम, रज सत्वाने आणि सत्व गुण शुद्ध सत्वामुळे नष्ट होतो म्हणून शुद्ध सत्वाचा आधार घेऊन स्वतःला होणारा भास

September 2016

| Mon | Tue | Wed | Thu | Fri | Sat | Sun | Mon | Tue | Wed | Thu | Fri | Sat | Sun | Mon | Tue | Wed | Thu | Fri | Sat | Sun |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 | 7 | 8 | 9 | 10 | 11 | 12 | 13 | 14 | 15 | 16 | 17 | 18 |
| 19 | 20 | 21 | 22 | 23 | 24 | 25 | 26 | 27 | 28 | 29 | 30 | | | | | | | | | |

पुढे चालू



www.madhavaacharyuveer.com

धरिधरा. सुबुद्ध चिंतनाने विवेकाग्रत या. प्रामाणिक प्रयत्न करा. आणि अंतरीचा हा अध्यास दूर करा.



थोडक्यात आचार्य पायरी पायरीने, हळूहळू गुणातीत व्हायला सांगत आहेत.

शुद्धसत्त्व हे आत्म्याचेच स्वरूप आहे.

तामस — तीव्र लालसा, आळस, क्रोध

राजस — क्रियाशीलता, अधिक जोमाने परंतु स्वार्थी हेतूने कार्य करतो. विषयोपभोगी

सात्त्विक - ध्येयनिष्ठा, भक्ती, शांतचित्त.

शुद्ध सत्त्व — सात्त्विक वासनाही संपतात.

शरीरं सुरूपं तथा वा कलत्रं
यशश्चारुचित्रं धनं मेरुतुल्यम्।
मनश्चेन्न लग्नं गुरोरङ्घ्रिपद्मे
ततः किं ततः किं ततः किं ततः किम्।

प्रारब्धं पुष्यति वपुरिति निश्चित्य निश्चलः।
धैर्यमालम्ब्य यत्नेन स्वाध्यासापनयं कुरु॥२९०॥

प्रारब्ध शरीराचे पोषण करते असा निश्चयबुद्धीने निश्चय करून धैर्य धारण करून प्रयत्नपूर्वक स्वतःला होणारा अध्यास दूर कर.

कर्मविपाक सिद्धांतानुसार माणसाच्या प्रारब्धा-मुळे त्याला देह प्राप्त होत असतो. प्रारब्ध म्हणजे फलोन्मुख होणारे पूर्वकर्म होय.

आपल्याला खऱ्या ब्रह्मस्वरूपावर विश्वास भास होत असतो नसाच मी म्हणजे देह असे निश्चयाने वाटत असते. प्रारब्ध असेपर्यंत हा देह कार्यरत राहणार. प्रारब्ध संपल्यावर तो नाहीसा होणार. तो शाश्वत नाही हे लक्षात घेऊन देहविषयी विचार न करता मुमुक्षुने आपल्याला होणारा अध्यास दूर करावा. मात्र देहावरील ममत्व सोडण्यासाठी धैर्य हवे. म्हणून ते धैर्याचा अवलंब करायला सांगतात.

October 2016

| Mon | Tue | Wed | Thu | Fri | Sat | Sun | Mon | Tue | Wed | Thu | Fri | Sat | Sun | Mon | Tue | Wed | Thu | Fri | Sat | Sun |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 | 7 | 8 | 9 | 10 | 11 | 12 | 13 | 14 | 15 | 16 |
| 17 | 18 | 19 | 20 | 21 | 22 | 23 | 24 | 25 | 26 | 27 | 28 | 29 | 30 | 31 | | | | | | |



OCT
NOV

नाहं जीवः परं ब्रह्मेत्यतद्व्यावृत्तिपूर्वकम् ।
वासनावेगतः प्राप्तस्वाध्यासापनयं कुरु ॥
॥२७९॥

मी जीव नाही, परब्रह्म आहे अशा प्रकारे (जीव...) निषेध करून वासनांच्या वेगामुळे प्राप्त झालेला स्वतःला होणारा भास दूर कर.

मी जीव नाही, मी ब्रह्म आहे. असे सतत म्हणून जीवत्वाचा निषेध करावा. नेहमीच्या व्यवहारातसुद्धा आजारी माणसाने Positive विचार करावा असे आपण सांगतो. मी बरा होणार आहे असे म्हणत राहिल्याने त्याच्या मनातील आजारपणाची भावना खरोखर नाहीशी होते. त्याचप्रमाणे अहं ब्रह्मास्मि ही भावना दृढ धरल्यास जीवोऽहम् हा अध्यास आपोआपच कमी होत जातो कारण शेवटी तो मनानेच निर्मिलेला असतो

मी म्हणजे कोण? तर शरीर मन बुद्धी यापैकी कोणत्याही मर्यादा किंवा गुणदोषांत न अडकलेले ब्रह्म आहे. सर्वव्यापी शाश्वत सत्यस्वरूप मी आहे.

अशा निश्चयात्मक विचारांनी नकारात्मक कल्पनांचा नाश होऊ शकतो. विपरीत भावनांचा संपूर्णपणे निःपात होऊ शकतो

श्रुत्या युक्त्या स्वानुभूत्या ज्ञात्वा सार्वात्म्यमात्मनः ।
क्वचिदाभासतः प्राप्तस्वाध्यासापनयं कुरु ॥२८०॥

श्रुती, युक्ती व स्वानुभूति यांच्या सहाय्याने आत्म्याचे सर्वव्यापकत्व जाणून कधीतरी आभासाने प्राप्त झालेला स्वतःचा अध्यास दूर कर

शास्त्रप्रचीती, गुरुप्रचीती, आत्मप्रचीती

www.madhavveeraghuveer.com

गुळाची गोडी कशी आहे? याविषयी चौकशी करत बसण्यापेक्षा प्रत्यक्ष गूळ खाल्ला तर ती पटकन कळते. तसेच ब्रह्मप्राप्तीचेही आहे. ब्रह्म कसे याचे चर्वितचर्वण करत बसण्यापेक्षा ब्रह्मप्राप्तीला आवश्यक ती साधना करून ब्रह्म स्वतःच आणून घ्यायला हवे.

स्वानुभूती हे ब्रह्मज्ञानाचे सर्वोत्कृष्ट साधन आहे भर्तृहरी नीतिशतकात म्हणतो –

स्वानुभूत्येकसाराय नमः शान्ताय तेजसे। याव‍रून स्वानुभूतीचे श्रेष्ठत्व लक्षात येते.

अन्नादानविसर्गाभ्यामीषन्नास्ति क्रिया मुनेः
तदेकनिष्ठया नित्यं स्वाध्यासापनयं कुरु ॥२८३॥

अन्नग्रहण व विसर्जन याशिवाय अन्य कोणतीही क्रिया ज्ञान्याला नसतेच.

देहाला आवश्यक तितके अन्नग्रहण आणि नाइलाजाने मलमूत्रविसर्जन ही दोन कर्मे तेवढीच करावी लागतात. तो नैष्कर्म्यातीत झाल्यामुळे इतर कोणत्याही क्रियांचे बंधन त्याला नसते. व त्याची आवश्यकताही नसते.

प्रारब्ध संपेपर्यंत देहत्याग करता येत नाही. एरवी तो आपला ब्रह्मस्वरूपात मन एकाग्र करून निश्चिंत राहतो.

भोजन करणे म्हणजे केवळ तोंडात अन्न घालणे एवढ्यापुरतेच मर्यादित नाही. त्याबद्दल उत्कंठा असणे, त्यासाठी योजना आखणे, धडपड करणे, तोंडाला पाणी सुटणे इ. मात्र जो श्रुतींच्या अध्ययनामध्ये गर्क असतो, त्याला या सर्व गोष्टींचे भान उरत नाही. या गोष्टी त्याला विचलित करत नाहीत.

October 2016

| Mon | Tue | Wed | Thu | Fri | Sat | Sun | Mon | Tue | Wed | Thu | Fri | Sat | Sun | Mon | Tue | Wed | Thu | Fri | Sat | Sun |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 | 7 | 8 | 9 | 10 | 11 | 12 | 13 | 14 | 15 | 16 |
| 17 | 18 | 19 | 20 | 21 | 22 | 23 | 24 | 25 | 26 | 27 | 28 | 29 | 30 | 31 | | | | | | |



www.madhaveeraghuveer.com

MONDAY
SEP '16
5
249-117 WK-36

निसर्गसंवेदना स्वीकारण्याच्या आणि त्यांना प्रतिसाद देण्याच्या बाबतीत स्वतः तटस्थ राहण्याची वृत्ति, सावकाश व [illegible]पूर्वक असली पाहिजे. चिंतनशील मानव या व्यावहारिक गोष्टींशी फारसा समरस होत नाही. काही क्रिया देहपातळीवर घडत राहतील पण तो त्यांच्यात गुंतून पडत नाही.

महान शास्त्रज्ञ, संशोधक, कलाकार यांची ही अशी अलिप्तता असते. त्यांच्या ध्येयावरील निष्ठेने ही त्यांना सहज साधता येते. नितरां स्थितिः - निष्ठा)

तत्त्वमस्यादिवाक्योत्थब्रह्मात्मैकत्वबोधतः।
ब्रह्मण्यात्मत्वदार्ढ्याय स्वाध्यासापनयं कुरु ॥२८

तत्त्वमसि इ० वाक्यातून सांगितलेल्या ब्रह्म व आत्मा यांच्या ऐक्यज्ञानाने ब्रह्माठायी आत्म्याचे ऐक्य दृढ होण्यासाठी स्वतःला होणारा अध्यास दूर कर.

ऋग्वेद - प्रज्ञानं ब्रह्म।
यजुर्वेद - अहं ब्रह्मास्मि।
सामवेद - तत्त्वमसि
अथर्ववेद - अयमात्मा ब्रह्म।

September 2016

| Mon | Tue | Wed | Thu | Fri | Sat | Sun | Mon | Tue | Wed | Thu | Fri | Sat | Sun | Mon | Tue | Wed | Thu | Fri | Sat | Sun |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 | 7 | 8 | 9 | 10 | 11 | 12 | 13 | 14 | 15 | 16 | 17 | 18 |
| 19 | 20 | 21 | 22 | 23 | 24 | 25 | 26 | 27 | 28 | 29 | 30 | | | | | | | | | |



www.madhaveeraghuveer.com

६ जून २०१८



अहंभावस्य देहेऽस्मिन् निःशेषविलयावधि ।
सावधानेन युक्तात्मा स्वाध्यासापनयं कुरु ॥ २८१ ॥

या देहातील अहंभावाचा निःशेष नाश होईपर्यंत सावध व एकाग्रचित्त होऊन स्वतःला होणारा भास दूर कर इथे आचार्य अध्यासनिवृत्तीची मर्यादा सांगतात.

अध्यासाची निर्मिती अज्ञानातून झाली आहे आणि अहंभाव हे अज्ञानाचेच मूर्तरूप आहे. म्हणून अध्यास पूर्णपणे नाहीसा केव्हा होईल? तर, अहंभाव जोपर्यंत समूळ नष्ट होत नाही तोपर्यंत अध्यास नष्ट होणार नाही. थोडाजरी शिल्लक राहिला तरी पुन्हा डोके वर काढतो.

ऋण व रोग अंशतः शिल्लक असेल तरी पुन्हा वाढत जाऊन विराट रूप धारण करतात.

मरेपर्यंत काशी हा शब्दप्रयोगदेखील विचित्र वाटू शकतो पण आशय तोच आहे.

अहंभाव किंचित कमी झाला म्हणजे अध्यास दूर होईलच असे नाही, म्हणून निःशेष निरास आवश्यक आहे. त्यासाठी आचार्य सावधान व युक्त असा शब्द वापरतात. दक्ष राहून सतर्क राहून हे सर्व करायला हवे. युक्तात्मा म्हणजे मन विषयांवरनी ब्रह्मावर केंद्रित करणे आहे.

October 2016

| Mon | Tue | Wed | Thu | Fri | Sat | Sun | Mon | Tue | Wed | Thu | Fri | Sat | Sun | Mon | Tue | Wed | Thu | Fri | Sat | Sun |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 | 7 | 8 | 9 | 10 | 11 | 12 | 13 | 14 | 15 | 16 |
| 17 | 18 | 19 | 20 | 21 | 22 | 23 | 24 | 25 | 26 | 27 | 28 | 29 | 30 | 31 | | | | | | |

A person's true wealth is the good he or she does in the world.

प्रतीतिर्जीवजगतो स्वप्नवत् भाति यावता।
तावत् निरन्तरं विद्वन् स्वाध्यासापनयं कुरु।

जोवर जीव व जग यांची जाणिव स्वप्नासारखी होत राहील तोवर सदैव स्वतःला होणारा भास दूर कर.

आचार्य मुमुक्षुला स्पष्टपणे बजावतात की जीव व विश्व या दोन्ही गोष्टी स्वप्नवत् आहेत, भासरूप आहेत. स्वप्नासारख्या अनित्य आहेत. हे मनाशी दृढ धरून त्याचा भास नाहीसा करण्याचा प्रयत्न कर. आणि शिष्य हे करू शकेल हा विश्वास त्याला देण्यासाठी आचार्य त्याला विद्वन् :. संबोधतात.

हिंदू धर्मामध्ये दोन प्रकारच्या आत्मसाक्षात्कारी पुरुषांना आदरणीय व मान्यवर समजले जाते.

१. जे साक्षात्कारानंतरही समाजात कार्य करीत राहतात. त्यांना भोवतालच्या जगाचा प्रत्यय येत असतो म्हणून ते कर्म करत राहतात. परंतु कर्म करत असताना 'हे जग मिथ्या आहे' याची त्यांना पूर्णपणे जाणीव असते. श्रीरामचंद्र, श्रीकृष्ण, शंकराचार्य, जनक ही ठळक उदाहरणे आहेत. [कारक पुरुष]

कर्मणैव हि संसिद्धिमास्थिता जनकादयः।

२. इतर काही जण मात्र निदिध्यासनाकडे पूर्ण वळलेले असतात. जेव्हा त्यांना सृष्टीमध्ये वैविध्याची गोचरता प्रत्ययाला येते, तेव्हा ते आपले मन परावृत्त करून घेऊन ब्रह्मभावातच राहण्याचा प्रयत्न करतात.

निद्राया लोकवार्तायाः शब्दादेरपि विस्मृतेः।
क्वचिन्नावसरं दत्त्वा चिन्तयात्मानमात्मनि॥२८७॥

निद्रा लोकवार्ता व शब्द इ० मुळे आत्मस्वरूपाच्या विस्मृतीला कोणते तरी अवसर न देता स्वस्वरूपाचा विचार कर

September 2016

| Mon | Tue | Wed | Thu | Fri | Sat | Sun | Mon | Tue | Wed | Thu | Fri | Sat | Sun | Mon | Tue | Wed | Thu | Fri | Sat | Sun |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 | 7 | 8 | 9 | 10 | 11 | 12 | 13 | 14 | 15 | 16 | 17 | 18 |
| 19 | 20 | 21 | 22 | 23 | 24 | 25 | 26 | 27 | 28 | 29 | 30 | | | | | | | | | |


Misfortune shows those who are not really friends.

आत्मस्वरूपाच्या चिंतनातील अडथळे सांगून त्यांना मुमुक्षुने वाव देऊ नये असे स्पष्टपणे सांगत आहेत.

(१) निद्रा, लोकांचे आक्षेप व शब्दादी विषये या तीन गोष्टी प्रामुख्याने आत्मचिंतनाच्या आड येतात.

निद्रा ही आत्मस्वरूपाचे विस्मरण घडवून आणण्यात अग्रभागी आहे. संतांनी तिची निर्भत्सना केली आहे.

निद्रा ही रांड खोटी । नित्य लागलीसे पाठी
आयुष्य व्यर्थ गेले । पाहू नेदी जगजेठी ॥

(२) यानंतरचा अडथळा म्हणजे लोकांचे आक्षेप.

दुसऱ्याच्या प्रत्येक गोष्टीत आपण काहीतरी बोललेच पाहिजे अशी सामान्यपणे लोकांना सवय असते. आणि प्रत्येक गोष्टीवर उलटसुलट मते व्यक्त केली जातात. त्यामुळे गोंधळ वाढतो. व्यवहारात तर हे प्रत्ययाला येतेच परंतु अध्यात्मातदेखील अनाहूत सल्ले दिले जातात. योगमार्ग की कर्ममार्ग निवडावा का नामस्मरण करावे याविषयी प्रत्येकजण ठामपणे सांगत असतो.

'ऐकावे जनाचे करावे मनाचे' असे वागावे.

परंतु याहीपलीकडे जाऊन संत वेगळाच उपाय सांगतात ते म्हणतात. परमार्थ झाकून करावा असे केले असता लोकांना त्याविषयी चर्चा करायला वावच मिळत नाही. त्याचा गाजावाजा करू नये.

परमार्थ हा आत्मदर्शनासाठी करायचा असतो, प्रदर्शनासाठी नाही.

(३) तिसरा अडथळा हा शब्दादी विषयांच्या आकर्षणाचा आहे. 'शब्द' यातून शब्द, स्पर्श, रूप, रस, गंध या पंचविषयांचा निर्देश केला आहे.

October 2016

| Mon | Tue | Wed | Thu | Fri | Sat | Sun | Mon | Tue | Wed | Thu | Fri | Sat | Sun | Mon | Tue | Wed | Thu | Fri | Sat | Sun |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 | 7 | 8 | 9 | 10 | 11 | 12 | 13 | 14 | 15 | 16 |
| 17 | 18 | 19 | 20 | 21 | 22 | 23 | 24 | 25 | 26 | 27 | 28 | 29 | 30 | 31 | | | | | | |

विषयांच्या अभिलाषेत मन गुंतले असेल अशा वेळी आत्मचिंतन कसे शक्य आहे, एकाचवेळी विषय व आत्मा या दोन्हीत मन स्थिर रहाणे शक्य नाही. एका म्यानात दोन तलवारी राहू शकत नाहीत.
आणि म्हणूनच शब्दादि विषयांची अभिलाषा दूरच ठेवली पाहिजे.

मात्रापित्रोर्मलोद्भूतं मलमांसमयं वपुः।
त्यक्त्वा चाण्डालवद्दूरं ब्रह्मीभूय कृती भव॥
॥२८८॥

हे शरीर त्याज्य आहे असे वाटावे म्हणून आचार्य त्याचा टाकाऊपणा वर्णन करतात.
मातापित्यांच्या ज्या वीर्य व रक्तापासून जीव जन्माला येतो हे वीर्य व रक्त ही मलाचीच रूपे आहेत. त्यामुळे चांडाळ जसा त्याज्य ठरतो तसेच हे स्थूल शरीर त्याज्यच आहे.
थोडक्यात देहाचे ममत्व सोडून जीवाने मुक्त व्हावे, ब्रह्मरूप व्हावे असेच आचार्यांना सांगायचे आहे. देह तादात्म्य टाकून देता यायला हवे. ही अपवित्र घाणीची पुडी आपल्याला सतत बाळगावी लागते पण म्हणून त्याच्याशी तद्रूपता मात्र टाळता यायला हवी. तेव्हा या देहाविषयी पूर्णपणे अनासक्ती निर्माण होईल तेव्हाच ब्रह्मीभूत होणे शक्य आहे.
आपले शरीर, मन, बुद्धि यांची जाणीवच आपल्या दुःखात भर घालते. त्या सर्वांच्या अतीत आत्म्यावर मात्र अनंत परमसुख लाभाची अनुभूति येते, आणि एकदा ती अनुभूति आली कि सर्व धडपडी संपतात. परमसंतोष लाभतो.

www.madhaveeraghuveer.com

घटाकाशं महाकाशं इवात्मानं परात्मनि ।
विलाप्याखण्डभावेन तूष्णीं भव सदा मुने ॥

हे मुने घटाकाश जसे महाकाशात ऐक्यभावाने लीन होते त्याप्रमाणे परब्रह्मात आत्म्याचा लय करून मौन रहा.

अद्वैत वेदांतात घटाकाश आणि महाकाश हे शब्द नेहमीच येतात. घटाकाश म्हणजे घटाच्या आकाराने मर्यादित झालेली पोकळी! घटाच्या उपाधीमुळे, वास्तविक असणारे महदाकाश, मर्यादित झाल्यासारखे वाटते. घटाची उपाधि नाहीशी झाली की मर्यादा नष्ट होते आणि वेगळेपणाने घटाकाश रहात नाही. ते महदाकाशाशी एकरूप होऊन जाते.

तसेच जीवाने स्वतःला परब्रह्मात विलीन करावे त्या परब्रह्माशी एकाकार व्हावे आणि शांत, मौन व्हावे.

आणि खरोखरच ज्याला आत्मतत्वाचे ज्ञान होते तो व्यर्थ बडबडणारच नाही. आचार्यांची सूचकता लक्षणीय आहे. इथे तूष्णीं भव चा गर्भितार्थ आत्मतत्वाचा जाणकार हो असा आहे.

घटाकाश हे घटाने बाधित होते परंतु महदाकाशाला बाधा येऊच शकत नाही. ते अमर्याद आहे. वास्तविक पाहता घटाकाश हे भिन्न नाहीच. ते महदाकाशच आहे. घटाकाशाचे अस्तित्व हे केवळ भ्रांति आहे.

त्याचप्रमाणे जीव हा पार्थिव देहाशी तादात्म्य पावल्यामुळे स्वतःला वेगळे समजतो. वस्तुतः तो वेगळा नाहीच. सर्वत्र असणारे परिपूर्ण जाणीवतत्व हे अनंततत्व आहे. तेच जीवात आहे परंतु अज्ञानामुळे व्यापक जाणीवतत्वाला संकुचित रूप दिले जाते. परंतु तू मात्र ब्रह्मात्मैक्याची अनुभूति घेऊन स्वस्थ आणि शांत रहा.

October 2016

| Mon | Tue | Wed | Thu | Fri | Sat | Sun | Mon | Tue | Wed | Thu | Fri | Sat | Sun | Mon | Tue | Wed | Thu | Fri | Sat | Sun |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 | 7 | 8 | 9 | 10 | 11 | 12 | 13 | 14 | 15 | 16 |
| 17 | 18 | 19 | 20 | 21 | 22 | 23 | 24 | 25 | 26 | 27 | 28 | 29 | 30 | 31 | | | | | | |

६ जून २०१६

SUNDAY
SEP '16
11
255-111 WK-36

स्वप्रकाशमधिष्ठानं स्वयंभूय सदात्मना।
ब्रह्माण्डमपि पिण्डाण्डं त्यज्यतां मलभाण्डवत् ॥
॥२९०॥

स्वयंप्रकाशरूप, अधिष्ठानभूत असा ब्रह्माशी सदैव एकाकार होऊन पिंड व ब्रह्मांड या दोहोंना मलाने भरलेल्या भाड्याप्रमाणे टाकून द्यायला हवे.

स्थूल, सूक्ष्म व कारण देहाला ज्यामुळे चेतना मिळते, तो देह कार्यप्रवण होतो ते जाणिवतत्त्व या सर्वांचे अधिष्ठान आहे. हे अधिष्ठान स्वयंप्रकाशी आहे. त्याला दुसऱ्या कोणत्याही प्रकाशाची आवश्यकता नाही. ते अद्वैत आहे. ते सत्यतत्त्व आहे. त्याला जाणून घ्यायला हवे.

व्यष्टिरूप व्यक्तित्व पिंड या शब्दाने स्पष्ट होते तर समष्टिरूप विश्व ब्रह्मांड या शब्दाने "

त्या महान गर्भाशयात सजीव प्राणीमात्रांचे आणि निर्जीव वस्तुमात्रांचे अखिल विश्व वाढीला लागते त्याला ब्रह्मांड म्हणतात. तर व्यक्तीचा पार्थिव देह, त्याचे विकार भावना आणि विचार यांनी बनलेल्या व्यष्टीला पिंडांड म्हणतात.

परंतु या दोन्ही गोष्टी अशाश्वत आहे हे लक्षात घेऊन तू या दोन्हींच्या अतीत हो आणि परम सत्याची अनुभूती घे असा आचार्य आग्रह धरतात.

चिदात्मनि सदानन्दे देहारूढामहंधियम्।
निवेश्य लिङ्गमुत्सृज्य केवलो भव सर्वदा ॥२९१॥

देहाशी असलेला अहंभाव नित्यआनंद स्वरूप चिद्रूप आत्म्यात ठेवून लिंगशरीर टाकून सदैव अद्वितीय हो.

September 2016
Mon Tue Wed Thu Fri Sat Sun Mon Tue Wed Thu Fri Sat Sun Mon Tue Wed Thu Fri Sat Sun
1 2 3 4 5 6 7 8 9 10 11 12 13 14 15 16 17 18
19 20 21 22 23 24 25 26 27 28 29 30
Life is great; make the most out of it. Be an optimist.
11-09

www.madhaveeraghuveer.com

MONDAY
SEP '16
12
256-110 WK-37

कैवल्याच्या चांदण्याला भुकेला चकोर।

'केवल' हा सांख्यतत्त्वज्ञानातील शब्द आहे. तो अद्वैत तत्त्वज्ञानातील शब्द नाही. केवल म्हणजे मुक्त होणे. एकमेवाद्वितीय ब्रह्म आपणच आहोत हे समजणे. असे मुक्त होण्यासाठी देहावरील ममत्व सोडता यायला हवे. परन्तु हे देह तादात्म्य इतके भिनलेले आहे की देह म्हणजेच मी अशी आपली दृढ भावना असते. हे तादात्म्य पूर्णपणे आत्म्याकडे वळवले पाहिजे देहावरील अहंता ही चिन्मय आत्मतत्त्वस्वरूपाकडे वळवली पाहिजे.

देहतादात्म्याची जागा आत्मतादात्म्याने घ्यायला हवी. केवल - अनंतस्वरूप. जे देश-कालाने परिच्छिन्न होत नाही. दुसऱ्या कशानेही बाधित होत नाही असे केवल तू आहेस.

यत्रैष जगदाभासो दर्पणान्तः पुरं यथा।
तद्ब्रह्माहमिति ज्ञात्वा कृतकृत्यो भविष्यसि ॥२६२॥

जिथे जगाचा भास आरशात प्रतिबिंबित झालेल्या नगरासारखा प्रतीत होतो आहे, ते ब्रह्म मी आहे असे जाणून कृतार्थ होशील.

October 2016

| Mon | Tue | Wed | Thu | Fri | Sat | Sun | Mon | Tue | Wed | Thu | Fri | Sat | Sun | Mon | Tue | Wed | Thu | Fri | Sat | Sun |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 | 7 | 8 | 9 | 10 | 11 | 12 | 13 | 14 | 15 | 16 |
| 17 | 18 | 19 | 20 | 21 | 22 | 23 | 24 | 25 | 26 | 27 | 28 | 29 | 30 | 31 | | | | | | |



www.madhavaeraghuveer.com

सत्याभूतं निजरूपमाद्यं चिदद्वयानन्दमरूपमक्रियम्।
तदेत्य मिथ्यावपुरुत्सृजेत शैलूषवद्वेषमुपात्तमात्मनः॥
॥२८३॥

जे सत्य, चिद्घन, अद्वितीय, आनंदरूप, निष्क्रिय असे स्वतःचे मूळ रूप आहे ते प्राप्त करून नटाने धारण केलेल्या मिथ्या वेषाप्रमाणे आत्म्याचा हा जो मिथ्या देह आहे तो टाकून दे.

एकदा ब्रह्मज्ञान झाले, खरे चिदानंदस्वरूप समजले की स्थूलदेहाचा मुमुक्षुने लवकरात लवकर त्याग करावा. नट जसा नाटकापुरता खोटा वेष धारण करतो. (कधी राजा कधी भिकारी) पण नाटक संपले की तो कुटुंबवत्सल पिता किंवा प्रेमळ पती होऊन जातो. तसेच आपले खरे / मूळ स्वरूप समजल्यावर देहत्याग करावा असे आचार्य सांगतात. परंतु यावर एक शंका अशी येते की प्रारब्ध संपेपर्यंत देह टाकता येत नाही. मग कसे करायचे? तर याचे उत्तर असे आहे की—
नट जसा नाटकातील वेष टाकून देऊन मूळ वेषात येतो तसे देह प्रत्यक्ष टाकायचा नाही तर देहावरची आसक्ती, ममत्व टाकून द्यायचे. कोणत्याही वस्तूवरील अहंता गेली म्हणजे त्या वस्तूला त्यागले असाच अर्थ होतो. त्या अर्थाने आचार्य देहाचा त्याग करायला सांगत आहेत.

स्टेजवर येण्यापूर्वी तो ज्या मूळ स्वरूपात होता तोच स्टेजवरील नटाचा पोशाख उतरवल्यावरही तोच असतो. त्याचप्रमाणे तू खरे तर आत्मतत्त्व आत्मा आहेस पण या देहाच्या पोशाखामुळे त्याच्याशी एकरूप झाला आहेस. स्वतःचे सत्य स्वरूप विसरला आहेस. ह्या साधनेत हा पोशाख उतरवायचा आहे आणि शुद्ध आत्मतत्त्वाची अनुभूती घ्यायची आहे.

www.madhaveeraghuveer.com

September 2016

| Mon | Tue | Wed | Thu | Fri | Sat | Sun | Mon | Tue | Wed | Thu | Fri | Sat | Sun | Mon | Tue | Wed | Thu | Fri | Sat | Sun |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 | 7 | 8 | 9 | 10 | 11 | 12 | 13 | 14 | 15 | 16 | 17 | 18 |
| 19 | 20 | 21 | 22 | 23 | 24 | 25 | 26 | 27 | 28 | 29 | 30 | | | | | | | | | |

सर्वात्मना दृश्यमिदं मृषैव
नैवाहमर्थः क्षणिकत्वदर्शनात्।
जानाम्यहं सर्वमिति प्रतीतिः
कुतोऽहमादेः क्षणिकस्य सिध्येत्॥२६४॥

अहंपदार्थस्त्वहमादिसाक्षी
नित्यं सुषुप्तावपि भावदर्शनात्।
ब्रूते ह्यजो नित्य इति श्रुतिः स्वयं
तत्प्रत्यगात्मा सदसद्विलक्षणः॥२६५॥

विकारिणां सर्वविकारवेत्ता
नित्योऽविकारो भवितुं समर्हति।
मनोरथस्वप्नसुषुप्तिषु स्फुटं
पुनः पुनर्दृष्टमसत्त्वमेतयोः॥२६६॥

हे दृश्यविश्व पूर्णपणे मिथ्याच आहे. त्याची क्षणभंगुरता दिसल्याने तो 'अहं' पदाचा अर्थ नाही. 'मी सर्व जाणतो' हा अनुभव या क्षणिक अहंभावाना कसा येईल?

अहंकारादि साक्षी असा अहं पदाचा अर्थ आहे. सुषुप्तीत देखील नित्य त्याचे अस्तित्व असते म्हणून श्रुती स्वतःच म्हणते — हा अज आहे, नित्य आहे. त्यामुळे प्रत्यगात्मा सदसद् विलक्षण आहे.

विकारी वस्तुंच्या सर्व विकारांना जाणणारा हा आत्मा नित्य अविकारी राहण्यास समर्थ आहे. मनोरथ, स्वप्न व सुषुप्ती या अवस्थांमध्ये या दोघांचा अभाव दिसतो.

'मी सर्व जाणतो' हा अनुभव कुणाला येतो? क्षणभंगुर अहंकाराला हा अनुभव येणे अशक्य आहे. मात्र इथे मी (अहं) या पदाने चिद्रूप, निर्विकार असा साक्षी आत्माच सूचित केला आहे, कारण अगदी सुषुप्ति अवस्थेतही हा असतोच. य स्वप्न जागर सुषुप्तिषु अवैति नित्यम्। असे त्याचे रूप आहे. मी गाढ झोपलो होतो हा अनुभव येतो तो त्याच्यामुळेच!

October 2016

| Mon | Tue | Wed | Thu | Fri | Sat | Sun | Mon | Tue | Wed | Thu | Fri | Sat | Sun | Mon | Tue | Wed | Thu | Fri | Sat | Sun |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 | 7 | 8 | 9 | 10 | 11 | 12 | 13 | 14 | 15 | 16 |
| 17 | 18 | 19 | 20 | 21 | 22 | 23 | 24 | 25 | 26 | 27 | 28 | 29 | 30 | 31 | | | | | | |



www.madhavbhuveer.com

अतोऽभिमानं त्यज मांसपिण्डे
पिण्डाभिमानिन्यपि बुद्धिकल्पिते ।
कालत्रयाबाध्यमखण्डबोधं
ज्ञात्वा स्वमात्मानुपैहि शान्तिम् ॥२९७॥
त्यजाभिमानं कुलगोत्रनाम
रूपाश्रमेष्वार्द्रशवाश्रितेषु ।
लिङ्गस्य धर्मानपि कर्तृतादींस्
त्यक्त्वा भवाखण्डसुखस्वरूपः ॥२९८॥

म्हणून या बुद्धिकल्पित स्थूलदेहावरील व स्थूलदेहाच्या अभिमान बाळगणाऱ्या सूक्ष्मशरीरावरील अभिमान सोड. आणि त्रिकालाबाधित, अखंड, ज्ञानरूप अशा स्वतःच्या आत्मस्वरूपाला जाणून शांती प्राप्त कर.

ओलसर प्रेताच्या आश्रयाने राहिलेल्या कुल, गोत्र, नाम, रूप, आश्रम इ० वरील अभिमान सोड आणि सूक्ष्म शरीराचे कर्तृत्व इ० धर्म टाकून अखंड आनंदरूप हो.

स्थूल शरीर व सूक्ष्म शरीर ही दोन्हीही शरीरे बुद्धीने कल्पिलेली आहेत. खरी नाहीत. त्यावरील अहंता सोडून देण्याची सूचना आचार्य करत आहेत.

स्थूलदेहाला आचार्य आर्द्रशवाची उपमा देतात. ज्ञानी माणसाच्या दृष्टीने स्थूल शरीर हे प्रेतासारखेच असते. कुल, गोत्र, नाम, रूप, वर्ण, आश्रम या सगळ्या कल्पना स्थूल देहाशी निगडित असतात. स्थूल देहच जर नगण्य तर मग त्याच्या नाम रूपादिंचा अभिमान कशासाठी? 'आर्द्रशव' या शब्दातून देहाची तुच्छता सुचवायची आहे.

त्याचप्रमाणे सूक्ष्म शरीराचे कर्तृत्व आदि धर्मांचा त्याग करावा. म्हणजेच कर्तृत्वाचा अहंकार त्यागायचा. असा अहंकाराचा त्याग केला की आत्मस्वरूपाचे ज्ञान सुलभ होते.



www.madhaveeraghuveer.com

८ जून २०१८



सन्ति अन्ये प्रतिबन्धाः पुंसां संसारहेतवो दृष्टाः ।
तेषामेषां मूलं प्रथमविकारो भवत्यहंकारः ॥ २९९ ॥
यावत्स्यात् स्वस्य सम्बन्धोऽहंकारेण दुरात्मना ।
तावन्न लेशमात्रापि मुक्तिवार्ता विलक्षणा ॥ ३०० ॥
अहंकारग्रहान्मुक्तः स्वरूपमुपपद्यते ।
चन्द्रवत् विमलः पूर्णः सदानन्दः स्वयंप्रभः ॥ ३०१ ॥
यो वा पुरैषोऽहमिति प्रतीतो
बुद्ध्या विक्लृप्तस्तमसातिमूढया ।
तस्यैव निःशेषतया विनाशे
ब्रह्मात्मभावः प्रतिबन्धशून्यः ॥ ३०२ ॥

पुरुषाच्या संसाराच्या कारणांमध्ये इतर अनेक प्रतिबंध आहेत पण त्या सर्वांचे मूळ प्रथमविकार अहंकारच आहे. — २९९

जोपर्यंत त्या दुरात्म्या अहंकाराशी आपला संबंध आहे तोपर्यंत विलक्षण अशा मुक्तीचा विचार किंचितही होऊच शकत नाही. — ३००

अहंकाररूपी राहूपासून मुक्त झालेला आत्मा चंद्रासारखा विमल, पूर्ण, सदैव आनंदरूप व स्वयंप्रकाशरूप होऊन स्वस्वरूपप्राप्त होतो. — ३०१

अज्ञानामुळे नष्ट झालेल्या बुद्धीमुळे 'या देहात जो तोच मी आहे' असा भास होत असेल तर त्याचा निःशेष नाश झाल्यावरच ब्रह्माशी निर्बंध आत्मबुद्धी निर्माण होते.

विज्ञानाख्यमहासिना द्युतिमता विच्छिद्य शीर्षत्रयं
निर्मूल्याहिमिमं निधिं सुखकरं धीरोऽनुभोक्तुं क्षमः ॥
यावद्वा यत्किंचिद्विषदोषस्फूर्तिरस्ति चेद्देहे ।
कथमारोग्याय भवेत्तद्वदहंतापि योगिनो मुक्त्यै ॥ ३०३ ॥

October 2016

| Mon | Tue | Wed | Thu | Fri | Sat | Sun | Mon | Tue | Wed | Thu | Fri | Sat | Sun | Mon | Tue | Wed | Thu | Fri | Sat | Sun |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 | 7 | 8 | 9 | 10 | 11 | 12 | 13 | 14 | 15 | 16 |
| 17 | 18 | 19 | 20 | 21 | 22 | 23 | 24 | 25 | 26 | 27 | 28 | 29 | 30 | 31 | | | | | | |



www.nadhaveeraghuveer.com

ब्रह्मानंदरूपी ठेवा महाबलशाली व भयंकर अशा अहंकाररूपी सर्पाने आपल्या त्रिविध गुणांनी युक्त अशा तीन प्रचंड फणांनी वेढा घालून आपल्यामध्ये लपवून ठेवला आहे. ज्ञानरूपी महातेजस्वी खड्गाने तिन्ही मस्तके (फणा) छेदून या सर्पाचा समूळ नाश करून हा सुखद ठेवा उपभोगण्यास विवेकी माणूस समर्थ असतो. — 303

जोपर्यंत विषाचा किंचितही दोष शरीरात असेल तोपर्यंत आरोग्यप्राप्ती कशी होईल? त्याप्रमाणेच योग्याकडे सुद्धा जोपर्यंत अहंता असेल तोपर्यंत मुक्ती कशी?

अहमोऽत्यन्तनिवृत्त्या तत्कृतनानाविकल्पसंहृत्या ।
प्रत्यक्तत्त्वविवेकादयमहमस्मीति विन्दते तत्त्वम् ॥305॥

अहंकर्तर्यस्मिन् अहमिति मतिं मुञ्च सहसा
विकारात्मन्यात्मप्रतिफलजुषि स्वस्थितिमुषि ।
यदध्यासात्प्राप्ता जनिमृतिजरा दुःखबहुला:
प्रतीचश्चिन्मूर्तेस्तव सुखतनो: संसृतिरियम् ॥306॥

अहंकाराचा समूळ नाश झाल्यामुळे, त्याच्यापासून निर्माण होणारे विविध विकल्प नाहीसे झाल्यामुळे आणि आत्मतत्त्व वेगळे आहे हे कळल्यामुळे 'हा मी आहे' असे ब्रह्मतत्त्वाचे ज्ञान होते. — 305

चैतन्याच्या प्रतिबिंबाने युक्त, कर्ता, विकाररूपी व स्वरूपाला झाकून टाकणाऱ्या या अहंकाराठायी असलेली आत्मबुद्धी सोड. याच्याच अध्यासामुळे सच्चिदानंदस्वरूप अशा आत्म्याचे साक्षात रूप असलेल्या तुला जन्म, मृत्यू, वार्धक्य इ० बहुविध दुःखाने युक्त असे संसरण प्राप्त झाले आहे. — 306



Economics is extremely useful as a form of employment for economists.

९ जून २०१७



सदैकरूपस्य चिदात्मनो विभो-
रानन्दमूर्तेरनवद्यकीर्तेः।
नैवान्यथा क्वाप्यविकारिणस्ते
विनाहमध्यासममुष्य संसृतिः॥३०६॥

तस्मादहंकारमिमं स्वशत्रुं
भोक्तुर्गले कण्टकवत्प्रतीतम्।
विच्छिद्य विज्ञानमहासिना स्फुटं
भुङ्क्ष्वात्मसाम्राज्यसुखं यथेष्टम्॥३०८॥

ततोऽहमादेः विनिवर्त्य वृत्तिं
संत्यक्तरागः परमार्थलाभात्।
तूष्णीं समास्स्वात्मसुखानुभूत्या
पूर्णात्मना ब्रह्मणि निर्विकल्पः॥३०९॥

सदैव एकच रूप असलेल्या चिन्मय, विभु, आनंदरूप, आणि निर्दोष कीर्ति असणाऱ्या, अविकारी अशा तुला या अहंकाररूपी अध्यासाशिवाय इतर कशानेही संसरण प्राप्त होत नाही. —— ३०६

म्हणून खाणाऱ्याच्या गळ्यात अडकणाऱ्या काट्यासारख्या स्वतःच्या या अहंकाररूपी शत्रूला विज्ञानरूपी तीक्ष्ण खड्गाने योग्य प्रकारे निखंडून आत्मसाम्राज्याचे सुख यथेच्छ उपभोग. —— ३०८

तेव्हा अहंकार इ० च्या विकारांना दूर करून परमार्थलाभाने आसक्तीरहित होऊन आत्मसुखाच्या अनुभूतिने पूर्णपणे ब्रह्मात स्थित राहून तू निर्विकल्प व मौन हो. —— ३०९.

समूलकृत्तोऽपि महानहं पुनः
व्युल्लेखितः स्यात यदि चेतसा क्षणम्।
संजीव्य विक्षेपशतं करोति
नभस्वता प्रावृषि वारिदो यथा॥३१०॥



www.madhaveeraghuveer.com

निगृह्य शत्रोः अहमोऽवकाशः
क्वचित न देयो विषयानुचिंतया।
स एव संजीवनहेतुरस्य
प्रक्षीणजम्बीरतरोः इव अम्बुः॥३११॥

समूळ नष्ट केला असला तरी हा सामर्थ्यशाली अहंकार जरी क्षणभरच मनाच्या संपर्कात आला तरी ज्याप्रमाणे पावसाळ्यात मेघ वाऱ्याच्या संयोगाने सामर्थ्यशाली होऊन शेकडो संकटे निर्माण करू शकतो, त्याप्रमाणे पुन्हा एकदा जीवदान मिळून शेकडो संकटे/विकल्प निर्माण करू शकतो. — ३१०

अहंकाररूपी शत्रूचा बीमोड करून विषयांच्या चिंतनाने त्याला (पुन्हा निर्माण होण्यास) अवसर देऊ नये. नष्ट होणाऱ्या महाळुंगाच्या वा ईडलिंबाच्या वृक्षाला जसे पाणी तसेच विषयांचे चिंतन हे याच्या पुनरुज्जीवनाचे कारण आहे. —— ३११

जन्म मरणाचे चक्र जे मागे लागते त्याचे मूळ कारण आहे अहंकार! मुळात 'मी-माझे' हा भाव निर्माण झाला की 'तू-तुझे' 'आपले-परके' हा भाव निर्माण होतो. अहंकार हा प्रकृतीचा '<u>प्रथमविकार</u>' आहे. तो जीवाला दुःख देणारा म्हणून दुरात्मा आहे.

☆ जोवर अहंकाराशी संबंध आहे तोवर मुक्ती अशक्य आहे. अहंकाराचा विलय म्हणजेच मुक्ती! जीवाची एकदा अहंभावातून सुटका झाली तरच तो ब्रह्मरूप होतो.

या अहंकाराला अनेक उपमा दिल्या आहेत. हा अहंकार राहूसारख्या दुष्टग्रहाप्रमाणे आहे. राहूपासून मुक्त झालेला व आपल्या पूर्णिमेच्या तेजाने झळाळून दिसणारा चंद्र म्हणजे आत्मा! जोवर त्याला अहंकाराने ग्रासले आहे तोवर तो आत्मतेजाने झळकत नाही.

September 2016

| Mon | Tue | Wed | Thu | Fri | Sat | Sun | Mon | Tue | Wed | Thu | Fri | Sat | Sun | Mon | Tue | Wed | Thu | Fri | Sat | Sun |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 | 7 | 8 | 9 | 10 | 11 | 12 | 13 | 14 | 15 | 16 | 17 | 18 |
| 19 | 20 | 21 | 22 | 23 | 24 | 25 | 26 | 27 | 28 | 29 | 30 | | | | | | | | | |

स्वरूपी उदेला अहंकार राहो॥१७३॥

ब्रह्मानंद हा अमूल्य असा ठेवा आहे.
या गुप्तधनाचे रक्षण अहंकाररूपी सामर्थ्यशाली
पण भयंकर असा सर्प करतो. त्रिविध
गुणांच्या फण्यांनी या निधिला वेढा घालतो.
परंतु ज्ञानरूपी तीक्ष्ण शस्त्राने त्या सर्पाची
तिन्ही मस्तके छेदून, त्यांचा समूळ नाश केल्यावरच
त्या ठेव्याचा उपभोग घेता येतो, असे सामर्थ्य
विवेकी माणसाकडे असते.

तसेच ब्रह्मज्ञान हे गूढ, रहस्यात्मक ज्ञान मानले
जाते त्यामुळे त्याला गुप्त निधि म्हटले आहे ते
उचितच आहे. प्रकृति ही (सत्व, रज, तम) त्रिगुणात्मक
असते आणि तिच्यापासून बनलेला अहंकार सुद्धा तीन
गुणांनी म्हणजे फण्यांनी युक्त असतो. आणि या
फणाधारी नागाला छेदण्यासाठी ज्ञानाला खड्गाची
उपमा दिली आहे. सत् व असत् यामधील फरक
जाणणे हे विवेकज्ञान आहे.

यानंतरच्या (308) मंत्रात अहंकाराची तुलना विषाशी
केली आहे. विषाचा अगदी किंचितसा अंश जर शरीरात
राहिला तर माणूस पूर्णपणे निरोगी होत नाही तसाच
योग्याकडे थोडा जरी अहंकार शिल्लक असेल तर
त्याला मुक्ती मिळत नाही. अहंकार हा विषाइतकाच
दाहक असतो. विषाचा राहिलेला थोडासा दोष जसा
मांत्रिक नाहीसा करतो तसा " " अहंकार
गुरुकृपेने नाहीसा होतो. नाथमहाराजांचे विंचवाचे रूपक —

किंचित राहिली फुणफुण। शांत केली जनार्दने।

एकदा का या अहंकाराचा नाश झाला की
साऱ्या सृष्टीच्या पसाऱ्याचा सुद्धा त्याच्यापुरता नाश
होतो. मी त्या नाशवंत विश्वाहून वेगळा आहे याची
स्पष्ट जाणीव होते. परमात्मतत्त्व म्हणजेच मी आहे
असे ज्ञान होते.

October 2016

| Mon | Tue | Wed | Thu | Fri | Sat | Sun | Mon | Tue | Wed | Thu | Fri | Sat | Sun | Mon | Tue | Wed | Thu | Fri | Sat | Sun |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 | 7 | 8 | 9 | 10 | 11 | 12 | 13 | 14 | 15 | 16 |
| 17 | 18 | 19 | 20 | 21 | 22 | 23 | 24 | 25 | 26 | 27 | 28 | 29 | 30 | 31 | | | | | | |

निर्दोष अमर्याद अशा ब्रह्मतत्त्वाला केवळ
अहंकारामुळे मर्यादा पडल्याने दोष लागतो.
म्हणून अहंकारासारखा शत्रू नाही. असे
आचार्य म्हणतात. परंतु शत्रू जोवर बाहेर
आहे तोवर त्याचा बंदोबस्त करणे शक्य होते. पण
इथे, पुढे जाऊन त्या अहंकाराला खाणाऱ्याच्या घशात
अडकणाऱ्या काट्याची उपमा देतात. हा अहंकाररूपी
काटा विवेकरूपी खड्गाने काढून टाकला की मग
आत्मसाम्राज्याचे सुख अनुभवता येते [यथेष्ट]

अहंकार अगदी समूळ नष्ट केल्यानंतर पुन्हा
चुकून जर त्याचा एखादा अंश मनात शिरला तर तो
उत्पात घडवू शकतो. पावसाळ्यात सोसाट्याच्या
वाऱ्याबरोबर वाहणारा वेगवान मेघ जसा घरांची
मोडतोड, पडझड करून टाकतो तसा अहंकार अगदी
होत्याचे नव्हते करून टाकतो.

स्वरूप अहंकाराला एकदा समूळ नष्ट केले तरी
विषय चिंतनाने त्याला पुन्हा डोके वर काढू देता कामा
नये हे पटवण्यासाठी अंजीरवृक्षाचा दृष्टांत देतात.

ईडलिंबाचा किंवा महाळुंगाचा वृक्ष सुकलेला,
पूर्ण नष्ट होण्याच्या मार्गावर असताना जर पाणी
मिळाले तर त्याला संजीवनी मिळते. तसेच
विषयांचे चिंतन हे अहंकाराला संजीवनी देणारे ठरते

एखादी गोष्ट पुन्हापुन्हा पाहिली की ती हवीशी
वाटू लागते. तिच्या संगे जडतो, त्यातून आसक्ती
वाढते. ती आपलीच असावी, दुसऱ्याला मिळू नये
अशी भावना प्रबळ होते आणि त्यामुळे आजपर्यंत
मिळवलेले जपलेले वैराग्य नाहीसे होते आणि
माणसाची घसरगुंडी सुरू होते.

ध्यायतो विषयान्पुंसः - - - -

September 2016

| Mon | Tue | Wed | Thu | Fri | Sat | Sun | Mon | Tue | Wed | Thu | Fri | Sat | Sun | Mon | Tue | Wed | Thu | Fri | Sat | Sun |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 | 7 | 8 | 9 | 10 | 11 | 12 | 13 | 14 | 15 | 16 | 17 | 18 |
| 19 | 20 | 21 | 22 | 23 | 24 | 25 | 26 | 27 | 28 | 29 | 30 | | | | | | | | | |

स्वरूपी उदेला अहंकार राहो
तेणे सर्व आच्छादिले व्योम पाहो।
दिशा पाहता ते निशा वाढताहे
विवेके विचारे विवंचूनि पाहे॥१८३॥

अहंकाररूपी राहू मूळ परमात्मस्वरूपात उदय पावला. आकाशवत असणारे मूळ स्वरूप त्याने झाकून टाकले. त्यामुळे जिकडे तिकडे अज्ञानरूपी अंधार पसरला. आत्मानात्मविचाराने या गोष्टीचे विवरण करावे.

देहात्मना संस्थित एव कामी
विलक्षणः कामयिता कथं स्यात्।
अतोऽर्थसन्धानपरत्वमेव
भेदप्रसक्त्या भवबन्धहेतुः॥३१२॥

देहालाच आत्मा मानून राहणारा विषयलोलुप असतो. पण त्याहून वेगळा असणारा विषयलोलुप कसा होईल? म्हणून विषयांकडे पाहण्याची प्रवृत्ती हीच भेदाची वाट करत असल्यामुळे जन्म-मरण बंधाचे कारण आहे.

विषयांच्या चिंतनातून विषयाभिलाषा निर्माण होते. जो देहाला मी मानत असतो त्याच्या बाबतीत हे संभव आहे. पण जो देहबुद्धीच्या पलीकडे गेला आहे त्याला ही अभिलाषा नाही, त्यामुळे स्वार्थी कर्मे नाहीत आणि त्यामुळे अर्थातच जन्म-मृत्यूचे चक्र नाही.

कार्यप्रवर्धनाद्बीजप्रवृद्धिः परिदृश्यते।
कार्यनाशाद्बीजनाशस्तस्मात् कार्यं निरोधयेत्॥

कार्य वाढले की बीजाची वाढ झालेली दिसते व कार्यनाश झाला की बीजनाश होतो म्हणून कार्याचाच नाश करायला हवा.

October 2016

| Mon | Tue | Wed | Thu | Fri | Sat | Sun | Mon | Tue | Wed | Thu | Fri | Sat | Sun | Mon | Tue | Wed | Thu | Fri | Sat | Sun |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 | 7 | 8 | 9 | 10 | 11 | 12 | 13 | 14 | 15 | 16 |
| 17 | 18 | 19 | 20 | 21 | 22 | 23 | 24 | 25 | 26 | 27 | 28 | 29 | 30 | 31 | | | | | | |

हा श्लोक एखाद्या नियमासारखा आहे. कार्य थांबवायचे, म्हणजे मनात उठणारे संकल्पविकल्प थांबवायचे. कार्य वाढले की बीजाची वृद्धी कशी होते याचे एक नेहमीचे उदाहरण पाहू या. माणूस चिडायला लागला की त्याला चिडवणारे वाढत जातात. पण जर खूप चिडूनसुद्धा माणूस चिडलाच नाही, तर आपोआप चिडवणे कमी होते. व नंतर पूर्ण थांबते. तसेच विषय हवासा वाटला म्हणून कार्य करत गेले तर विषयातील गोडी वाढत जाते. म्हणून कार्य (संयमाने) थांबवावे.
या दोन्ही गोष्टी परस्परांवर अवलंबून आहेत.

वासनावृध्दितः कार्यं कार्यवृध्द्या च वासना।
वर्धते सर्वथा पुंसः संसारो न निवर्तते॥३१४॥

वासना वाढल्यामुळे कार्य वाढते, व कार्य वाढल्यामुळे वासना वाढतात. त्यातून पुरुषाचे संसरण अजिबात थांबत नाही.
कर्माचा वाढता पसारा वासनांना खतपाणी घालतो. एखादी वस्तू हवीशी वाटली, ती मिळाली की त्यापेक्षा अधिक चांगली वस्तू मिळवावीशी वाटते.
लंगोटी – उंदीर – मांजर – गाय – दूध – शेत – बायको

संसारबन्धविच्छित्त्यै तद्द्वयं प्रदहेत् यतिः।
वासनावृध्दिरेताभ्यां चिन्तया क्रियया बहिः॥३१५॥

मुनीने संसारबंध तोडण्यासाठी त्या दोन्ही गोष्टी जाळायला हव्यात. विषयांचे चिंतन व बाह्यक्रिया या दोहोंनीच वासना वाढते.
वासनावृध्दीच्या मुळावरच घाव घालावा.

ताभ्यां प्रवर्धमाना सा सूते संसृतिमात्मनः।
त्रयाणां च क्षयोपायः सर्वावस्थासु सर्वदा॥३१६॥
सर्वत्र सर्वतः सर्वं ब्रह्ममात्रावलोकनम्।
सद्भाववासनादार्ढ्यात् तत् त्रयं लयमश्नुते॥३१७॥

त्या दोहोंमुळे वाढलेली ती वासना आत्म्याला (जीवाला) संसरण निर्माण करते. आणि (म्हणून) सर्व अवस्थांमध्ये सदैव या तिन्हींच्या नाशाचा उपाय केला पाहिजे. सर्वत्र, सर्व बाजूंनी सगळीकडे केवळ ब्रह्म आणि ब्रह्मच पाहिले पाहिजे. सत्स्वरूप होण्याची इच्छा दृढ करण्यानेच त्या तिन्हींचा लय होतो.

सर्वत्र केवळ व केवळ ब्रह्मच आहे, एकमेवाद्वितीय ब्रह्मच आहे असे कळले की द्वैत रहात नाही. आणि वासनेचा आधार द्वैतच असल्यामुळे द्वैत सरले की वासना निराधार होते. वासना नाहीशी झाली की कार्य उरत नाही. सर्वं खल्विदं ब्रह्म अशी अनुभूति आली. ब्रह्मरूप होण्याची उत्कट इच्छा झाली की इतर इच्छा क्षीण होतात. सोन्याचे पुष्कळ दागिने मिळाले की खोटे दागिने घालण्याची इच्छा होत नाही.

क्रियानाशे भवेच्चिन्तानाशोऽस्मात् वासनाक्षयः।
वासनाप्रक्षयो मोक्षः स जीवन्मुक्तिरिष्यते॥३१८॥

क्रिया नाहीशा झाल्या की चिंतानाश होतो, आणि त्यामुळे वासनानाश होतो. वासनानाश हाच मोक्ष आहे. त्यालाच जीवन्मुक्ती म्हणतात.

योगवासिष्ठात देखील वासनाक्षय किंवा मनोनाश म्हणजेच मोक्ष अशी कल्पना मांडली आहे. (कदा ब्रह्मतत्त्वाचे ज्ञान झाले की जीव सांसारिक गोष्टींतून अलिप्त होतो - विषयवासनांतून बाहेर पडतो. परंतु तरीही

October 2016

| Mon | Tue | Wed | Thu | Fri | Sat | Sun | Mon | Tue | Wed | Thu | Fri | Sat | Sun | Mon | Tue | Wed | Thu | Fri | Sat | Sun |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 | 7 | 8 | 9 | 10 | 11 | 12 | 13 | 14 | 15 | 16 |
| 17 | 18 | 19 | 20 | 21 | 22 | 23 | 24 | 25 | 26 | 27 | 28 | 29 | 30 | 31 | | | | | | |

प्रारब्धकर्म संपेपर्यंत त्याचा देह पडत नाही
तो टिकतोच. त्याप्रमाणे देहाचे व्यापार,
व्यवहार चालूच राहतात. अशावेळी त्याला
जीवन्मुक्त म्हटले जाते. विदेहमुक्ती ही
त्याच्या पुढची पायरी आहे.
जीवन्मुक्त म्हणजे जीवनातून मुक्त नव्हे तर
जीवन जगत असताना मुक्तीचा अनुभव घेणे.

सद्वासनास्फूर्तिविजृम्भणे सति
ह्यसौ विलीना त्वहमादिवासना।
अतिप्रकृष्टाप्यरुणप्रभायां
विलीयते साधु यथा तमिस्रा॥३१९॥
तमस्तमःकार्यमनर्थजालं
न दृश्यते सत्युदिते दिनेशे।
तथाऽद्वयानन्दरसानुभूतौ
नैवास्ति बन्धो न च दुःखगन्धः॥३२०॥

सद्वासनांच्या स्फूर्तीचा विस्तार झाला असता
ही अहंकारादी वासना लय पावते. जशी अरुणप्रभा
फाकल्यावर अंधार नाहीसा होतो तसेच हेही घडते.
सूर्य उगवला की अंधाराचे कार्य असणारे अनर्थांचे
जाळे जसे दिसत नाही तसा अद्वितीय आनंदरसाचा
अनुभव घेतला की बंध किंवा दुःखाचा गंध राहत नाही.

दृश्यं प्रतीतं प्रविलापयन्स्वयं
सन्मात्रमानन्दघनं विभावयन्।
समाहितः सन्बहिरन्तरं वा
कालं नयेथाः सति कर्मबन्धे॥३२१॥

कर्मबंधनात असताना प्रतीत होणाऱ्या दृश्यविश्वाचा
स्वतःच्या लय करून अंतर्बाह्य सावध राहून, सद्रूप
आनंदघन स्वरूपाचे चिंतन करीत काळ घालवावा.

September 2016

| Mon | Tue | Wed | Thu | Fri | Sat | Sun | Mon | Tue | Wed | Thu | Fri | Sat | Sun | Mon | Tue | Wed | Thu | Fri | Sat | Sun |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 | 7 | 8 | 9 | 10 | 11 | 12 | 13 | 14 | 15 | 16 | 17 | 18 |
| 19 | 20 | 21 | 22 | 23 | 24 | 25 | 26 | 27 | 28 | 29 | 30 | | | | | | | | | |



Kites rise highest against the wind, not with it.

(२९) प्रमादाचा त्याग
३२३ ते ३४९



प्रमादो ब्रह्मनिष्ठायां न कर्तव्यः कदाचन।
प्रमादो मृत्युरित्याह भगवान्ब्रह्मणः सुतः॥३२२॥
न प्रमादादनर्थोऽन्यो ज्ञानिनः स्वस्वरूपतः।
ततो मोहस्ततोऽहंधीस्ततो बन्धस्ततो व्यथा॥३२३॥

ब्रह्मनिष्ठेत कधीही प्रमाद करू नये. प्रमाद हाच मृत्यु असतो असे भगवान ब्रह्मदेवाच्या पुत्रांनी सांगितले आहे.
स्वस्वरूपानुसंधानात प्रमाद करण्यासारखा ज्ञानी माणसांच्या बाबतीत दुसरा अनर्थ नाही. त्यातून (त्या प्रमादातून) अज्ञान, त्यातून अहंभाव, त्यातून बंध व त्यातून दुःख निर्माण होते.

विषयाभिमुखं दृष्ट्वा विद्वांसमपि विस्मृतिः।
विक्षेपयति धीदोषैर्योषा जारमिव प्रियम्॥३२४॥
यथा प्रकृष्टं शैवालं क्षणमात्रं न तिष्ठति।
आवृणोति तथा माया प्राज्ञं वापि पराङ्मुखम्॥३२५॥
लक्ष्यच्युतं चेद्यदि चित्तमीषद्
बहिर्मुखं सन्निपतेत्ततस्ततः।
प्रमादतः प्रच्युतकेलिकन्दुकः
सोपानपङ्क्तौ पतितो यथा तथा॥३२६॥

ज्याप्रमाणे स्त्री आपल्या प्रेमिक जाराला अस्वस्थ करते, त्याप्रमाणे विद्वान विषयाभिमुख झालेला पाहून बुद्धीच्या दोषांनी आत्मविस्मृती त्याला त्रस्त करते.
ज्याप्रमाणे शेवाळे बाजूला केले तरी क्षणभरही ते तसे राहत नाही त्याप्रमाणे आत्मविमुख झालेल्या विद्वानालाही देखील माया मोहून टाकते.
अनवधानाने खेळातील चेंडू हातून निसटून पायावर पडला तर तो जसा खाली खालीच जातो तसे जर मन किंचितही लक्ष्यावरून ढळले वा बहिर्मुख झाले तर ते खालीच जाते.

October 2016

| Mon | Tue | Wed | Thu | Fri | Sat | Sun | Mon | Tue | Wed | Thu | Fri | Sat | Sun | Mon | Tue | Wed | Thu | Fri | Sat | Sun |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 | 7 | 8 | 9 | 10 | 11 | 12 | 13 | 14 | 15 | 16 |
| 17 | 18 | 19 | 20 | 21 | 22 | 23 | 24 | 25 | 26 | 27 | 28 | 29 | 30 | 31 | | | | | | |

It only takes an ounce of courage to remove a ton of distress.

विषयेषु अवविशन् चेतः संकल्पयति तद्गुणान्।
सम्यक् संकल्पनात् कामः कामात्पुंसः प्रवर्तनम्॥
ततः स्वरूपविभ्रंशो विभ्रष्टस्तु पतति अधः।
पतितस्य विना नाशं पुनर्नारोह ईक्ष्यते।
संकल्पं वर्जयेत् तस्मात् सर्वानर्थस्य कारणम्॥
अतः प्रमादात् न परोऽस्ति मृत्युः
विवेकिनो ब्रह्मविदः समाधौ।
समाहितः सिद्धिमुपैति सम्यक्
समाहितात्मा भव सावधानः॥३२९॥

विषयात मन प्रवेश करते, त्याच्या गुणांचा विचार करते. त्या विचारातून वासना निर्माण होते व वासनेतून माणसाची प्रवृत्ती होते.
नंतर स्वरूपाविषयीच्या भ्रमामुळे भ्रष्ट झालेला अधःपतित होतो आणि अशा पतिताच्या नाशाशिवाय त्याची पुन्हा प्रगती संभवत नाही.
म्हणून सर्व अनर्थांचे कारण असणारा संकल्प टाळावा.
म्हणून विवेकी ब्रह्मज्ञानी माणसाला समाधीतील प्रमादाशिवाय दुसरा मृत्यु नाही. जो एकाग्रचित्त आहे त्याला सिद्धी प्राप्त होते म्हणून ब्रह्मतत्त्वावर मन एकाग्र करून सावध रहावे.
स्पष्टीकरण — ब्रह्मनिष्ठाने प्रमाद करणे योग्य नाही. शुभ्र कपड्यावरचा डाग चटकन दिसून येतो.
महाभारतातील उद्योगपर्वात सनत्सुजातीय संवादात 'प्रमाद हाच मृत्यु' असे वचन आहे.
अज्ञानाच्या मूर्त आविष्कार म्हणजे अहंकार! त्याला डोके वर काढू देऊ नये.
या प्रमादाला कुलटा स्त्रीची उपमा दिली आहे. ती जशी जारासाठी बुद्धी भ्रष्ट करून बिघडवते तसा प्रमाद विद्वानाला बिघडवतो. आत्मज्ञानापासून वंचित ठेवतो.



www.madhavveeraghuveer.com

पुढे आचार्य प्रमादाला शेवाळाची उपमा देतात. चंद्राची उपमा देऊन सतत सावधान दक्ष रहायला सांगतात. कक्ष्यच्युत असा शब्द वापरून ब्रह्मतत्त्वाच्या अनुसंधानापासून भ्रष्ट असे म्हणतात. मुण्डक — २.२.३ — लक्ष्य अप्रमत्तेन वेद्धव्यम्

अनर्थपरंपरा सांगताना आचार्य संकल्प हेच त्याचे मूळ आहे असे सांगतात आणि संकल्प टाळण्याचा आदेश देतात.

ब्रह्माठायी चित्त एकाग्र करणे म्हणजे समाधी होय. या चित्ताच्या एकाग्रतेत विक्षेप आला तर त्याला सिद्धी मिळत नाही. अर्थात त्या मोक्षप्राप्ति होत नाही. त्यासाठी आचार्य भव सावधानः असा इशारा देतात. अशा वेळी समर्थवचन आठवते.

'दक्ष तो मोक्ष मिळवी।
म्हणोनि अखंड सावधान। धन्य तयाचे महिमान॥

जीवतो यस्य कैवल्यं विदेहे च स केवलः।
यत्किंचित्पश्यतो भेदं भयं ब्रूते यजुः श्रुतिः॥३३०॥

जिवंत असताना ज्याला मुक्ति मिळते तोच विदेहावस्थेतही मुक्त असतो, जो या दोहोंत किंचितही भेद पाहतो त्याला भीती आहे, असे यजुर्वेद सांगतो.

यजुर्वेदातील तैत्तिरीय उपनिषदात वचन आहे — यथा ह्येवैष एतस्मिन्नुदरमन्तरं कुरुते। अथ तस्य भयं भवति।

ब्रह्म आणि मी एकच म्हटल्यावर भय कुठले? ते वेगळे मानले तरच भय निर्माण होण्याचा प्रश्न।

जीवन्मुक्त व विदेहमुक्त या दोघांना आलेला मुक्तीचा अनुभव समानच आहे. भेद केवळ उपाधीचाच. घटाकाश व महदाकाश दोन्ही एकच आहे.

October 2016

| Mon | Tue | Wed | Thu | Fri | Sat | Sun | Mon | Tue | Wed | Thu | Fri | Sat | Sun | Mon | Tue | Wed | Thu | Fri | Sat | Sun |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 | 7 | 8 | 9 | 10 | 11 | 12 | 13 | 14 | 15 | 16 |
| 17 | 18 | 19 | 20 | 21 | 22 | 23 | 24 | 25 | 26 | 27 | 28 | 29 | 30 | 31 | | | | | | |



www.madhaveeraghuveer.com

यदा कदा वापि विपश्चिदेष
ब्रह्मण्यनन्तेऽप्यणुमात्रभेदम्।
पश्यत्यथामुष्य भयं तदेव
यदीक्षितं भिन्नतया प्रमादात् ॥३३१॥

जेव्हा केव्हा हा विद्वान अनंत ब्रह्माठायी अणुमात्र सुद्धा भेद पाहतो, तेव्हाच त्याला भय निर्माण होते. कारण प्रमादामुळे तो वेगळेपणाने पाहतो.

श्रुतिस्मृतिन्यायशतैर्निषिद्धे
दृश्येऽत्र यः स्वात्ममतिं करोति।
उपैति दुःखोपरि दुःखजातं
निषिद्धकर्ता स मलिम्लुचो यथा ॥३३२॥
सत्याभिसंधानरतो विमुक्तो
महत्त्वमात्मीयमुपैति नित्यम्।
मिथ्याभिसंधानरतस्तु नश्येत्
दृष्टं तदेतद्यदचोरचोरयोः ॥३३३॥

शेकडो स्मृति, श्रुती व युक्तीने निषेधिलेल्या या दृश्यविश्वावरच जो आत्मबुद्धी ठेवतो, त्याला निषिद्धकर्म करणाऱ्या चोराप्रमाणे दुःखावर दुःखच प्राप्त होते.

सत्याच्या शोधात जो निमग्न राहतो तो मात्र मुक्त होतो व आपले महत्त्व नित्य प्राप्त करतो. मात्र असत्याच्या शोधात मग्न असणारा नाश पावतो. चोर व साधु यांच्याबाबतीत देखील हे असेच दिसते.

www.madhavveeraghuveer.com